

साप्ताहिक

# माणूस

शनिवार । ४ मे १९७४

एक रुपया



शिवसृष्टी ! शिवदृष्टी !


# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ४ मे | अंक : एकूणपन्नासावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


छत्रपति शिवाजी महाराजांचं चरित्र म्हणजे एक साक्षात
पोवाडाच आहे. राष्ट्रनिर्मितीचं ते एक महान उपनिषद आहे.
या शिवसृष्टि प्रदर्शनीच्या प्रयत्नानं आम्ही हे उपनिषद मन.
हा पोवाडा गात आहोत.

बळवंतराव मो. पुरंदरे

श्रीशिवराज्य शके ३००
वैशाख शु. [illegible]



माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ५७३५९

# एक पोवाडा - स्वप्नशिल्पाचा

शिवाजी पार्कवर इतिहास घडतो आहे. सध्या या मैदानाची माती मंतरलेली आहे. त्या मातीत काळाच्या साक्षीनं एक अद्‌भुत शिल्प उभं रहात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा दिपवून टाकणारा तेजस्वी इतिहास तेथे आकार घेतो आहे. तुतान्या निनादत आहेत, रणशिंगे फुंकली जात आहेत, सनई चौघडा वाजतो आहे; महाराजांची सुलक्षणी हत्तीवरून मिरवणूक निघालेली आहे, बाजूला भवानी मातेचं मंदिर आहे, रायगडाचा दरबार आहे, सुरेख मनोरे आहेत, पाठीशी सिंहगडाचा तानाजीकडा आहे. क्षणार्धात तीनशे वर्षे मागं नेऊन त्या वैभवशाली काळाचे साक्षीदार बनवणारी ही 'शिवसृष्टी' आहे. तेथला वारा वाहतो गडकोटावरून, तेथे आवाज घुमतात घोडयांच्या टापांचे नि पोवाडयांचे आणि येथे सूर्य उगवतो तोही लोहगडच्या महादरवाज्यावर आणि अस्त पावतो तानाजीकडयावर !

महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान ट्रस्ट व श्रीशिवराय मंडळ यांच्यावतीने हे शिवसृष्टी प्रदर्शन भरले आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या उत्तुंग प्रतिभेला शिवसृष्टीचं हे स्वप्न कैक वर्षांपूर्वी पडलं. मनसुबे रचले जात होते, मसलती होत होत्या. यंदा तर शिवराज्याभिषेकास तीनशे वर्षे पुरी होत होती. त्यानिमित्तानं हे स्वप्न साकार करायचं ठरलं. आधी किंगजॉर्ज प्रशालेच्या वर्गात ही सृष्टी उभी रहायची होती. संयोजक विख्यात नेपथ्यकार रघुवीर तळाशीलकर यांच्याकडे गेले. एवढया विशाल माणसाचं दर्शन वर्गात कसं व्हायचं? तळाशीलकरांनी शाळेच्या प्रांगणात शिवसृष्टी उभारावी असं सुचवलं. पण हे स्वप्न वास्तवात आणायचं तर ते पैशाच्या पंखावरूनच खाली उतरू शकणार होतं. तळाशीलकरांनीच धीर दिला. पैशाचं पाहता येईल. ही गोष्ट सुमारे ८–९ महिन्यांपूर्वीची. शिवसृष्टीच्या तयारीला जोरानं सुरूवात झाली. मुहूर्त झाला प्रतापगडावर. ललिता पंचमीला अष्टभुजा भवानी मातेच्या साक्षीनं पूजा झाली. तळाशीलकरांच्या हातात जबाबदारीचा विडा देण्यात आला. प्रेरणा तेथून मिळाली. सृष्टी घडू लागली. छत्रपतींचा तो वैभवकाळ मनाभोवती पिंगा घालू लागला. बाबासाहेबांना सारं कसं लख्ख दिसायचं. त्यांच्यापुढे छत्रपतींच्या जीवनातील एकेक प्रसंग उलगडत जायचा, ते सांगत जायचे आणि तळाशीलकर त्याची नोंद करत जायचे. बाबासाहेबांनी सांगावं नि तळाशीलकरांनी ते तस्सच पेश करावं. लोहगडला यांच्या स्वाऱ्या गेल्या. गड न्याहाळणं झालं, विपुल छायाचित्रं काढली, रेखाचित्रं तर अनेक. या खेरीज मनावर गडाचं चित्र कोरलं गेलं ते वेगळंच. मग रायगड, सिंहगड अशीही भटकन्ती. छत्रपतींच्या त्या गडकोटांना वाट पुसत पुसत शिवसृष्टी उभारायची होती. दरम्यान इकडे मुंबई महापालिकेचे आयुक्त म. वा. देसाई यांनी शिवसृष्टीसारखं भव्य-दिव्य प्रदर्शन शिवाजी पार्कवर व्हावं असं सुचवलं. एरवी त्या मैदानाचं भाडं ३५ रुपये रोज परंतु या महान कार्यासाठी त्यांनी ते फक्त १० रुपये केलं. इतर मदत तडकाफडकी दिली. त्यावेळचे उमदे महापौर सुधीर जोशी व देसाई यांनी देणगीचंही आश्वासन दिलं. ते पाळलंही. पालिकेकडून दोन लक्ष रुपयांचे अनुदान मिळालं.

गेल्या ५ मार्चला शिवाजी पार्कवर कामाला प्रारंभ झाला. एकूण ४०० माणसं रोज खपू लागली. बाबासाहेबांच्या स्वप्नातली सृष्टी प्रत्यक्षात भूलोकी अवतरू लागली. लोहगडच्या महादरवाजाची ४५ फूट उंचीची प्रतिकृती केली. मूळ दरवाज्यावर नगारखाना नाही. येथे मात्र सोयीसाठी तो केलाय. त्यावर फडकतो आहे भगवा झेंडा. दरवाज्याच्या आधी दोन्ही बाजूस ३५ फूट उंचीच्या दीपमाळा, आत अशाच आणखी ५ दीपमाळा. काळसर रंगाचा बुलंद दिसणारा तट, मध्ये काळपट किरमिजी उंच द्वार, त्यातून आत शिरलं की समोरच दिसतात रायगडावरचे दोन मनोरे. येथे हे काळेकभिन्न नाहीत. फिकट गुलाबी रंगाचे–या मनोऱ्यांच्या कुशीत छत्रपतींच्या जीवनाचा चित्रमय आलेख, ११ अष्टकोनी दालनं. पहिल्याच दालनात छत्रपतींची शस्त्रास्त्रे; खुद्द त्यांचं हस्ताक्षर, समर्थ रामदास, संत तुकाराम यांचीही हस्ताक्षरं. अत्यंत दुर्मिळ असलेला होन आणि ज्या तलवारीच्या पात्यानं महाराजांनी आपल्या शौर्याचा इतिहास लिहिला ती भवानी तलवारही याच दालनात. साताऱ्च्या जलमंदिरातून शिवसृष्टी प्रदर्शनासाठी खास ही तलवार आणण्यात आली. सव्वादोनशे वर्षांनंतर प्रथमच या तलवारीनं साताऱ्याहून कूच केलं. नंतरच्या दुसऱ्या दालनात गतवैभवाचं दर्शन, छत्रपतींच्या जन्माआधीचा काळ याचं दर्शन, इतर दालनातून जाज्वल्य राष्ट्रभक्ती, उत्साही नेतृत्व, कुशल-युद्धनैपुण्य, कडक शिस्तप्रियता, लष्करी डावपेच, समर्थ प्रशासन, उत्तम अर्थशास्त्रज्ञ, आदर्श मानव अशा महाराजांच्या अनेक पैलूंचं दर्शन. वेगवेगळी दृश्ये पडद्यावर चितारलेली, कोठे घनदाट अरण्य तर कोठे समुद्रातला सिंधुदुर्ग. अशा पार्श्वभूमीवर पुढे मोठमोठे रंगीत छायाचित्रांचे कटआऊटस, छत्रपतींचा एखादा प्रसंग येथलाच कलाकारांकरवी अभिनीत केलेला. त्याचंच दृश्य टिपलेलं नि त्याचेच हे मोठाले कटआऊटस्. बहुतेक छायाचित्रं मोहन वाघ यांनी घेतलेली.

छत्रपतींच्या गूढ व्यक्तीमत्त्वासारखीच अनाकलनीय पण अद्‌भूत अशीच प्रदर्शनाचीही रचना, अकरा दालने अशी एकमेकात जोडली की त्यांचा सहज थांगपत्ता लागू नये. तळाशीलकर चॅलेंजच देतात मोजून पहा दालनं म्हणून ! या मनोऱ्यांच्या बाजूलाच शिलंगणाचा

शिवाजी पार्कवर येत्या १ मे ते ६ जूनपर्यन्त एक भव्यदिव्य शिवसृष्टी अवतरते आहे. बाबासाहेब पुरंदरे हे मार्गदर्शक नि कलादिग्दर्शक रघुवीर तळाशीलकर. त्या निमित्तानं या सृष्टीची ही झलक.

चौक, ६ जून १६७४ रोजी छत्रपतींचा राज्याभिषेक झाल्यावर छत्रपतींची एका सालंकृत शुभलक्षणी हत्तीवरून मिरवणूक निघाली. त्या मिरवणुकीची सहीसही प्रतिकृती या चौकात. अंबारीसह २१ फूट उंचीचा हत्ती, अंबारीत छत्रपती, माहुताच्या जागी सरसेनापती त्या सोहळ्याला आपणच साक्षी आहोत असं वाटावं इतकं सारं जिवंत, बाजूला रायगडावरची बाजारपेठ. मागे भवानी मातेचं मंदिर, त्यात सव्वादोन फूट उंचीची अष्टभुजा देवी. त्याखेरीज अष्टकोनी दालनात ८ फूट उंचीचीही भवानी मातेची वेगळी मूर्ती आहेच. त्याही पाठीमागे सिंहगडावरचा तानाजीकडा, तानाजी जेथून गडावर चढले ती बाजू, तेथे दोर लावून काही डमीजही बसवलेल्या, ६० फूट उंचीचा व ३२५ फूट लांबीचा हा कडा, त्याच्या पोटात २० फूट उंचीवर १२० फूट लांबीची वाट. फक्त बच्चे लोकांना त्यात जायची परवानगी. ही वाट मस्तच आहे. एकदम डोंगराच्या पोटात चालल्याचा भास होतो, आत शिरलं की अंगावर अंधार येतो मग प्रकाशाच्या तिरिपीकडे पहात वाट तुडवायची. या कड्याच्या पोटातच अफझुलखान वधाचं केवळ दिव्यांच्या सहाय्यानं उभारलेलं दृश्य, तर कड्याच्या दुसऱ्या बाजूस 'सर्करामा' १२ पडदे, ११ प्रोजेक्टर्सच्या सहाय्यानं तेथे रायगडाची चढण व दर्शन स्लाईडसद्वारा होणार, या कार्यक्रमासाठी कोडॅक कुशल प्रोजेक्टर मिळेना. शेवटी मिळाला तेव्हा भाडंच एकूण सव्वा लाख रुपये पडेल असं ध्यानी आलं. हा कार्यक्रम रद्द करावा लागतो की काय असं वाटू लागलं. पण परब नावाच्या एका हुशार तरुणानं स्वतः ऑटो प्रोजेक्टर बनवला. त्यामुळं २० हजारातच काम भागणार आहे.

मनोऱ्याच्या डावीकडे रायगडावरचा दरबार. तेथे तर रोज राज्याभिषेक सोहळा होणार. दामू केंकरे यांनी दिग्दर्शिलेल्या व वसंत देसाई यांनी संगीत दिलेल्या या कार्यक्रमात सुमारे ८५ कलावंत भाग घेणार. सोनेरी, रत्नजडित सिंहासनावर छत्रपती बसलेले, चवऱ्या ढाळल्या जात आहेत, तुताऱ्या फुंकल्या जात आहेत आणि राज्याभिषेक सोहळा चालू झाला आहे असं दर्शन होईल. २० मिनिटांचा हा कार्यक्रम दिवसातून ८ वेळा सादर व्हायचा आहे. या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका श्री. मधुकर जोशी करणार आहेत, हे तळाशीलकरांचे 'फाइंड', त्याची गंमतच झाली. छत्रपतींच्या पोर्ट्रेटवरून तळाशीलकरांनी एक ट्रेस करून रेखाचित्र काढलं. मात्र दाढी व जिरेटोप काढला नाही. हे मोठं चित्र त्यांनी प्रदर्शनाच्या कचेरीत टांगून ठेवलं. असा दिसणारा माणूस दिसला तर मला सांगा असं फर्मान काढलं. एके दिवशी एका मंडळाच्यावतीने कार्यक्रम ठरविण्यासाठी बाबासाहेबांना भेटायला श्री. जोशी आले. त्यांना पाहताच तळाशीलकरांनी छत्रपतींची भूमिका करण्यासाठी त्यांची निवड करून टाकली.

शिवसृष्टी उभारायच्या कामी एकूण खर्च १३ लाखाच्या घरात जाणार. शिवसेना प्रमुख श्री. बाळ ठाकरे यांनी शिवसेनेच्यावतीने आतापर्यंत १ लक्ष २० हजार रुपये दिले. शिवसैनिकांनी तर अतोनात सहकार्य दिले याचा बाबासाहेब व तळाशीलकर आवर्जून उल्लेख करतात. उद्योगपती श्री. माधव आपटे यांनीही सर्वतोपरी सहाय्य दिलंय. हे प्रदर्शन उभारायला फार मोठ्या प्रमाणावर लाकूड, चटया, ४००० पोती, प्लास्टर आदि सामान लागलं. १ मे पासून ६ जून पर्यंत प्रदर्शन चालणार, त्यानंतर यातला काही भाग प्रतापगडावर हलवायचा मनसुबा आहे.

येथे माणसं दिवसभर राबताहेत, एखाद्या इन्स्पेक्टरसारखा बुश-शर्ट व तांबडी पॅंट घातलेले तळाशीलकर शांतपणे पण नेमकं काम समजावून देताहेत, शर्ट-पायजमा, दाढी व डोळ्यावर निळसर काचांचा चष्मा असे बाबासाहेब तर सतत शिवसृष्टीत फिरत असलेले, क्षणाचीही विश्रांती नाही. त्यांच्या शब्दाचं सामर्थ्य एवढं विलक्षण की समोर प्रत्यक्ष शिवसृष्टी असूनही त्यांच्या वर्णनातली सृष्टी डोळ्यासमोर मूर्तीमंत उभी रहाते. एकेक शब्द त्यांच्यामुखातून उमटतो आणि जणूकाही शिवसृष्टी उभारायच्या कामीच लागतो. मी त्यांना गाठलं तेव्हा भवानी तलवार आणली जाणार याचा अपार आनंद त्यांना झालेला. अगदीच उदास व्हावं असं आजचं चित्र नाही. आजचाही इतिहास वैभवशाली घडला पाहिजे. आपल्याकडे साधनं, माणसं विपुल आहेत– नाही ते राष्ट्रीय चारित्र्य ! ते निर्माण्याच्या दृष्टीनं केलेला प्रवास म्हणजे ही शिवसृष्टी असं मनोगत बाबासाहेबांनी व्यक्त केलं. इतिहासाकडे तोंड करून वर्तमानाकडे पाठ फिरवायची हे मला नामंजूर आहे असं सांगून ते म्हणाले, छत्रपती हे राष्ट्रनिर्मितीचं फार थोर माध्यम आहे, ही व्यक्तीपूजा नव्हे; तर राष्ट्रनिर्मितीच्या, समाजसेवेच्या महान तत्त्वज्ञानाची ही पूजा आहे. त्यातून प्रेरणा घ्यायची आहे.

अशी ही शिवसृष्टी मुंबईच्या सिमेंट कॉंक्रीटच्या इमारतींच्या जंगलात आणि दूषित हवेच्या वातावरणात हरवून गेलेल्या माणसाला काही मंतरलेले क्षण देणारी. येथे एक स्वप्नशिल्प उभं राहिलंय. बाबासाहेबांच्या शब्दात सांगायचं तर हा खरंच एक पोवाडा आहे चैतन्याचा–जो कान देऊन ऐकेल त्याला हा चैतन्याचा ठेवा मिळेल, हा पोवाडा त्याच्या नसानसातून घुमेल. □ □




अरबराष्ट्रांकडे
७०००० किलो डालडा मिळ-वण्यात यश! पुढील दौरा पेट्रोल साठी.




तू नुसता होकार दे लग्नाच्या हॉलचा प्रश्नच नाही. कोणत्याही रेल्वे स्टेशनात कार्य उरकून घेऊ.




मी शिवाजी महाराज यांच्यावर बोलणार होतो, पण माझे भाषण लिहून देणारे सेक्रेटरी सध्या शिव जन्माच्या तारखेच्या संशोधनात गढले आहेत.


या टी.व्ही.ची बनावट
मी विचारत नाही त्याचे
लायसेन्स बनावट आहे
काय? हा माझा प्रश्न आहे!


टायर
महागणार
ही बातमी नेमकी
मलाच सांगण्याचे
काय प्रयोजन?
श्यामजोशी

# सत्तास्पर्धेमुळे सध्या गट एकसारखे बदलत आहेत !

माहितगार

मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक ऑगस्ट अखेर जाणार असे खात्रीपूर्वक सचिवालयाच्या सहाव्या मजल्यावर बोलले जात आहे. २ एप्रिल रोजी विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या खास बैठकीत मुंबईत शिवसेनेला व विदर्भात स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीला प्रोत्साहन दिले जात आहे असा आरोप मुख्यमंत्री श्री. नाईक यांच्यावर करण्यात आला. नेतृत्वात बदल करण्यासाठी काँग्रेस आमदारांच्या हालचाली सुरू असतानाच ऑगस्टमध्ये स्वतंत्र विदर्भाची चळवळ सुरू करण्याची – आणि तीही हिंसाचारी मार्ग अनुसरूनही – घोषणा खासदार जांबुवंतराव धोटे यांनी केली आहे. ऑगस्टमध्ये श्री. नाईक जाणार असे सगळेच म्हणतात. त्याच महिन्यात स्वतंत्र विदर्भाची चळवळ सुरू होते आहे आणि विदर्भातीलच काही आमदार विदर्भवादी चळवळीला प्रोत्साहन देत आहेत असेही कळते. या तीन घटना एकत्र केल्या की सध्याच्या राजकारणाचा त्रिकोण स्पष्ट होतो. केवळ योगायोग म्हणून हे सारे जमून आले काय ? आपली जाण्याची वेळ समीप येताच विदर्भ पेटला म्हणून भावनिक ऐक्याचे पालुपद आळवून आसन घट्ट केले जाईल कां ? आधीच विदर्भाची चळवळ चालू आहे; त्यात विदर्भाचा मुख्यमंत्री बाजूला केला तर अधिकच भडका उडेल, राज्याच्या एका भागात हिंसक आंदोलन चालू असताना नेतृत्वात बदल करण्याचा कोणी विचार करणार नाही, हे साधे गणित मांडले जाणार नाही काय ? ते मांडूनच राजकारण सध्या खेळले जात आहे. स्वतंत्र विदर्भाच्या – अगदी निखळ स्वतंत्र विदर्भाच्या – मागणीला जनतेचा पाठिंबा आहे का असे विचारले तर आतापर्यंतच्या आंदोलनाकडे बोट दाखवून विदर्भाच्या आंदोलनाला जनतेचा पाठिंबा नाही असे उत्तर देता येईल ! जनतेचा पाठिंबा नसेल तर ऑगस्टमधील आंदोलन पेटेल कसे असेही विचारले जाते; आणि मग राजकारणातील स्वार्थ स्पष्ट दिसू लागतात. श्री. नाईक यांचे परममित्र श्री. नाशिकराव तिरपुडे व तसेच इतरही काहीजण यांची वर्णी लावण्याचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहीत. असे काँग्रेसमधीलच असंतुष्ट श्री. धोटे यांचे आंदोलन अप्रत्यक्ष चालू ठेवतील असे नव्हे तर ते पेटवतीलही, अशी चर्चा सचिवालयात चालू आहे.

विदर्भ हे महाराष्ट्राचे नाजूक दुखणे आहे. ते वेळोवेळी उचल खात आले आहे आणि खाईल ! यशवंतराव चव्हाण यांची संरक्षण मंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर वसंतराव नाईक मुख्यमंत्री होणार, त्यांचे मंत्रिमंडळ आज जाहीर होणार अशा हेडलाइन्स त्यावेळी प्रसिद्ध झाल्या होत्या. काही कामानिमित्त मी व जवाहरलाल दर्डा बरोबरच पुण्याला आलो होतो. त्याच दिवशी या बातम्या होत्या. आमची त्यासंबंधी चर्चाही झाली. परंतु नंतर दुसऱ्या दिवशी अचानक मुख्यमंत्रीपदी मारोतराव कन्नमवार यांची वर्णी लागली ! हा बदल कसा घडला याचे कुतूहल अजूनही कमी झाले नव्हते ! कोणी म्हणत आबासाहेब खेडकर यांनी ज्येष्ठतेचा प्रश्न केल्याने श्री. नाईक यांच्याऐवजी कन्नमवार यांना मुख्यमंत्रीपद दिले. परंतु खरा प्रकाश पाडला तो विधानसभेचे सभापती नानासाहेब वानखेडे यांनी ! कन्नमवारांनी त्यावेळी स्वतंत्र विदर्भाची चळवळ करण्याची पावले टाकली होती. एक सभाही त्यांनी उधळून लावली. यशवंतराव चव्हाण यांना विदर्भाचे ऐक्य मनापासून हवे होते म्हणून त्यांनी विदर्भाची चळवळ सुरू होऊ नये म्हणून कन्नमवार यांना मुख्यमंत्री केले असे विधानसभेचे सभापती नानासाहेब वानखेडे यांनी सहा महिन्यापूर्वीच सांगितले होते. विदर्भाची चळवळ सुरू होऊ नये म्हणून कन्नमवार यांना मुख्यमंत्री केले होते. नाजुक दुखण्याने त्यावेळी अशी उचल खाल्ली होती. आताही हे दुखणे अशीच उचल खाईल काय ? थोडे विषयांतर करून विदर्भ हे नाजूक दुखणे कसे आहे हे सांगण्यासाठी १९६२ चे राजकारण आणि त्यावर सहा महिन्यापूर्वी पडलेला प्रकाश नमूद केला. ऐनवेळी आपल्या नावात बदल केल्याचा राग – फार तर राग म्हणू नका – पण रुखरुख श्री. नाईक यांना लागली होती असे श्री. नाईक यांचा एक स्नेही मध्यंतरी म्हणाला होता. त्यांनी हे सांगितले त्यावेळी श्री. नाईक यांचे स्थान भक्कम होते.

नेतृत्वात बदलाची मागणी जोर करीत आहे आणि त्याचे वेळापत्रकही ठरत आहे. अशा मोक्याच्या वेळी विदर्भाची चळवळ होऊ घातली आहे. काहींचे मनसुबे धुळीला मिळाले. त्याचे उट्टे या चळवळीच्या निमित्ताने काढण्याचा प्रयत्न होणारच नाही असे म्हणता येत नाही. त्याला कारण भूतकाळातील घटनांचा अनुभव आहे. आपल्याला प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी होता आले नाही म्हणून श्री. नाशिकराव तिरपुडे यांना मानगाच्या युवकांकडून पी. के. सावंत यांना घेराव घातला गेला होता. विधान परिषदेचे 'तिकिट' मिळाले नाही म्हणून भंडारा जिल्हा परिषदेमार्फत परिषदेवर पाठवावयाच्या उमेदवारीत काँग्रेसचा अधिकृत उमेदवारही पाडला गेला आहे. आपले मनसुबे धुळीला मिळताच संघटनेविरूद्ध कारवाया करण्याची सवय परममित्रांना आहे हे लक्षात घेतले की संकल्पित विदर्भाच्या चळवळीत काय काय होऊ शकेल याची कल्पना करण्यासाठी डोक्याला फार ताण द्यायला लागत नाही.

विदर्भ महाराष्ट्रात एकजीव झाला पाहिजे, एकजिनसी झाला पाहिजे याविषयी दुमत नाही. पण वस्तुस्थिती काय आहे ? प्रेशर

कुकरला सेफ्टी व्हॉल्व असतो. त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणाच्या कुकरला विदर्भाकडे मुख्यमंत्रीपद हा सेफ्टी व्हॉल्व ठरला आहे. विदर्भाकडून मुख्यमंत्रीपद गेल्यावर किती वर्षे विदर्भ महाराष्ट्रात एकजिनसीपणाने राहू शकेल हा प्रश्नच आहे. कुकरचा सेफ्टी व्हॉल्व गेला की आतली सारी वाफ निघून जाते, त्याप्रमाणे विदर्भाचा मुख्यमंत्री गेला की विदर्भाच्या राजकारणाची सारी वाफ बाहेर पडू लागेल ! विदर्भ महाराष्ट्रात आला तो मनाने आला की कराराने आला याचीही आठवण ठेवली पाहिजे. कालचे स्वतंत्र विदर्भवादी नरेंद्र तिडके यांच्यासारखी माणसे संयुक्त महाराष्ट्रात मंत्री झाली. विभागाचा विचार न करता गुणवत्तेप्रमाणे विचार करून मंत्रीपद दिले गेले आणि त्यात विदर्भाच्या मंत्र्यांचे प्रमाण कमी झाले की मग विदर्भ महाराष्ट्रात 'कसा आला' त्याची प्रचीती येऊ लागेल ! विदर्भाचा विकास झाला पाहिजे. देशाचाच विकास झाला पाहिजे. परंतु विदर्भ विकासाचे स्वरूप लक्षात घेतले की त्यात स्वतंत्र विदर्भाची बीजे तर नाहीत ना अशी शंका येते. राज्याच्या खर्चातून विदर्भात मोठ्या योजना पूर्ण केल्या गेल्या वा केल्या जात आहेत. नवे मोठे पाटबंधारे व वीज प्रकल्प यांना विदर्भात आता फारसा वाव राहिलेला नाही. जे प्रस्ताव आहेत ते राज्यांच्या किंवा केंद्राच्या मदतीने उभारण्यात येणार आहेत. परंतु महाराष्ट्राच्या इतर भागात मोठ्या पाटबंधारे योजनांसारख्या योजना अजून पूर्ण व्हावयाच्या आहेत. म्हणजे एखाद्या जिल्ह्यांत एक मोठी योजना असली की तीवर जिल्हा योजनेतून त्यावरच प्रामुख्याने खर्च होईल. विदर्भात आता मोठ्या योजना व्हावयाच्या राहिलेल्या नसल्यामुळे विदर्भातील जिल्ह्यांचा पैसा जिल्हा नियोजनातून जिल्ह्याच्या इतर विकास कामावर खर्च होईल. राज्याच्या इतर भागांत मोठ्या योजनांवर जिल्हा योजनातून खर्च केला जाणार असल्याने जिल्ह्याच्या इतर विकास कामावर खर्च करायला जिल्ह्यांकडे पैसाच राहात नाही. विदर्भ मागासलेला आहे म्हणून त्याच्या विकासासाठी आतापर्यंत ज्या पद्धतीने योजना पूर्ण करण्यात आल्या त्याने विदर्भ वीज, ओलीत व उद्योगधंदे याबाबतीत स्वतःची गरज बव्हंशी पूर्ण करू शकेल. ज्या दिवशी या योजनांचे लाभ विदर्भाला मिळू लागतील त्यानंतर थोड्याच कालावधीत कदाचित विदर्भ वेगळे राज्य होईलही ! त्यावेळी मंत्रीपदावरून वाद सुरू केला जाईल. विदर्भाकडे पुढील दहा वर्षे मुख्यमंत्रीपद नाही असे होईल तेव्हा विदर्भातील राजकारणी लोक कसा पवित्रा घेतात याचा अनुभव यायलाच हवा. जनतेला महाराष्ट्रात राहावयाचे आहे पण पुढारी जनतेला चिथावतील !

मुख्यमंत्री श्री. नाईक ऑगस्टमध्ये जाणार ! त्याच सुमारास विदर्भात स्वतंत्र विदर्भाची चळवळ सुरू होऊन आपले घोडे मागे पडेल असे वाटल्यामुळे मराठवाडा आधीच जागा झाला आहे. मराठवाड्याच्या विकासाच्या नावाने सुरू झालेल्या अलीकडच्या आंदोलनात राजकारण नाहीच असेही मानावयाचे कारण नाही ! राज्यांतील विभागांकडे वेगळ्या भूमिकेतून पाहिले की त्यांची अशीच फळे भोगायला लागणार ! तीन मुलात आई जर एखाद्या मुलाकडे अधिक सहानुभूतीने पाहू लागली तर तिच्या इतर दोन मुलांत असूया, द्वेष, राग निर्माण होतो. विभागाचा प्रश्न म्हणून नव्हे पण आर्थिकदृष्ट्या विदर्भ-मराठवाड्याकडे सुरुवातीपासून पाहिले असते तर आजची भावना निर्माण झाली नसती. आतापर्यंत आर्थिक दृष्टिकोनातून न पाहता विभागीय दृष्टीकोनातून पाहिल्यामुळे अलगतेची भावना रुजली गेली आहे. त्यातूनच मराठवाड्याला संशय वाटत आला आहे. हा संशय असंतोष घेऊन प्रकट होत आहे.

मराठवाड्याकडे १९७२ मध्ये मुख्यमंत्रीपद दिले जाईल असे आश्वासन यशवंतराव चव्हाण यांनी १९६७ मध्ये दिले नव्हते का ? मग हे आश्वासन पूर्ण होईल असे पहायला हवे होते. १९७२ मध्ये यशवंतराव म्हणजे आणि महाराष्ट्र चाले, अशी परिस्थिती राहिली नव्हती हे खरे ! पण दिलेले आश्वासन पूर्ण झालेले नाही म्हणून मराठवाडा खदखदत आहे. आजच्या मराठवाड्यातील आंदोलनाचे स्वरूप काही अंशी राजकीयच आहे. आणि ते स्वाभाविकच आहे. पण माणसे फोडण्याची पूर्वीची प्रक्रियाही पुन: सुरू झाली आहे त्यामुळे कुवत नसलेल्या कल्याणराव पाटलांना मोठे करण्याचा प्रयत्न चालला आहे. श्रेयाचे माप त्यांच्या पदरात टाकण्याचा आटापीटा चालला आहे. विद्यार्थी कल्याणराव पाटील यांच्यामागे नाहीत. ते कल्याणरावांचे ऐकत नाहीत. म्हणूनच मराठवाड्याच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांशी करावयाच्या चर्चेसाठी विद्यार्थ्यांना बोलावण्यास कल्याणरावानी विरोध केला. त्यांच्यात पेंढा भरून उभा केला जात आहे. त्यांचा विद्यार्थ्यांना विरोध आहे हे पाहून विद्यार्थीवर्ग ज्या गटाला मानतो त्या गटाने चर्चेसाठी विद्यार्थ्यांना बोलवले पाहिजे असा आग्रह धरणेही स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांत चर्चेसाठी बोलावण्याच्या प्रश्नावर मराठवाड्यातील चार मंत्र्यात मतभेद आहेत. शंकरराव व झकेरिया हे विद्यार्थ्यांना बोलवले पाहिजे या मताचे आहेत. कल्याणरावांचा विरोध तर सुंदरराव कुंपणावर बसलेले ! सरशी कोणाची होते तिकडे जाण्याचा तो सोपा मार्ग.

## गट एकसारखे बदलत आहेत

शंकररावांच्या बाजूला झकेरिया कसे आले ? १९७२ नंतरच्या राजकारणाचा अंदाज घेऊन ते शंकररावांच्या विरोधात गेले होते. म्हणजे नाईकांच्या कळपात ! नाईकांच्या कळपात अंतुले या मुस्लिम मंत्र्याला मानाचे स्थान दिले जात आहे. त्यामुळे झकेरिया व अंतुले एका कळपात राहणे जरा अवघडच होऊन बसले आहे. त्यातच ऑगस्टचे वारे जोरात सुटले आहे; अशावेळी आपण कुठेतरी असले पाहिजे, पहिल्या कळपात आपल्याला म्हणावे तसे स्थान मिळत नाही हे दिसू लागल्यावर येणारी पहिली संधी झकेरिया कशी सोडतील ? पुढचा सारा अंदाज बांधून झकेरिया हळूहळू शंकरराव चव्हाणांच्या बाजूला होऊ लागले आहेत. शंकरराव विद्यार्थ्यांना बोलावले पाहिजे म्हणत आहेत तेव्हा त्यांना पाठिंबा द्यावा असे ठरवून झकेरिया यांनीही विद्यार्थ्यांना चर्चेला बोलावले पाहिजे अशी भूमिका घेतली. झकेरिया या निमित्ताने शंकररावांच्या बाजूला जात आहेत.

सत्ता स्पर्धेमुळे सध्या एकसारखे गट बदलत आहेत. शंकररावांविरुद्ध बोलणारे झकेरिया आता बदलू लागले आहेत. मराठवाड्याच्या शिष्टमंडळाची चर्चा चालू असताना काहींनी शंकरराव चव्हाण यांच्यावर, त्यांचे नाव न घेता, पण शंकरराव चव्हाणांचे उजवे हात असलेले वैशंपायन यांच्यावर हल्ला केला. विद्यार्थ्यांना

पृष्ठ ३१ वर

बेडेकरांना जाऊन तीन मे या दिवशी एक वर्ष झाले. त्या निमित्त हा लेख

# दि. के. बेडेकर : एक मार्क्सवादी विचारवंत

संदीप पेंडसे

जीवन समाज वगैरे बाबतचे प्रश्न जेव्हा आमच्या पिढीला वोचू लागले, त्यावर गांभीर्याने वाचन-विचार करू लागलो त्या वेळी श्री. दि. के. बेडेकर विचारवंत म्हणून महाराष्ट्रात मानाच्या स्थानावर होते. मार्क्सवादी विचारसरणी जीवनाच्या विविध अंगांना लावू धरणाऱ्या मोजक्या चिंतक लेखकांपैकी ते अग्रगण्य होते. मार्क्सवादाकडे ग्रंथालयातून वळलेल्यांना एक स्फूर्तिस्थान अन उदाहरण ते वाटावे यात नवल नव्हतेच.

प्रत्यक्ष संबंध आला तो मात्र सुधीरचे वडील म्हणून. मागोवाच्या जन्माचे वेध लागण्याच्या दिवसात. त्यांच्या पिढीतल्या, अनेक वर्षांचा अनुभव गाठीशी असलेल्या, प्रचंड व्यासंगाच्या लोकांना आम्ही किंचित बिचकून असू. अशा लोकांनी एक तर सर्वच प्रश्नांचा विचार केलेला असे आणि त्यांची उत्तरे शोधलेली असत (निदान असा त्यांचा स्वतःचा ठाम ग्रह असे.) ती ही निराशावादी. जग नव्यानेच पहाणाऱ्या अन ते बदलण्याची ईर्षा बाळगणाऱ्या नवतरुणांना हे मान्य होणे अशक्यच होते. पुन्हा इतका अधिकार कमावल्यानंतर इतरांचे ऐकून घेण्याची प्रवृत्ती अन त्यांच्या मताबद्दल (अनेकदा अपरिपक्व, चुकलेल्या) असहिष्णुता या मुळे संवादाची शक्यता नसायचीच. त्या पिढीतल्या खास करून विचारवंताविषयी म्हणून एक विचित्र (आदर मिश्रित !) अढी आमच्या मनात असायची. आमचा झगडा बऱ्याच प्रमाणात त्यांच्याच विरुद्ध होता. समाजातील न पटणाऱ्या कित्येक गोष्टींबद्दल आम्ही त्यांनाच जबाबदार धरत असू. (या भूमिकेत तसा आजही फारसा गुणात्मक बदल नाही.)

म्हणून दि. कें. नी आवर्जून मत विचारले आणि ते ऐकून घेतले त्यावेळी मला आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांच्या पिढीच्या कानापर्यंत मत पोचवायचे असले तर तारस्वरात ओरडण्याशिवाय दुसरा उपायच नाही हा तो पर्यंतचा अनुभव त्यांच्या बाबतीत खोटा ठरला. आणि त्यांच्याशी संवाद साधता येतो हे कळून आले. ट्रेड युनियन्स मधला अर्थवाद आणि क्रांतीकारकत्व या विषयावर चर्चा चालली होती. बऱ्याच तावातावाने अर्थवादात गुंतलेल्या डाव्या पक्षांवर तरुणांनी झोड उठवली होती. पगारवाढ, बोनस हे लढे आणि क्रांतीकारी राजकारण यांचा मेळ साधण्यावर येऊन बोलणे ठेपले. आणि अत्यंत सरळपणाने दि. के. म्हणाले 'अरे गेली तीस वर्षे हाच प्रश्न सोडवण्यात आम्ही अपयशी झालो आहोत. आता तुमच्यावर ती जबाबदारी टाकलीय. उत्तरे देण्याची. त्यांनी आम्हाला निःशस्त्र केले. मते ऐकण्याची, समजून घेण्याची आणि ती पटत नसली तरी सहन करण्याची कुवत आणि हिंमत यांच्यात होती. खास पठडीतल्या शिव्या मोजून त्यांनी कुणाच्या प्रामाणिकपणाचा संशय घेतलेला माझ्या पहाण्यात नाही. उलट प्रत्येकच चूक ही प्रामाणिक चूक (अनेकदा नसताना) ते मानत. माझ्या (बहुतेक सुधीरच्याही) लिहिण्या, बोलण्या, विचारातला आक्रस्ताळेपणा वाटेल तसा न फोफावण्याचे एक महत्त्वाचे कारण बहुधा दि. कें. चे उदाहरण असावे.

स्वतःखेरीज इतरांची विचार धारणा व मतप्रणाली समजू शकण्याच्या कुवतीतूनच दि. कें. ची दृष्टी इतकी सर्वस्पर्शी आणि मृदू झाली असावी. मते ठाम असूनही ते दुराग्रही नव्हते ते याच मुळे. क्रांतीवादी असूनही ते एकांगी बनले नाहीत. मार्क्सवादाचा गाभा आत्मसात करून भोवतालचे अन स्वतःचे जीवन ते समृद्ध करू शकले. त्यांची अनेक मते पटली नाहीत. पूर्णतया विरोधी वाटली तरी त्यांच्या बद्दलचा आदर आणि प्रेम टिकून रहायचे इतकेच नव्हे तर वाढत जायचे ते याचमुळे.

बरीच वर्षे सर्व प्रकारचे काम करूनही दि. कें. नी कम्युनिस्ट पार्टी सोडली. पार्टी सोडल्यानंतर पार्टीतल्या लोकांशी फार संबंध हा त्यांचे उरले नव्हते. पण इतर कुठल्या पक्षाच्या जवळ ते गेले नाहीत अथवा मार्क्सवादावरची निष्ठा व विश्वास उडाल्याचे त्यांनी जाहीर केले नाही. त्यांची ओळख होण्यापूर्वी त्यांच्या बद्दल म्हणून थोडा गैरसमज अन बरेच कुतूहल होते. पक्ष व विशेषतः चळवळ सोडल्याबद्दल त्यांच्यावर झालेली टीका ऐकली होती. उदारमतवाद आणि सुधारणावाद यांचा त्यांनी आसरा घेतला अशी समजूत होती. पक्ष आणि चळवळ यांना सोडावे लागले हे खरोखरच एक दुर्दैव. भारतातल्या कम्युनिझमचे आणि कम्युनिस्टांचे एक मोठे दुखणे बुद्धीवादी आणि पक्ष यांचे संबंध हे होय. अनेक कलावंतांना, विचारवंतांना पक्ष सामावून घेऊ शकला नाही. अन्योन्य निष्ठेने अनेक शेवट पर्यंत पक्षात राहिले, घुसमटत घालवलेल्या जीवनानंतर तळमळतच मेले. गुदमर अशक्य होऊन अनेक बाहेर पडले आणि वेगवेगळे मार्ग धुंडाळू लागले. आपली जीवनशक्ती, प्रतिमा, विचक्षणा जीवंत ठेवायला पक्षाची चौकट सोडणे त्यांना भाग पडले. आणि या निर्णयाप्रत पोचताना बरेचदा मानसिक ताण अन आपसातले वादंग पराकोटीला पोचले. भारतातील मार्क्सवादाच्या (विशेषतः गेल्या दशकापर्यंतच्या) एकांड्या आणि एकांगी स्वरूपामुळे हे अपरिहार्य ठरले. मार्क्सवादाचे सर्वस्पर्शित्व, सम्यकता आणि मानववादित्व इथल्या पक्षाच्या मनात नीट न रुजल्यामुळे मार्क्सवाद सर्वांगाने संपूर्ण रूपाने इथे वाढला नाही. नैतिक मूल्यात्मक सर्व

पृष्ठ ३२ वर

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## विचार अजून सोडला नाही

चार मंडळी जमली. गप्पा सुरू झाल्या. विषय प्रचलित.. अन्नधान्याची टंचाई, विजेची टंचाई, इतर सगळ्याच टंचाया (फक्त शिव्या सोडून), शेवटी आणखी आवडीचा विषय म्हणजे राज्यकर्त्यांची नालायकी सिद्ध करून दाखवणे. गप्पा रंगात आल्या. तावातावाने चाललेली बोलणी ऐकून आणखीही चार लोक कुतुहलापोटी येऊन उभे राहिले. पाचसात मिनिटानंतर ह्या बघ्यांच्या लक्षात आलं की चालले आहे ते भांडण नव्हे अन् भांडण असलंच तर ते केवळ वाऱ्याबरोबर !

संभाषणात भाग घेणाऱ्या मंडळीत एक गृहस्थ जरा जास्तच आवेशात येऊन बोलत होते. ह्या गृहस्थांचं एक वैशिष्टच आहे. ते बंगालमध्ये असतात तोवर महाराष्ट्र राज्य सरकारला शिव्या मोजतात. अन् सुटीवर महाराष्ट्रात गेले की ह्या बोटावरचं त्या बोटावर करतात. थोडक्यात दोन्हीकडे आपलं महत्त्व जाणवून द्यायचा प्रयत्न, स्वतःची लोकप्रीयता वाढविण्याचा अट्टाहास ! पण ह्या दोन्ही ढिगांवर हात ठेवण्याच्या क्रियेमध्ये फार मोठा धोका असतो म्हणतात. दोन्हीकडून हात निसटले म्हणजे ?

तर सांगायचं असं की हे एक गृहस्थ जरा तावातावाने बोलत होते. इतर सर्वजण ऐकत होते. बोलता बोलता ते म्हणाले, परकीयांचं अनुकरण करून आपण आपलं स्वत्व गमावू लागलो आहोत. आपण साध्या राहणीचा अवलंब कां करू नये ?... अन् आणखीही पुढे ते पुष्कळ बोलणार होते. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे राज्यकर्त्यांना शिव्यांची लाखोली वाहणार होते, राज्य-शकट माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या हाती दिला तर उत्तम तऱ्हेने हाकून दाखवीन म्हणून आव्हान देणार होते, अन् असंच कितीतरी ते बोलणार होते. पण–

'अहो महाशय...' ह्या शब्दासरशी सर्वांच्या नजरा एकाच दिशेला वळल्या. वक्त्याला मध्येच अडवणारा तो एक खटचाळ तरुण होता. बडबडणाऱ्या गृहस्थांकडे सर्व श्रोत्यांचं लक्ष वेधून घेतल्यावर म्हणाला,

'महाशय, साधेपणावर तुम्हाला बोलण्याचा काय अधिकार आहे ? अंगावरचे टेरिलिनचे कपडे उतरवून खादी चढवा नि मग करा साधेपणाच्या गोष्टी !'

गृहस्थ काही कमी हजरजवाबी नव्हते. म्हणाले,

'खादीचा विचार मी सोडलेला नाही. तूर्त खादी फक्त हाताशी ठेवलीय.' असं म्हणून त्यांनी खिशातून अस्सल खादीचा हातरुमाल बाहेर काढून सर्वांसमोर धरला

अन् गांभीर्याच्या ढगांतून हास्याचा पाऊस पडला. ◻

## महात्माजीचे तीन वानर

'महात्माजींकडे तीन वानरांचा एक पुतळा होता, बरं का. त्यातल्या एका वानराचे हात कानावर, दुसऱ्याचे डोळ्यावर नि तिसऱ्याचे तोंडावर होते.'

'माहीत आहे मला, बाबा.'

'अग, वानरांच्या ह्या कृतीला एक विशिष्ट अर्थ होता, तो माहीत आहे तुला ?'

'होऽऽ! मला माहीत आहे...तुम्हाला नाही माहीत बाबा ?'

आता बाबांनाही गंमत करावीशी वाटली. म्हणाले, 'नाही बुवा ! आपल्याला माहीतच नाही. तू सांगतेस ?'

'ते तीन वानर असं म्हणतात,' शहाणपणाचा आव आणून मुलगी बोलत होती, 'एक म्हणतो hear me not evil, दुसरा म्हणतो see me not evil, अन् तिसरा म्हणतो speak me not evil.'

'असं होय ? पण तुला सांगू, ते तीन वानर महात्माजींच्या घरात होते तोवरच तो अर्थ होता. आज मंत्र्यांच्या घरात ते दिसत असतील तर त्यांचा अर्थ वेगळा आहे बरं.'

'खरंच बाबा ? वेगळा कोणता अर्थ आहे ?' बाबा समजावून सांगू लागले––

'जो वानर कानवर हात ठेवतो तो मंत्री-महाशयांना सांगतो की जनतेने कितीही आरडाओरडा केला तरी ऐकायचं नाही बरं का. चक्क दुर्लक्ष करायचं. जो वानर डोळ्यावर हात ठेवतो तो म्हणतो, मंत्री-महाशय, देशाला कितीही दैन्य आलं ना तरी तिकडे डोळेझाक करायची. त्याचबरोबर आपली चैन मात्र चालू द्यायची. अन् तिसरा वानर तोंडावर हात ठेवून म्हणतो, अहो मंत्रीमहाशय, जनतेबद्दलच्या सहानुभूती-विषयी नि त्यांच्या भल्याविषयी अवाक्षरही काढू नका. तरीपण तुम्हाला अगदीच राहवलं नाही तर खोट्या आश्वासनांची शब्द-फेक करून पुन्हा तोंडावर हात ठेवा.

शिवाय तिघेही वानर एका आवाजात म्हणतात, जनतेकडे संपूर्ण दुर्लक्ष व्हावं म्हणून डोळे, कान, तोंड झाकून घ्यायचेच पण पूर्ण-पणे पाठदेखील फिरवा तुम्ही, मंत्रीमहाशय !

मंत्र्यांच्या टेबलावर असलेला तीन वानरांचा पुतळा कदाचित् उलटा–भिंतीकडे तोंड करून ठेवलेला दिसला तर आश्चर्य वाटण्याचं कारण नाही.'

–बाबाचं हे विश्लेपण मुलीला कितपत आकलन झालं कोण जाणे !

◻ ◻

# पोर्तुगालमधील लष्करी क्रांती

## साम्राज्यशाहीचा अभेद्य तट ढासळू लागला

वा. दा. रानडे

दोन महिन्यापूर्वी बडतर्फ केलेले पोर्तुगालचे डेप्युटी चीफ ऑफ स्टाफ जन. अँटोनिओ डी स्पिनोला यांच्या नेतृत्वाखाली पोर्तुगीज लष्काराने बंड करून सत्ता हाती घेतली. पोर्तुगीज वसाहतींचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने ही क्रांती महत्त्वाची व दूरगामी परिणाम करणारी आहे. पदच्युत सरकार आपल्या वसाहत विषयक धोरणात कोणताही बदल करण्यास तयार नव्हते. आफ्रिकेत मोझांबिक आणि अंगोला या पोर्तुगालच्या दोन मोठ्या वसाहती आहेत. तेथे स्वातंत्र्य चळवळीचा जोर वाढत आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरात गिनी या आफ्रिकेतील छोट्या पोर्तुगीज वसाहतीतील स्वातंत्र्यवाद्यांनी बंड करून स्वतंत्र प्रजासत्ताक स्थापल्याचे घोषित केले. पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांना हा मोठा हादरा होता. पण काळाची पावले न ओळखता मोझांबिक व अंगोलामधील स्वातंत्र्य लढा लष्करी बळावर दडपून टाकण्याचेच धोरण पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांनी पुढे चालू ठेवले. त्यासाठी ज्या लष्करावर त्यांची भिस्त त्या लष्करानेच क्रांती करून सत्ता हाती घेतल्याने आता वसाहतींचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने निश्चित पुढचे पाऊल पडेल.

लष्करी क्रांतीचे नेते जनरल स्पिनोला यांनी पदच्युत सरकारच्या वसाहत विषयक धोरणास स्पष्ट विरोध केला होता. लष्करी बळावर या वसाहती आपणास टिकविता येणार नाहीत असे मत काही महिन्यांपूर्वी लिहिलेल्या एका पुस्तकात त्यांनी मांडले होते. पोर्तुगाल आणि वसाहती यांचे संघराज्य स्थापन करावे. त्यात वसाहतींना पोर्तुगालच्या बरोबरीचा दर्जा असावा अशी योजना त्यांनी या पुस्तकात मांडली होती. पोर्तुगीज गिनीमध्ये ते चार वर्षे गव्हर्नर व सेनाप्रमुख होते. लष्करी बळावर तेथील सत्ता पोर्तुगीज टिकवू शकले नाहीत या प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावरच वसाहतींना बरोबरीचा दर्जा देण्याची आपली योजना त्यांनी मांडली होती. पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी ती मान्य तर केली नाहीच उलट ही भूमिका मांडल्याबद्दल त्यांना बडतर्फ केले.

पण जनरल स्पिनोला एकटे नव्हते. हे त्यांच्या बडतर्फीच्या निषेधार्थ गेल्या मार्चमध्ये झालेल्या बंडाने दिसून आले. तरुण लष्करी अधिकारी या बंडात सामील झाले होते. त्यावेळी त्यांना यश आले नाही. आपण बंड मोडून काढले व लष्करावर पुन: आपले नियंत्रण प्रस्थापित केले असे सत्ताधाऱ्यांना वाटले पण तो त्यांचा भ्रम होता हे एक महिन्यातच जनरल स्पिनोला यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या यशस्वी लष्करी क्रांतीने दाखवून दिले.

या लष्करी क्रांतीने पोर्तुगीज साम्राज्यशाहीचा अभेद्य मानला गेलेला तट ढासळायला सुरुवात झाली असे म्हणायला हरकत नाही. लष्करी क्रांती मोडून काढून पुन्हा सत्तेवर येण्याचा प्रयत्न पदच्युत सत्ताधारी करणार नाहीत असा याचा अर्थ नाही. पण त्यांचा मुख्य आधार जे लष्कर तेच उलटल्याने त्यांना यश येणे कठीण आहे. बंडखोरांना सबंध लष्कराचा पाठिंबा होता. त्यांच्यात फूट पाडण्यात पंतप्रधान केटॅनो यांच्या सरकारला यश आले नाही. अशा परिस्थितीत नव्या सरकारविरुद्ध ते कोणाच्या आधारावर उठाव करणार? जनताही बंडखोरांच्या बाजूला आहे. कारण ही क्रांती पोर्तुगीज फॅसिझमविरुद्ध असून नागरी व लोकशाही प्रस्थापित करणे हा तिचा मुख्य उद्देश आहे. नागरी हक्क प्रस्थापित करण्याचे व निवडणुका घेण्याचे आश्वासन लष्करी क्रांतीच्या नेत्यांनी दिले आहे.

लष्करी क्रांतीच्या नेत्यांना पदच्युत सरकारचे वसाहतविषयक धोरण मान्य नव्हते. याचा उल्लेख वर केलाच आहे. पण त्यांचे बंड केवळ तेवढ्यासाठी नव्हते. नागरी व लोकशाही अधिकार प्रस्थापित करणे हा त्या मागील मुख्य उद्देश होता. पोर्तुगीजांना नागरिक म्हणून त्यांची राजकीय कर्तव्ये पार पाडू दिली जात नव्हती. त्याविरुद्ध त्यांचा लढा होता. सत्तेच्या गैरवापरात बेकायदा गोष्टी सर्रास घडत होत्या. त्यांचे उच्चाटन करून लोकशाही संस्था पुन: प्रस्थापित करणे ही प्रेरणा या बंडामागे होती. क्रांती-करणाऱ्या सैनिकांची देशाच्या संरक्षणाविषयीची कल्पना संकुचित नव्हती. संरक्षण म्हणजे केवळ देशाच्या सीमांचे रक्षण नव्हे. सर्व नागरिकांना नागरिक अधिकार मिळणे याचाही आम्ही संरक्षणात समावेश करतो असे या सैनिकांचे म्हणणे आहे,

पोर्तुगालमधील लष्करी क्रांतीने मोझांबिक आणि अंगोला या पोर्तुगीज वसाहतींचा प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागेलच पण ही प्रक्रिया तेवढ्यावरच न थांबता ऱ्होडेशिया आणि दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या राजवटी विरुद्ध आफ्रिकनांनी चालविलेल्या लढ्यालाही त्यामुळे नवा जोर चढेल. आतापर्यंत आपली सत्ता टिकविण्यास या गोऱ्या राजवटींना पोर्तुगालचा मोठा आधार वाटे. पण हा आधार ढासळल्यावर आता आफ्रिकन राष्ट्रवाद्यांचा लढा दडपून टाकणे ऱ्होडेशिया व दक्षिण आफ्रिकेस जड जाईल. या दोन देशात आफ्रिकनांची सत्ता प्रस्थापित झाल्याशिवाय संबंध आफ्रिका खंड खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाले असे म्हणता येणार नाही. त्या शेवटच्या टप्प्याच्या लढ्याला आता तोंड लागेल.

□ □

# सोलकढी

## □ छत्तिसाच्या आकड्याची गोची

'माणूस'मधले 'सोलकढी' हे सदर नियमितपणे वाचणाऱ्या कढीचट वाचकांना माझा (पक्षी : अनंतरावांचा) मराठी नाटकांचा व्यासंग केवढा दांडगा आहे हे चांगले माहित आहे. परंतु जे दुर्दैवी वाचक हे सदर नियमितपणे वाचीत नसतील अथवा अनियमीतपणे वाचीत असतील त्यांच्यासाठी सांगतो की माझा मराठी नाटकांचा व्यासंग फार्फार दांडगा आहे. या व्यासंगाला जुन्या-नव्याची मर्यादा पडलेली नाही : मी जुनी नाटके पाहतो; नवी नाटके पाहतो. जुनी नाटके मला कळतात; नवी मला कळत नाहीत. जुनी नाटके मला आवडतात; नवी आवडत नाहीत. तुम्हाला माझी भूमिका समजावी यासाठी मी नव्या-जुन्याचा असा तौलनिक व सूत्रमय विचार मांडला. एरवी अस्सल नाटक आणि बेअस्सल नाटक, एवढाच भेद मी मानतो. या अनुरोधाने थोडे पुढे जाऊन मी असे म्हणतो की जुने मराठी नाटक हेच अस्सल नाटक आणि नवे मराठी नाटक हे बेअस्सल नाटक होय. नाटक अस्सल कोणते आणि बेअस्सल कोणते असा तात्त्विक प्रश्न येथे कोणी उपस्थित करील. परंतु त्या विषयाची चर्चा करायचे हे स्थळ नव्हे. शिवाय नाटक अस्सल कोणते आणि बेअस्सल कोणते ते नाटकवेड्या मराठी रसिकतेला पक्के ठाऊक आहे. असो

जुन्या-नव्या नाटकांबद्दलची माझी मते ती नाटके पाहून झाली आहेत. ही किरकोळ गोष्टही येथेच सांगून टाकतो. काही अधिकारी असामींना नाटके न पाहता त्यांच्याबद्दल ठामठोस व निर्णायक मते देण्याची सिद्धी प्राप्त झालेली असते. (माझे त्या दिशेने प्रयत्न चालले आहेत. कार्य सिद्धीस नेण्यास नटराज समर्थ आहे.) त्यांच्याबद्दल मला अपरंपार आदर वाटतो. मला मात्र मत देण्यापूर्वी नाटक पहावेच लागते. ते जुने असेल तर मी चैनीत असतो; नवे असेल तर मी बेचैन असतो. नाटक पाहण्यापूर्वी ते नवे असेल का जुने असेल याबद्दल एक ढोबळासा अंदाज तेवढा मी बांधत असतो. माझा अंदाज चुकत नसतो. १९ एप्रिलला मात्र तो साफ चुकला.

त्या दिवशी मुंबईच्या 'अनिकेत' या नाट्यसंस्थेने 'गोची' नावाच्या नाटकाचा (छत्तिसावा) प्रयोग सादर केला. नाटकाच्या पिचक्या नावामुळे मी खरे म्हणजे सावध व्हायला हवे होते. परंतु नाटकाची निमंत्रण पत्रिका इतकी लफ्फेबाज होती की मी भलताच अंदाज करायला प्रवृत्त झालो. सदर निमंत्रणपत्रिका वाचकांच्या सोयीसाठी मुद्दाम सादर करत आहे—

सप्रेम नमस्कार विनंती विशेष

आमचे येथे श्रीकृपेकरून सदानंद रेगे व अमोल पालेकर यांचे कन्यारत्न चिरंजीव गोची हिचा पहिला वाढदिवस तारीख १९ एप्रिल १९७४ इसवी. रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता पुरंदरे सभागृह (साहित्य संघ, केळेवाडी) येथे साजरा करण्याचे योजिले आहे !

जयराम हर्डीकर, दीपा श्रीराम, बाळ कर्वे, दिलीप कुलकर्णी, अनुया पालेकर ही कलाकार मंडळी या प्रसंगी सक्रिय उपस्थित राहतील.

शिवाय रामदास भटकळ यांनी चिरंजीव गोचीला चढवलेला छापील साजही बाहेर काढला जाईल ! तरी आपण या शुभप्रसंगी सहकुटुंब सहपरिवार, इष्टमित्रमैत्रिणीसह, लेकीसुनासह उपस्थित राहून चिरंजीव गोचीला आशीर्वाद द्यावेत ही विनंती ! कळावे !

आपले कृपाभिलाषी

गिरीश कर्नाड ! विजय तेंडुलकर

वरील विनंतीस मान देऊन अगत्य येण्याचे करावे !

श्रीराम लागू, पुष्पा भावे, माधव मनोहर.

नाटकाचे नाव, नाटककार, दिग्दर्शक, काम करणारी पोरेपोरी, जागा. आणि भोवतालचे एकूण कडेकोंडाळे किंवा गटगोतावळे पाहता नाटक नवे वाटत होते; पण निमंत्रणपत्रिकेतला भारदस्तपणा आणि खानदान मात्र नाटक जुने व अस्सल असावे, असे सुचवित होते त्यामुळे मी चुकलो. वाटले, नव्या नाटकाला जुन्या नाटकांकडून काही शिकायची सद्बुद्धी झाली असेल; तसे झाले तर मराठी रंगभूमीचे भाग्य उजळायला कितीसा अवकाश ?



पुरंदरे सभागृहात वेळेवर जाऊन पोहोचलो. चाळीसपन्नास तथाकथित जाणकार प्रेक्षकांनी सभागृह खच्चून भरले होते. सुरुवातीलाच माधव मनोहर (पक्षी : माधव मनोहर) आणि पुष्पा भावे यांनी नाटक, नाटककार आणि दिग्दर्शक यांचे भरतोंड कौतुक यथासांग केले. (श्रीराम लागू काही अपरिहार्य कारणामुळे येऊ शकले नाहीत, तथापि झालेल्या कौतुकात त्यांच्याकडून होणाऱ्या कौतुकाची भर घालायला आम्ही विसरलो नाही.) 'गोची' नाटकाने प्रायोगिक नाटकाची कोंडी फोडली आहे; हव्या त्या ठिकाणी हे नाटक करून 'अनिकेत'ने नाटकाचे अर्थकारण सोपे केले आहे; 'गोची' नाटकातून एक विलक्षण अनुभव प्रेक्षकांना मिळतो; त्याच्या प्रयोगात नवा जिवंतपणा असतो. या नाटकाच्या विशिष्ट शैलीमुळेच ते प्रस्थापित रंगमंचावर होऊ शकत नाही; या नाटकाचे अमोल पालेकरांचे दिग्दर्शन सृजनशील (म्हणजेच सर्जनशील) आहे; हे नाटक, नाटककार आणि दिग्दर्शक या दोघांचेही आहे. (या अखेरच्या तत्त्वानुसार मराठी नाटकांचे एक स्वतंत्र वर्गीकरण शक्य व्हावे. नाटककारांची नाटके, दिग्दर्शकांची नाटके, नटनटयांची नाटके, नेपथ्य-प्रकाशयोजनेची नाटके, प्रेक्षकांची नाटके, समीक्षकांची नाटके, मूळ लेखकांची, नाटके, वगैरे. या दिशेने झटून विचार केल्यास काही उद्‌बोधक निष्कर्ष हाती लागतील, हे मी तुम्हाला सांगतो. पण लक्षात कोण घेतो ?) या युक्तीच्या गोष्टी त्यांनी अधिकारवाणीने सांगितल्या.






माधव मनोहर आणि पुष्पा भावे यांनी 'गोची'च्या नाट्यप्रयोगाबद्दल आधी पढवून ठेवल्यामुळे त्यांनी म्हटलेले सगळे त्या नाट्यप्रयोगात आम्ही दिसवून घेतले. या नवनाट्यवाल्यांनी प्रत्येक प्रयोगाच्या वेळी अशी काही सोय केल्यास बरे होईल. अशा बोलटयांना नटवर्गातच स्थान द्यायला काय हरकत आहे ? असो.

आम्ही हा जो प्रयोग पाहिला तो बाढदिवसाचा प्रयोग होता म्हणे. याचा अर्थ असा की गेले सबंध वर्षभर 'गोची'चे प्रयोग अखंडपणे होत राहिले होते. नवनाट्यवाल्यांनी उभय हातांनी आपली पाठ थोपटून घ्यावी असाच हा चमत्कार होता. चालणारे नवनाटक ही गोष्ट बोलणाऱ्या मुक्याइतकीच अशक्य आहे, अशी आमची समजूत होती. नाटकाचे हजारपाचशे प्रयोग ढामढुम झाल्यानंतर त्याचे 'चालणे' साजरे करण्याच्या कुलवंत परंपरेत आम्ही वाढलो. त्यामुळे प्रयोगसंख्येच्या छत्तिसाच्या आकड्याचे कौतुक आम्हाला फारसे वाटले नाही तर नवनाट्यवाले राग मानणार नाहीत अशी आशा आहे.

खरे म्हणजे जुने नाटक विरुद्ध नवे नाटक हे छत्तिसाच्या आकड्याचे भांडण आता खूप झाले. ते थांबायला हवे. आपण सारी रंगभूमीची लाडली लेकरे आहोत. लेकरांनी आपसात खरेखुरे भांडायचे नसते. खोटे खोटे भांडावे. त्याने मातेला हसूच येते. मातेला रडू आणणारे खरेखुरे भांडण भांडणे लेकरांना लांछनास्पद आहे. अडचण एकच आहे—भांडण खरोखरच मिटले तर नाट्यसंमेलनाच्या मान्यवर अध्यक्षांना बोलण्यासारखे काहीच उरणार नाही. त्यांची अगदी गोची होईल !

—अनंतराव

# मिरांडा यांचे तलासरी भागातील 'मिशन'

अ. सि. केळुसकर

नासिक येथून प्रसिद्ध होणाऱ्या महाराष्ट्र प्रबोधन सेवामंडळाच्या 'आपण' या साप्ताहिकातर्फे एक परिसंवाद शांतिवन शेतकरी सेवा मंडळ, आशागढ-डहाणू येथे फेब्रुवारीत आयोजित करण्यात आला. त्याला पुणे, नासिक व मुंबई येथील काही पत्रकार व समाजसेवक हजर होते. आशागढ-कनाडगाडा यामधील आदिवासींची लुबाडणूक व पिळवणूक सावकार, जमीनदार, सरकारी यंत्रणा व राजकीय पक्ष कशी करीत आहेत, त्याची माहिती व शांतिवन शेतकरी सेवामंडळातर्फे जे कार्य आशागढचे मिशनरी फादर स्तॅनी मिरांडानी सेवाभावी वृत्तीने चालविले आहे त्याचा परिचय पत्रकार व समाजसेवक यांना त्या त्या ठिकाणी घेऊन जाऊन करून द्यावा हाही उद्देश या परिसंवादाच्या मुळाशी होता. त्याप्रमाणे या मंडळींना त्या संबंधित भागात आदिवासींच्या निरनिराळ्या पाड्यांवर नेण्यात आले— इतकेच नव्हे तर तलासरीसारख्या दूरच्या भागातूनही फिरवून आणण्यात आले. ज्यांना सावकार, जमीनदार व सरकारी अधिकारी व राजकीय पक्ष यांची झळ पोचली होती अशा कुळांची निवेदने, कैफियती ध्वनिमुद्रितही करण्यात आल्या.

या माहितीच्या आधारे जो परिसंवाद नंतर दोन दिवस झाला, त्यामध्ये तालुका पंचायतचे अॅ. एम. एम. राऊत व स्थानिक सर्वोदय कार्यकर्ते श्री. भट यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. श्री. भट यांनी सांगितले, की आदिवासीमध्ये दारूचे जबरदस्त व्यसन, अभिजात आळस व जीवनाकडे बेफिकीरीने पहाण्याची प्रवृत्ती यामुळे त्यांच्या जीवनाच्या साऱ्याच समस्या बिकट झाल्या आहेत.

अॅ. राऊत यांनी सांगितले, की सरकारने आदिवासींना सर्व प्रकारचे संरक्षण देण्यासाठी व त्यांना त्यांचे जीवनमान सुधारण्याची संधी देण्यासाठी विविधलक्षी योजना दिल्या आहेत. परंतु त्या योजनांचे लोण त्यांच्यापर्यंत पोचविणारी व त्यांच्यासाठी झटणारी अशी कार्यक्षम यंत्रणा व सेवाभावी वृत्तीच्या कार्यकर्त्यांचा अभाव यामुळे आदिवासींच्या जीवनात फारसा बदल झालेला दिसत नाही. त्याला सरकारपेक्षा सावकार व जमीनदार हाच आपला त्राता असे वाटते. आणि जमीनदार आपली पिळवणूक सर्व बाजूंनी करीत आहे याची त्याला जाणीव असतानाही व त्याच्याविरुद्ध जोरदार तक्रार असूनही शेवटी तो अगतिकतेने त्यालाच शरण जातो व तोच आपला त्राता व अखेरचे आश्रयस्थान आहे, अशी त्याची पक्की समजूत झालेली आहे.

अशा परिस्थितीत आशागढच्या फादर स्तॅनी मिरांडा यांनी आदिवासी कुळांना सावकार, जमीनदार, सरकार व कम्युनिस्टांसारखा राजकीय पक्ष यांच्या तावडीतून वाचविण्यासाठी जे प्रयत्न चालविले आहेत ते स्तुत्य आहेत, हे सर्वांनी मान्य केले.

कम्युनिस्टांनी आदिवासी जनतेमध्ये जागृती घडवून आणली हे सर्वश्रुत व सर्वमान्य आहे. त्यांनी तलासरी येथे नुकताच एक आदिवासी मेळावा भरविला व आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी सावकार व जमीनदार यांच्याविरुद्ध संघटित उठाव यथासमय करण्याची घोषणाही केली.

तथापी आजचे आदिवासीभागातील कम्युनिस्ट कार्यकर्ते हे आदिवासी कुळांच्या हिताला जपण्यापेक्षा जमीनदार व सावकार यांचे हित पहातात व त्यांना विकत घेण्याची पैशांची जादू सावकार व जमीनदार यांच्याकडे असल्यामुळे एकेकाळी गोदावरी परुळेकरांनी जी जागृती व क्रांती घडवून आणली त्या सर्वच गोष्टीवर पाणी पडले आहे. आज परिस्थिती अशी असल्याचे दिसते की स्तॅनी मिरांडासारखे आदिवासींचे कैवारी हे त्यांना आपले साक्षात वैरी वाटत आहेत आणि त्यांची मदत आदिवासी कुळांनी घेऊ नये म्हणून त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती करण्यापर्यंत व त्यांना धाकदपटशा दाखविण्यापर्यंत त्यांची मजल गेली असल्याचे निदर्शनास आले.

त्याचबरोबर फादर स्तॅनी मिरांडा हे धर्मांतरासाठी ही सारी समाजसेवा व आदिवासी कुळांचा उद्धार करून राहिले आहेत, असा प्रचार काही गोटातून, विशेषतः जमीनदार व कम्युनिस्ट यांच्या गोटातून चालू असल्याचे दिसून आले. याबाबत मी फादर स्तॅनी मिरांडा यांना विचारले असता, त्यांनी हे मान्य केले की धर्मप्रचार करणे व त्यामधून शक्य तर धर्मांतर घडवून आणणे, हे मिशनचे कार्य असते हे सर्वश्रुतच आहे. ही गोष्ट मी नाकारीत नाही. परंतु आदिवासींच्या असहायतेचा फायदा घेऊन मी त्यांच्यावर माझा धर्म लादल्याचे एकतरी उदाहरण मला कोणीही दाखवून द्यावे. चतकोर भाकरीच्या तुकड्यासाठी धर्मांतर घडवून आणण्याला माझा स्वतःचा विरोध आहे. आज आदिवासींना स्वतःचा असा विशिष्ट धर्म आहे, तो अनादिकालापासून चालत आला आहे. परंतु त्यांना सर्वसाधारण माणसाप्रमाणे जगण्याची संधी उपलब्ध करणे ही आजची खरी गरज आहे. त्यादृष्टीने माझे सारे प्रयत्न चालले आहेत. त्यांच्याबाबतीत धर्मांतराची बाब अतिशय गौण आहे.

याभागातील कम्युनिस्ट कार्यकर्ते श्री. बी. एल. धनगर यांची मुलाखत घेतली असता त्यांनी अशी तक्रार केली की, ही मिशनरीमंडळी परदेशातून मदत मिळवतात, त्या मदतीचा उपयोग ते धर्मांतराच्या कार्यासाठी करीत असतात. फादर स्तॅनी मिरांडाचे आदिवासी कुळांना मदत करण्याचे कार्य कितीही स्तुत्य असले तरी त्यांच्या मदतीमागच्या या पार्श्वभूमीकडे आम्ही दुर्लक्ष करू शकत नाही. परदेशातून येणारी सारी मदत शासनामार्फतच राबविली जावी. मिशनरी वा अन्य त्रयस्थ तिथे नसावा अशी आमची भूमिका आहे.

आता स्तॅनी मिरांडा व त्यांची यंत्रणा या परदेशी मदतीचा विनियोग कसा करतात व आदिवासींमधील त्यांच्या कार्याचे स्वरूप काय

आहे हे मी दोनदा आशागढला जाऊन प्रत्यक्ष पाहिले. स्तॅनी मिरांडा यांची पूर्वपीठीकाही जाणून घेतली. स्तॅनी मिरांडाच्या कार्याचा परिचय करून देण्यापूर्वी त्यांच्यासंबंधी प्रथम दोन शब्द सांगतो.

स्तॅनी मिरांडा हे मूळचे मुंबईतील वांद्रे येथील रहिवासी. १९३८ साली त्यांनी दीक्षा घेतली म्हणजे ते मिशनरी झाले. त्यांचे वडीलबंधू जोसेफ मिरांडा हेही मिशनरीच आहेत. वांद्र्याच्या सेंट पीटर चर्चमध्ये मिशनरी जीवनाला सुरुवात केल्यावर व त्याठिकाणी धर्मशिक्षण व सेवाभावी वृत्तीचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांना बिहारमधील हजारीबाग येथे मिशनचे काम पहाण्यासाठी पाठविण्यात आले. त्याठिकाणी ते १९३७ ते १९४२ पर्यंत राहिले. त्यानंतर त्यांची बदली दक्षिण भारतामधील सुप्रसिद्ध कोडिकमधील शिवाणूर येथे झाली. तेथे ते १९४२ ते १९४५ सालपर्यंत राहिले. त्यानंतर मुंबईच्या सेंट झेविअर हायस्कूलमध्ये त्यांनी १९४५ ते १९४८ अशी तीन वर्षे शिक्षकाचे काम केले.

'फादर स्तॅनी मिरांडानी महाराष्ट्रात कार्य करावयाचे म्हणजे त्यांना मराठी आले पाहिजे. म्हणून ते मराठी शिकण्यासाठी एक वर्ष वसई येथे राहिले. त्यानंतर १९५० साली त्यांना धर्मशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी पुण्याला पाठविण्यात आले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते दार्जिलिंगमधील कुमांग येथे गेले व तेथे १९५१ ते १९५३ पर्यंत राहिले. त्यानंतर त्यांना ठाणे जिल्ह्यातील तलासरी येथे पाठविण्यात आले.'

## शेतीशिक्षणासाठी परदेशगमन

स्तॅनी मिरांडा यांनी पाहिले की भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये शेतकऱ्यांमध्ये कार्य करावयाचे म्हणजे शेतीचे ज्ञान असणे अत्यावश्यक आहे आणि म्हणून कृषिशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी ते १९५३ साली कॅनडाला गेले. तेथे १९५३ ते १९५६ अशी तीन वर्षे शेतीचे शिक्षण घेण्यात घालविली.

कॅनडा, अमेरिका आदि देशातून शेती शिक्षणाचा दौरा करून ते १९५६ साली भारतात परत आले व त्यांची तलासरीच्या मिशन हाऊसमध्ये नेमणूक करण्यात आली. तेथे दहा वर्षे त्यांनी आदिवासी भागात काम केले आणि आता गेली आठ वर्षे ते आशागढमध्ये आदिवासी मुलुखात काम करीत आहेत.

फादर स्तॅनी मिरांडा यांनी आदिवासी विभागात गेली सतरा वर्षे सावकार, जमीनदार, सरकार व त्यांचे पोलीस यांच्या अन्यायअत्याचारांविरूद्ध संघर्षाचेही काम केले आहे. या सतरा वर्षाच्या काळात तलासरी भागात शिसन येथे दोन पोलिसांनी एका आदिवासी स्त्रीवर बलात्कार केला असता ते प्रकरण हाती घेऊन स्तॅनी मिरांडांनी त्या गुन्हेगार पोलिसांना शिक्षेवर पाठवून खुद्द पोलिसखात्यालाच चांगली जरब बसविली आणि आशागढ, डहाणू भागातील सावकार, जमीनदार यांच्या आदिवासींवरील जुलूमजबरदस्तीच्या प्रकरणात खुद्द जिल्हा पोलिसअधिकाऱ्यांपर्यंत धाव घेऊन आणि प्रसंगविशेषी वकील करून आदिवासींना न्याय मिळवून दिला. याप्रसंगी जंबुनाथन हे जिल्हाधिकारी व अॅ. एम. एम. राऊत हे तालुका पंचायतचे सभापती यांचे बहुमोल सहाय्य फादर मिरांडांना झाले हे येथे नमूद करायला हवे.

फा. मिरांडा यांनी आपण आदर्श शेतकरी असल्याचेही सिद्ध केले आहे. नाझरी या खेड्यात १०० एकर जमिनीत भाताचे उत्तम पीक काढून दाखवून त्याबद्दल रु. १००० चे उत्तम पिकाचे बक्षीस आदिवासींना त्यांनी मिळवून दिले आहे. खुद्द आशागढ येथील विश्वोदय आश्रमाच्या एकेकाळीच्या मरूभूमीत साक्षात नंदनवन फुलविले. या एक एकराच्या जमिनीत उत्तम प्रतीचा मका, वांगी, टोमॅटो, रताळी, मिरची, बीट, पपया, सावरमूळ आदींची लागवड करून आदर्श शेतीचे शिक्षण ते आदिवासींना देत असतात. आपल्या जवळील ट्रॅक्टरांचा उपयोग आदिवासींच्या जमिनी नांगरण्यासाठी करीत असतात. इतकेच नव्हे तर एखाद्या सावकार जमीनदाराने आपल्या हस्तकांकरवी आदिवासी कुळाचे पीक कर्जाच्या मोबदल्यात जबरदस्तीने कापून नेण्याचा प्रयत्न केला तर आपली माणसे पाठवून ते त्या कुळाला संरक्षण तर देतातच, शिवाय त्याचे पीक कापून आणून ते आपल्या कोठारात ठेवण्याची दक्षता घेतात.

## आदिवासींची २०० बँक खाती

अशा रीतीने अनेक आदिवासी कुळांच्या धान्याची बँक त्यांनी उघडली असून, त्या धान्याचा उपयोग आदिवासींना त्यांच्या अडीअडचणीच्यावेळी होत असतो. त्यांनी अशा रीतीने २०० आदिवासींची खाती बँकातून उघडली असून, त्यांचा पैसा सुरक्षित ठेवण्याची कायमची तरतूद केली आहे. याबाबतीत फा. स्तॅनी मिरांडा यांचा व्यवहार इतका चोख आहे की, त्यांच्या वैयक्तिक हमीवर आदिवासींना बँक कर्ज देण्यास तयार असते आणि विकास गटाधिकारीही त्या आदिवासींना आवश्यक ते सहाय्य व इतर सवलती मोठ्या खुशीने देत असतात. फा. मिरांडांच्या चोख कारभाराची व कार्यक्षमतेची त्यांना मिळालेली ही पावतीच होय, असे म्हटले पाहिजे.

आदिवासी व इतर गोरगरीब जनतेला औषधपाणी अत्यल्प शुल्क घेऊन देण्याचे कार्य या आश्रमातर्फे दर रविवारी व सोमवारी चालते. ही परदेशी औषधे फार जालीम व कडक असल्यामुळे ती घेणाऱ्या रुग्णाईताना पौष्टिक अन्न मोफत देण्याची तरतूदही आश्रम करतो.

सोमवारी महारोग्यांसाठी खास आरोग्यकेंद्र चालविण्यात येत असते. या ठिकाणी गुपचुप औषधोपचार करून घेण्यासाठी मुंबईहून रोगी येत असल्याचे मी पाहिले आहे.

## एका लढ्याची सांगता

अशा या स्तॅनी मिरांडांना त्यांनी चालविलेल्या लढ्यात प्रथमच जे यश आले, त्याची कहाणी याठिकाणी सादर करणे अप्रस्तुत ठरणार नाही.

डहाणू आशागढच्या भागातील अनेक आदिवासींची जमीन सावकारांनी त्यांना आपल्या हस्तकाकरवी मारझोड करून सक्तीने कागदपत्रावर आंगठे घेऊन आणि तलाठी, मामलेदार व पोलीस यांच्याशी संगनमत करून बळकावल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यापैकी कनाडपाडा या गावचे हे प्रकरण विलक्षण बोलके आहे. हकीकत अशी आहे.

गेल्या वर्षीच्या आठ नोव्हेंबर रोजी कनाडपाड्याचे सदू थापड व त्याचा भाऊ लक्ष्मण थापड हे जमीनदार अनिल चोरडिया याच्या डहाणू येथील घरी आपल्या रु. ७५ कर्जाची परतफेड करण्यासाठी गेले. त्यांनी रु. १०० व्याजासकट दिले व जमीनदार सावकाराने

जबरदस्तीने घेतलेली गाडीची सावटी परत देण्याची विनंती केली. त्यांना सावटी तर मिळाली नाही, परंतु सक्त मार मिळाला नाइलाजाने त्यांना परत फिरावे लागले.

त्याच दिवशी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास लक्ष्मण थापड डहाणू स्टेशनातून परत येत असता अनिलच्या दोन हस्तक भय्यांनी त्याला गाठले व ते त्याला जबरदस्तीने अनिलच्या वाडीवर घेऊन गेले. तेथे त्यांनी त्यांना सपाटून पिटून काढले. त्याने जमीन लिहून द्यावी म्हणून हा सारा अत्याचार त्यांच्यावर करण्यात आला. त्यानंतर रात्री १२ वाजता मोटरसायकलवर जबरदस्तीने बसवून डहाणू रोडवरील अनिलच्या घरी नेण्यात आले. तेथे त्याला दुसरे दिवशी संध्याकाळपर्यंत जबरदस्तीने डांबून ठेऊन जबरदस्त मारहाण करण्यात आली, असा आरोप आहे.

राघू बाबू थापड यालाही तो जमीन लिहून देत नाही म्हणून अशीच मारहाण करणाऱ्या भय्याने त्याची कोंबडी, मटका, मिरची वगैरे माल जबरदस्तीने नेला. त्यावेळी सदू थापड पळून गेला म्हणून वाचला.

### १५० आदिवासी कुळांची व्यथा

२७ नोव्हेंबर रोजी सदू थापड अंबलसारच्या एका वारल्याला घेऊन फादर स्तॅनी मिरांडाकडे आला. कारण या अंबलसारच्या एका आदिवासीला त्यांनी सावकार-जमीनदाराच्या तावडीतून वाचविले होते. त्यांनी सर्व हकीकत सांगितली आणि सावकाराच्या माणसांनी गवत व पीक कापून आणून ते आपल्या गुदामात सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केली.

त्यानंतर सदू थापड इतर कुळांना घेऊन आला व अनिल सावकाराने आपली जमीन कशी जबरदस्तीने हिसकावून घेतली ते सांगितले. तेव्हा फादरनी ॲ. चंद्रकांत अमृतलाल शहा यांच्याकडे त्याची सारी प्रकरणे सोपविली. अशा रीतीने अनिल चोरडिया सावकाराने जबरदस्तीने जमीन काढून घेतलेल्याची आणि प्रसंगी विशेष मारझोड करविल्याची १५ कुळांची प्रकरणे या चंद्रकांतभाई शहा उर्फ कडूभाई यांनी धसास लावण्याचे ठरविले आहे. या साऱ्या प्रकरणात तालुका पंचायतीचे सभापती ॲ. एम. एम. राऊत यांनी लक्ष घातले. शेवटी या प्रकरणात खुद्द मामलेदार श्री. महाले यांनी लक्ष घालण्याचे मान्य केले व १७ मार्च रोजी प्रत्यक्ष वादग्रस्त ठिकाणी जाऊन पहाणी करण्याचे ठरविले. मला फा. स्तॅनी मिरांडांकडून पत्र आले म्हणून मी १६ रोजी डहाणू आशागढला गेलो.

प्रत्यक्ष ठिकाणावर मामलेदार, अनिल चोरडिया, त्याचे वकील वोयरा, आदिवासी कुळाचे वकील चंद्रकांतभाई शहा, तालुका पंचायतीचे सभापती ॲ. एम, एम. राऊत, डहाणू तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष गोपालभाई माळी वगैरे मंडळी होती. जमिनीचे मोजमाप तासनतास चालले होते. जमीन जबरदस्तीने हिरावून घेण्यात आली असल्याचे प्राथमिक पहाणीतच मामलेदारसाहेबांच्या लक्षात आले. त्याचप्रमाणे घेतलेल्या जमिनीच्या बदल्यात दुसरीही जमीन देण्यात आली असल्याचे दिसून आले. अशी बदली जमीन देण्याची कायद्यात तरतूद नाही असे मामलेदार म्हणाले.

दरम्यानच्या काळात मी व गोपालभाईने अनिल चोरडियाला गाठले, अनिलसंबंधी तक्रारवजा मजकूर 'आपण 'मध्ये आला होता. त्याचा उल्लेख करून मी त्यांना म्हणालो, अनिलभाई तुम्ही माझ्या मुलासारखे आहात, अनिलभाई हा जुलमी सावकार आहे, तो कुळांना मारझोड करतो, त्यांची जमीन जबरदस्तीने हिसकावून घेतो, असे तुमचे चित्र वर्तमानपत्रातून रंगविले जावे, अनिल म्हणजे राक्षस—सैतान असे तुमच्याविषयी लिहिलं जावं हे मला पसंत नाही. तुम्ही कुळांना त्यांची जमीन परत केली असे लिहिण्याची संधी तुम्ही मला द्या.

मी त्यांना पुढे असेही म्हणालो : तुम्हाला या आदिवासींच्या मुलुखात येऊन त्यांना देशोधडीला लावून अन्नान्न मोताद करण्याचा काहीच अधिकार नाही. खरे म्हणजे या जमिनीत तुम्ही उपरे आहात. तरीही मी तुम्हाला सांगेन हे प्रकरण सामोपचाराने मिटवा. वाटाघाटी करून या पेचप्रसंगातून तोड काढता येईल. माझे म्हणणे एवढेच, की तुम्ही जगा आणि या आदिवासींना सुखासमाधानाने जगू द्या. परमेश्वराने तुम्हाला खूप काही दिले आहे. दोन-अडीच एकर जमीन घेऊन तुमचे काय भले होणार आहे, याचा तुम्ही विचार करा.

गोपालभाई माळीनीही त्यांना समजावून सांगितले.

आणि शेवटी एकंदर पारडे आपल्याविरुद्ध फिरले आहे याची अनिलभाईंना जाणीव झाली. त्याच्या वकिलांनी त्यांना एकंदर परिस्थिती समजावून सांगितली तेव्हा त्यांनी बऱ्याच वेळाने तडजोडीची तयारी दाखविली. दोन्ही पक्षांच्या वकिलांच्या चार तासांच्या वाटाघाटीनंतर तडजोडीचा मसुदा तयार झाला आणि जी वादग्रस्त जमीन घेण्यात आली ती १५ कुळांना परत देण्याच्या मसुद्यावर उभयपक्षी एकवाक्यता झाली. आम्ही रात्री ९-१५ वा. मुक्कामाला पोचलो.

इतक्या लवकर व इतक्या चांगल्या रीतीने तडजोड होईल अशी अपेक्षा फा. स्तॅनी मिरांडा यांनी केली नव्हती. या समेटात परमेश्वराचाच हात व त्याची इच्छा शेवटी प्रभावी ठरली आहे असे त्यांच्या मनाला वाटणे स्वाभाविक आहे. मला वाटते या साऱ्या यशाचे श्रेय श्री. अनिल चोरडिया यांनाही दिले पाहिजे. त्यांचे हृदयपरिवर्तन झाले नसते तर ? ☐ ☐


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

कॅलिफोर्नियात सॅनडिअॅगो येथे एक विमान बांधणीचा कारखाना आहे. १९३८ मध्ये त्या कारखान्यात 'विल्हेम जी स्किबोल्ड' नावाचा एक मेकॅनिक होता. त्याचा जन्म जर्मनीतील रुहर खोऱ्यात म्यूलहीम या गावी झाला होता. रूहर नदीत डुंबण्यात त्याचे बालपण गेले होते. सोळाव्या वर्षापासून लढाई संपेपर्यंत जर्मन सेनेतील मशिनगनर म्हणून तो पहिल्या महायुद्धात लढला होता. पहिल्या युद्धात जर्मनीचा पराभव झाला. साऱ्या जर्मनीवर बेकारी व उपासमार थैमान घालू लागली. दोन वेळचे अन्नाला भ्रांत पडू लागली. याला कंटाळून विल्हेम अमेरिकेत आला. अमेरिकेत त्याला नोकरी मिळाली. आपल्या सारख्याच एका जर्मन पोरीबरोबर त्याने विवाह केला. पोरेबाळे झाली. दहा जणांसारखा तो सुखाने संसार करू लागला. त्याने अमेरिकेचे नागरीकत्वही मिळवले. पण तरीही आपला जर्मनपणा त्याने सोडला नव्हता. त्याचे घरात जर्मन भाषा चाले. घराची मांडणी जर्मन पद्धतीची होती. कपड्यालत्त्यावर खास जर्मन छाप दिसे. घरात जर्मन पद्धतीचे अन्न शिजवले जाई. त्याचे बहुतेक मित्र जर्मन होते. अमेरिकेत रहाणाऱ्या जर्मन वंशाचे लोकांचे संघटनेचा तो एक सन्मान्य सभासद होता. त्याचे वयाने चाळिशी गाठली होती. आणि तो एकंदरीने सुखी समाधानी जीवन जगत होता. त्याचे वृद्ध आई. वडील, भाऊ, बहीण, त्यांची मुलेबाळे सारी जर्मनीतच होती. त्यांची पण स्थिती सुधारली होती. जर्मनीही आता पुन्हा प्रबळ झाला होता. जर्मन गरुड पुन्हा पंख फडफडवू लागला होता. त्यामुळे युरोपात युद्धाचे ढग जमू लागले होते. "युद्धाचा भडका उडण्याचे आधी एकदा गावी जावे. घरच्या सर्वांना भेटावे. नातेवाईक, इष्टमित्र यांचे संगतीत चार दिवस मजेत काढावे. अमेरिकेत आल्यापासून परत

जाणे जमले नाही. आता जाऊन आलो नाही तर पुढे जाणे जमणार नाही. युद्धानंतर सर्वजण भेटतीलच याची शाश्वती नाही, असा विचार करून त्याने वर्षाची रजा काढली. बायको, मुले अमेरिकेतच ठेऊन तो एकटाच एका जर्मन उतारू बोटीने जर्मनीतील हॅम्बूर्ग या बंदराला आला. हॅम्बूर्गचे धक्यावर तो मोठ्या खुशीने उतरला.

आपले सामान घेऊन तो कस्टम शेडमध्ये आला. पासपोर्ट तपासणी अधिकाऱ्याला त्याने आपला पासपोर्ट दिला. त्या अधिकाऱ्याने तो पासपोर्ट दोन दोनदा तपासला. त्याचे फोटोकडे व चेहऱ्याकडे बराच वेळ निरखून पाहिले. मग तो म्हणाला, "माफ करा ! पण आपणाला आमचे हेडक्वार्टसला आले पाहिजे. तेथे मोठे साहेब तुमचेबद्दल काय तो निर्णय घेतील." त्याने खूण करताच दोन शिपाई पुढे आले. त्यांनी स्किबोल्डचे सामान कस्टम तपासणी शिवायच उचलले. त्यांचे मागोमाग स्किबोल्ड बाहेर पडला. त्यांना कुणीच अडवले नाही. बाहेर एक काळी मर्सिडीझ कार उभी होती. तिच्यात त्यांनी स्किबोल्डचे सामान ठेवले. त्यांचे बरोबर स्किबोल्ड गाडीत बसला. गाडी हॅम्बूर्गचे रस्त्यावरून धाऊ लागली. 'काय भानगड आहे' असा विचार करीत स्किबोल्ड बरेच दिवसांनी पुन्हा दिसणारे जर्मनीतील दृश्ये पहात होता. काहीतरी गैरसमज झाला असणार, आपण साहेबाला समजावून सांगू अशा कल्पनेने तो निर्धास्त होता. शेवटी ती गाडी एका इमारतीचे कापौंडमध्ये शिरली. त्या शिपायांचे बरोबर लिफ्टमधून स्किबोल्ड वरचे मजल्यावर गेला. एका प्रशस्त अशा खोलीत त्याला नेण्यात आले. खोलीत मोजकेच पण किमती फर्निचर होते. टेबलाजवळ एक गेस्टॅपोचा अधिकारी कागदांची चाळवाचाळव करीत बसला होता. शिपायांनी त्याला 'हेल हिटलर' करून सलामी दिली.

कागदातून मान वर करून त्याने पाहिले. 'स्किबोल्डला पाहून खुर्चीवरून उठून तो अधिकारी चार पावले पुढे आला. स्थानीक गेस्टॅपोचा तो मुख्य अधिकारी होता. त्याने स्किबोल्डचे हार्दिक स्वागत केले. त्याला बसायला खुर्ची दिली. शिपायाला परत जायला सांगितले. मग बराच वेळ तो स्किबोल्डला हिटलर व त्याचे हजार वर्षाचे जर्मन साम्राज्य याबद्दल सांगत बसला. हिटलर जर्मनीला पुन्हा वैभवाच्या शिखरावर बसवणारच याची त्याने स्किबोल्डला जाणीव करून दिली. मग तो म्हणाला, "तुम्ही सॅनडिअॅगो येथील विमान कारखान्यात मेकॅनिक अहात ना ? तुमच्यासारख्या माणसांचीच आज पितृभूमीला गरज आहे."

"पितृभूमी ? मी तर आता अमेरिकन नागरिकत्त्व स्वीकारले आहे ?" स्किबोल्डने बोलण्याचा प्रयत्न केला.

"असेल ! पण पितृभूमी ही अशी कागदी चिठोऱ्याने बदलता येणारी गोष्ट का आहे ? तुम्ही जन्मजात जर्मन आहात. तेव्हा जर्मनी हीच तुमची पितृभूमी आहे. मरेपर्यंत तुम्ही जर्मनच रहाणार. तेव्हा पितृभूमीचे कामाचा तुमचा वाटा तुम्ही उचलला पाहिजे. हे पहा तुमचे अॅनडिअॅगो येथील कारखान्यात तयार होणाऱ्या विविध प्रकारचे विमानांचे ब्लू प्रिंटस कृपा करून ते नीट तपासून ते बरोबर आहेत का ते आम्हाला सांगा." असे म्हणून त्याने आपल्या टेबलाजवळचेच शेल्फवरून एक ब्लू प्रिंटसचे भेंडोळे उचलून ते स्किबोल्डकडे सरकवले. स्किबोल्डने ते भेंडोळे पाहिले. कारखान्यात कामावर असताना सुद्धा कधी त्याचे नजरेस ब्लू प्रिंटस पडले नव्हते. पडणारच कसे ? ती होती कारखान्याची खास गुपिते. स्किबोल्ड होता एक साधा मेकॅनिक. त्यामुळे त्या भेंडोळ्याकडे चकीत होऊन पहात तो म्हणाला, छेऽ ! छेऽ ! मी असले काम

**चारुदत्त दाभोळकर**



मुळीच करणार नाही. ही तर हेरगिरीच होईल."

"तुम्ही पितृभूमीचे हेरखात्याचे कचेरीतच बसला आहात. पितृभूमीसाठी हे काम करणे तुमचे कर्तव्यच आहे. तुमचे आई-वडील, सगेसोयरे सगळेजणच जर्मनीत आहेत. तुम्ही आता गावी जा. घरचे माणसासह मजेत सुट्टी घालवा. मी काय सांगितले याचा निवांतपणे विचार करा. तुमची कर्तव्य बुद्धी तुम्हाला योग्य तोच मार्ग दाखवील व जाण्यापूर्वी तुम्ही तुमचा होकार आम्हाला कळवाल यात मला तरी मुळीच शंका नाही." असे सांगून त्याने स्किबोल्डला रजा दिली.

स्किबोल्ड आपले जन्मग्रामी आला. साऱ्यांना खूप आनंद झाला. सर्वांचे आनंदावर विरजण नको म्हणू हॅम्बूर्गमधील गेस्टॅपोचे कचेरीतील भेटीबद्दल गावात कुणालाच काही सांगितले नाही. एकंदर दिवस मजेत गेले. आपल्यावर पाळत आहे ही गोष्ट अधून मधून स्किबोल्डला जाणवत होती. पण त्याचेकडे दुर्लक्ष करावयाचे त्याने ठरवले. गेस्टॅपोची पाळत जर्मनीत कुणालाच नवीन नव्हती. होता होता सुट्टी संपली. परतीचे प्रवासासाठी साऱ्यांचा निरोप घेऊन तो परत हॅम्बूर्गला आला. त्याचे बोटीचे परतीचे तिकीट त्याचे जवळ होतेच. एकदा बोटीने बंदर सोडले की झाले असा विचार करीत तो हॉटेलातील खोलीत शिरला. दुसरे दिवशीच तर बोट हॅम्बूर्ग सोडणार होती. लवकर उठायचे होते म्हणून दिवा मालवून त्याने बिछान्यात अंग टाकले. तो गाढ झोपी गेला. मध्यरात्री त्याचे दार ठोठावले गेले. दारात तोच गेस्टॅपोचा अधिकारी व त्याचे दोन दुय्यम अधिकारी उभे होते. दार उघडताच ते तिघेही आत शिरले. आत शिरताच त्यांनी दार लाऊन घेतले. मुख्य-अधिकाऱ्याने रुद्रावतार धारण करून दरडावले, 'काय ठरला मग तुझा बेत?' बाकी दोघांनी स्किबोल्डचे सामान, कपडे तपासायला सुरुवात केली.

"मला हेरगिरी करायला लावू नका. मी ते काम करणार नाही." स्किबोल्ड चाचरत म्हणाला.

"बेशरम!" असे म्हणून त्या अधिकाऱ्याने स्किबोल्डला जोरात ढकलले. तो खाली पडला. त्याला तसेच टाकून ते सर्व जण खोली बाहेर पडले. धडपडत उठून त्याने आपले सामान आवरले. सगळे काही जागेवर होते. फक्त त्याचा अमेरिकन पासपोर्ट गायब झाला होता. पण आता तो आपले अमेरिकन नागरिकत्व कसे सिद्ध करणार होता. कोणतेच कागदपत्र जवळ नसणे हा जर्मनीत गुन्हा होता. त्या आरोपाखाली आता गेस्टॅपो त्याचे वाटेल तसे हाल करू शकत होता. शेवटी जन्माने जर्मन म्हणून तो जर्मन नागरीकच ठरत होता. उरली रात्र त्याने याच विचारात काढली. पहाटे पहाटे त्याचा विचार पक्का झाला. गेस्टॅपोला हो म्हणून चांगलाच धडा शिकवायचा. गेस्टॅपो मुख्यकचेरीला त्याने फोन केला. मी तुमचे बाहेर नाही. त्याला ताबडतोब हॅम्बूर्गहून कोलोन येथे नेण्यात आले. तेथील अधिकाऱ्यांनी त्याची कसून चाचणी घेतली व त्याला खास शिक्षणासाठी हेरखात्याचे शाळेत दाखल केले. त्यासाठी त्याला त्याचे बायकोचे नावे 'आईचे आजारपणामुळे मुक्काम वाढवावा लागत आहे' अशा अर्थाचे पत्र पाठवण्यास लावण्यात आले.

पण त्याचे पासपोर्टची मुदतही संपत आली होती. स्किबोल्ड अमेरिकन नागरिक म्हणूनच परत अमेरिकेत जाणे जर्मन हेरखात्याला आवश्यक होते. त्यासाठी बरोबर गेस्टॅपोची दोन माणसे देऊन त्याला कोलोन-

मधील अमेरिकन कॉन्सुलेटमध्ये पाठवण्यात आले. लढाई नुकतीच सुरू झाली होती. त्यामुळे अमेरिकन कॉन्सुलेटमध्ये अमेरिकेला परत जाऊपहाणाऱ्यांची एकच झुंबड उडाली होती. त्या गर्दीत गेस्टॅपोचे माणसांना झुकांडी देऊन स्किबोल्डने कॉन्सुलेटमधील एका अधिकाऱ्याला गाठले. आपला पासपोर्ट त्याचे पुढे केला व त्याला जरा बाजूला घेतले. मग तो हळूच इंग्रजीत म्हणाला, 'आपल्यावर गेस्टॅपोची पाळत आहे. माझे पासपोर्टवर लगेच लिखापढीला सुरुवात करून त्याची मुदत वाढविणेसाठी योग्य ते सर्व विधी पार पाडा. मी काय सांगतो ते फक्त ऐकून घ्या. तोंडावर कोणताही भाव दाखवू नका. त्या अधिकाऱ्याने कान टवकारले व स्किबोल्डचा पासपोर्ट समोर ओढला. स्किबोल्डने इंग्रजीत हलक्या आवाजात आपली सर्व हकिकत सांगून शेवटी "माझे संरक्षण करा" अशी त्याला विनंती केली. "ठीक आहे. सध्या तुम्ही गेस्टॅपोचे सहकार्याचे नाटक चालू ठेवा. न्यूयॉर्कला पोचल्यावर तुम्हाला पुढील सूचना मिळतील. हा घ्या तुमचा पासपोर्ट. झाले तुमचे काम" असे म्हणून त्याने स्किबोल्डला निरोप दिला. पासपोर्ट घेऊन तो गर्दीतून वाट काढीत बाहेर पडला. तो गेस्टॅपोचे दूत त्याला हुडकीतच होते. त्यांचे बरोबर तो परत हेरखात्याचे हेडक्वार्टसला आला. त्याची ताबडतोब हॅम्बूर्ग जवळचे हेर शिक्षण केंद्रावर रवानगी करण्यात आली.

त्या हेर शाळेत जर्मन हेर खात्याचा गुप्त माहितीचा सारा खजिनाच स्किबोल्डपुढे उघडा करण्यता आला. नव्हे त्या जामदार खान्याच्या किल्ल्याच त्याचे स्वाधीन करणेसाठी म्हणून सर्व बारीक सारीक तपशिलासह त्या सर्व गोष्टी त्याला आत्मसात करायला लावल्या. त्याची प्रगती पाहून त्याचे सर्व शिक्षक चकीत झाले. त्याचे रिपोर्टस पाहून खुद्द हिमलर खूश झाला. न्यूयॉर्क मधील जर्मन हेरांचे जाळ्याचा मुख्य म्हणून त्याची नेमणूक केली गेली. हॅम्बूर्ग मधूनच तो आता अमेरिकेला निघणार होता. त्यापूर्वी त्याची हॅम्बूर्ग मधील गेस्टॅपो प्रमुखाशी शेवटची मुलाखत झाली. स्किबोल्डला देण्यात आलेल्या मोठ्या हुद्द्याचे जागेबद्दल त्याने तोंडभरून त्याचे अभिनंदन केले. पण जाता जाता धमकीही दिली की गेस्टॅपोचे हात अमेरिकेतही पोचतात. फ्यूररशी द्रोह करून तेथे जिवंत रहाणे शक्य नाही.

"छेऽ! छेऽ! आता अशी कल्पना सुद्धा माझे मनात येत नाही." स्किबोल्डने पण तोंडभरून आश्वासन दिले. जर्मनीचे विश्वविजया साठी बिअरचे पेले झोकून तो तेथून बाहेर पडला.

या वेळी तो अमेरिकन बोटीतून परत अमेरिकेला जात होता. त्याला खर्चासाठी जर्मन सरकारने एक हजार डॉलर्स रोख दिले होते. त्याचे सामानात हेरगिरीचे काहीच साहित्य नव्हते. फक्त एक जुन्या पद्धतीचे साखळीचे घड्याळ त्याच्या खिशात होते. त्या घड्याळात आतल्या बाजूला एक पोस्टाच्या तिकिटाच्या आकाराचा फिल्मचा तुकडा चिकटवला होता. त्या मायक्रो फिल्मच्या तुकड्यावर न्यूयॉर्कमधील सर्व जर्मन हेरांसाठी तपशीलवार सूचना दिलेल्या होत्या. पण न्यूयॉर्कमधील या हेरांची नावे अगर पत्ता याचा बोट सुटेपर्यंत त्याला पत्ता नव्हता. बोट सुटता सुटता त्याच्या हातात एक चिटोरे देण्यात आले. त्यावर न्यूयॉर्कमधील चार नावे, पत्ते दिलेले होते. जर्मन भूमीवर सुद्धा आपल्या अमेरिकेतील हेरांची नावे फुटू नयेत यासाठी जर्मन हेरखाते दक्ष होते. चिटोरे कुणाचे हाती पडू नये, त्याला ही नावे व पत्ते मिळू नयेत म्हणून ती नावे व पत्ते ताबडतोब पाठ करून त्या चिठोऱ्याची गोळी करून ती समुद्रात टाकून देण्याचे स्किबोल्डला आदेश होते. पण स्किबोल्डने हळूच ते चिठोरे आपल्या पाकिटाच्या एका खास बनवलेल्या चोर कप्प्यात ठेऊन दिले. बोटीने हॅम्बूर्ग बंदर सोडले. आपल्यावर कुणाची पाळत आहे का? अमेरिकेत गेल्यावर आपण काय करणार? कसे वागणार? आपल्या मदतीस तरी कोण येईल? का आपण शेवटी जर्मन हेरच ठरणार? यासारख्या विचाराने तो सारा समुद्र प्रवास बेचैन मनाने आणि धडधडत्या छातीने स्किबोल्डने पार पाडला. जसजसे न्यूयॉर्क बंदर जवळ येऊ लागले तसतशी त्याची बेचैनी व छातीची धडधड वाढत गेली. शेवटी बोट न्यूयॉर्क बंदरात शिरली. धक्याला लागली. कस्टम व पासपोर्ट तपासणारे अमेरिकन अधिकारी बोटीवर चढले. एक एक उतारू आपले सामान व पासपोर्ट दाखवू लागला. स्किबोल्डचा पासपोर्ट तपासला गेला. त्यावर शिक्का मारला गेला. इतक्यात त्याच्या खांद्यावर हात ठेवण्यात आला. त्याच्या कानावर हळू आवाजात शब्द आले, 'आम्ही दोस्त आहोत. आमच्या मागून या.' स्किबोल्डने आपला पासपोर्ट बंद करून कोटाचे खिशात ठेऊन दिला. तो मागे वळला व त्या दोघांच्या मागोमाग जाऊ लागला. वरच्या डेकवरून तो परत त्याच्या स्टेटरूममध्ये आला. येताना त्याची छाती जास्तच जोराने धडधडू लागली होती. 'दोस्त म्हणजे कोण? जर्मन का अमेरिकन? गेस्टॅपो का एफ. बी. आय?' या विचाराने त्याची बेचैनी जास्तच वाढली.

स्टेटरूममध्ये परत येताच त्याने सोफ्यावर अंग टाकले. त्याच्या मागोमाग आलेल्या त्या दोघांनीही आपले बूड टेकले. मग त्यांच्यापैकी एकजण म्हणाला. 'माझे नाव जॉन्सन. आम्ही दोघेही एफ. बी. आय. चे एजंट आहोत. कोलोनहून तू पाठविलेला निरोप आम्हाला मिळालेला आहे. आता तुझ्याकडे जर्मन हेरखात्याने काय काय दिले आहे ते सर्व दाखव.'

स्किबोल्डने खिशातून घड्याळ बाहेर काढले. वेळ बघत असल्यासारखे केले. मग ते घड्याळ कानाला लावले व शेवटी मागच्या बाजूने उघडून आत बघितले. बघता बघता आत चिकटवलेला मायक्रो फिल्मचा तुकडा काढून घेतला. घड्याळ दुरुस्त केल्यासारखे केले व मागची बाजू बंद करून पुन्हा घड्याळात बघून ते खिशात सोडून दिले. हे सर्व करतानाच तो मायक्रो फिल्मचा तुकडा जॉन्सनच्या हातात दिला. पाकीट उघडून त्यातील पैसे मोजता मोजता चोरकप्प्यातील पत्त्याचे चिठोरे काढून ते पण जॉन्सनकडे सरकवले.

"ठीक आहे तू आता सामान घेऊन आपल्या हॉटेलवर जा. तू तेथे पोचताच या मूळ प्रती तुझ्याकडे परत करण्यात येतील. तोपर्यंत आम्ही त्याच्या प्रती काढून घेऊ." असे म्हणून त्या दोघांनी स्किबोल्डचा निरोप घेतला. स्टेटरूममधील आपले सामान घेऊन स्किबोल्ड डेकवर आला व इतर उतारूंचे-बरोबर धक्यावर उतरला. एक टॅक्सी करून तो हॅम्बूर्ग सोडतानाच त्याचेसाठी खोली राखून ठेवलेल्या हॉटेलवर आला. कौंटरवर

नाव नोंदवून लिफ्टमधून त्याने आपली खोली गाठली. वॉश घेऊन प्रवासातील कपडे त्याने बदलले तोच दारावर टक टकं आवाज झाला. स्किबोल्डने दार उघडले. दारात जॉन्सन उभा होता. त्याने तो मायक्रो फिल्मचा तुकडा व ते चिठोरे परत केले. व्हिस्कीचा पेग घेता घेता जॉन्सनने सांगितले, "घाबरू नकोस. यापुढे दिवसाचे चोवीस तास आमची तुझ्यावर पाळत राहील. पण तरी देखील दररोज संध्याकाळचे पाच वाजण्यापूर्वी न चुकता तू आम्हाला फोन करीत जा." असे सांगून त्याला एक फोन नंबर सांगितला. स्किबोल्डने तो नंबर तेथल्या तेथे पाठ केला. नंतर शेकहॅन्ड करून जॉन्सन तेथून निघून गेला. त्या रात्री प्रथमच स्किबोल्डला निवांत झोप लागली.

दुसरे दिवशी आपले घरासाठी व ऑफिस साठी त्याने जागेचा शोध सुरू केला. न्यूयॉर्कचे जवळच लाँगआयलंड बेटावर सँडपोर्ट येथे एक निवांत कॉटेज त्याला एफ. बी. आय. ने दिली. त्या तेथे आपली बायकामुले आणणे त्याला शक्यच नव्हते. ती सॅनडिगो येथील त्याचे बिऱ्हाडी कॅलिफोर्नियातच होती व तेथेच रहाणार होती. त्यांना तो अधूनमधून वेगवेगळया ठिकाणाहून त्रोटक व कामाचे निमित्त सांगणारी पत्रे पोस्टात टाकणार होता. पैसे पाठवणार होता. पण त्याचा खरा पत्ता व खरे काम याचा पत्ता त्यांना लागू देणार नव्हता. या कॉटेजमधून त्याला जर्मन हेरखात्याला रेडिओद्वारे संदेश पाठवावयाचे होते. जर्मनीतून आलेले संदेश घ्यावयाचे होते. अमेरिकेत अनेक हौशी लोकांचा असे रेडिओ ट्रान्समिटर व रिसिव्हिंग सेट ठेवण्याचा छंद आहे. बहुधा असे सेटस फार शक्तिशाली नसतात. पण न्यूयॉर्कहून अॅटलांटीक पार करून जर्मनीत संदेश पाठविण्याला व तेथील संदेश ग्रहण करण्याला बऱ्याच शक्तिशाली सेटसची जरूरी होती. एफ. बी. आय. ने स्किबोल्डला असा सेट मिळवून दिला. इतकेच नव्हे तर त्याचे कॉटेजमध्ये व्यवस्थित बसवून दिला. असा सेट चालवण्याचे शिक्षण स्किबोल्डला अर्थातच जर्मन हेरशाळेत मिळाले होते. पण तरीही एफ. बी. आय. ने एक रेडिओतज्ञ व दोन एजंट त्याचे दिमतीला दिले. अमेरिकेत हेर खातेही कोणताही धोका पत्करावयाला तयार नव्हते. गावात मात्र तो फारसा कुणाशीच मिसळत नसे. न्यूयॉर्कला जाताना येताना त्याला गावातले लोक गाडीत भेटतच. त्यांच्याशी मात्र तो हसून खेळून वागत असे. कुणी शेजारी-पाजारी रस्त्यावर भेटलाच तर त्याचेही हसून खेळून स्वागत करी. पण आपले घरी मात्र तो कोणालाच येऊ देत नसे. रोज नेमाने सकाळची गाडी पकडून न्यूयॉर्क गाठणारा व रात्री काम संपवून परत घरी येणारा एक कामसू एकांतप्रीय सज्जन अशी त्याची प्रतिमा त्या गावातील लोकांच्या मनात तयार झाली होती. त्यामुळे त्याला शेजाऱ्या पाजाऱ्यांचा त्रास होत नसे.

न्यूयॉर्कचे औद्योगिक भागात ऑफिससाठी त्याला एक स्वतंत्र जागा मिळाली. दारावर त्याने पाटी लटकावली, "डिझेल रीसर्च सेंटर". आत मात्र प्रयोगशाळा उघडली हेरगिरीचे कामाची. ऑफिस उघडताच त्याने जर्मन हेर खात्याने दिलेली मायक्रो फिल्म एन्लॉर्ज केली. तोपर्यंत त्यात काय सूचना आहेत याची त्याला माहिती नव्हती. त्या सूचना बऱ्याच विस्तृत होत्या. कॅनडा व अमेरिकेतील अनेक लष्करी गुपितांची माहिती काढून कळवणे बद्दलचे त्यात आदेश होते. ही माहिती अमेरिकेतील जर्मन हेरांचे जाळयामार्फत त्याने मिळवावयाची होती. त्यासाठी त्याला येताना चिठोऱ्यावर दिलेल्या न्यूयॉर्कमधील जर्मन हेरांचा संपर्क साधणे आवश्यक होते. स्किबोल्ड तावडतोब त्या उद्योगाला लागला. यादीतले पहिले नाव होते हारमन लँग यांचे. हा गृहस्थ नॉर्डन प्लँट या लष्करी महत्त्वाचे कारखान्यात इन्स्पेक्टरचे हुद्यावर कामाला होता. त्याची भेट घेऊन बोलण्याचे ओघात स्किबोल्डने त्याचे बरोबर परवलीची देवघेव केली. लगेच स्वारी मोकळेपणे बोलू लागली. दोनच वर्षापूर्वी त्याने त्यांचे कारखान्यात नवीन होऊ घातलेल्या बॉम्बरचे ब्लूप्रिंटस जर्मनीत नेऊन दिले होते. त्याबद्दल खुद्द गोअरिंगने त्याची पाठ थोपटली होती व मोबदल्या दाखल रोख दहाहजार मार्क दिले होते. एकंदरीने लष्करी कारखान्यातील गुपिते काढणारा एक बडा जर्मन हेर होता तो. त्या यादीतील दुसरे नाव होते 'एलसी वेस्टनफिल्ड' ही बया एका सॉलिसिटरचे फर्ममध्ये स्टेनोग्राफर होती. तिचे ऑफिस व जर्मन कॉन्सुलेट एकाच इमारतीत होते. त्यामुळे कुणाचे नजरेत न भरता वकिलातीशी ती सहज संपर्क ठेवू शके. यादीतील तिसरा नंबर होता लिली स्टेन या गोड पोरीचा. अमेरिकन कारखान्यांतील बडया बडया धेंडांशी तिचे संबंध लगेच जुळत. दारूच्या व प्रीतीच्या धुंदीत त्यांचेकडून सारी गुपिते हस्तगत करण्यात तिचा हातखंडा होता. अगदी 'टॉप सीक्रेट' 'टॉप प्रायॉरिटी' असलेली सारी गुपिते बोल बोल म्हणता ती गोळा करी. यादीतील चौथी व्यक्ती होती फ्रिटझ डयूक्वेन्स हा चाळिशी गाठलेला लेखक व प्राध्यापक! स्थानिक हेर खात्याच्या जाळयाचा तोच मुख्य होता. जर्मन हेरखात्याचा तो एक कसलेला हेर व वरिष्ठ अधिकारी होता. फितुरीचा थोडा जरी संशय आला तरी तो फितूर हेराला यमसदनाला पाठवी. सहज बोलता बोलता तो ती माहिती स्किबोल्डलाही पुरवी. स्किबोल्ड तसा त्या सर्वांचा बडा अधिकारीच होता. त्यांना जर्मन हेरखात्याचे संदेश स्किबोल्डच देत असे, एवढेच नव्हे तर त्यांचे कामाचा मोबदलाही स्किबोल्डच देत असे. डच, स्पॅनिश, मेक्सिकन व इतर अनेक दक्षिण अमेरिकन बँकांमार्फत जर्मनीतून हजारो डॉलर्स यासाठी स्किबोल्डकडे पाठविणेत येत. या हेरांच्या जाळयात निदान तीस-बत्तीस तरी हेर काम करीत होते. या हेरांनी गोळा केलेली माहिती वायरलेसवरून पाठवण्यासारखी नसेल तर युरोप अमेरिका प्रवासी वाहतूक करणाऱ्या आगबोटी कंपन्यांचे दोन कर्मचारी ती माहिती स्वतःबरोबर नेऊन जर्मनीत पोचवीत. हे दोघेही स्किबोल्डचे जाळयाचाच भाग होते.

या सारखी अशी अनेक जर्मन हेरांची जाळी त्यावेळी अमेरिकेत हेरगिरी करीत होती. कित्येकदा अशा दुसऱ्या हेरांचे जाळयाला आपली माहिती स्किबोल्ड मार्फत पाठवावयाची पाळी येई. पण अशा वेळीं स्किबोल्ड हा खराच अधिकृत जर्मन हेर आहे याची अगदी कसून तपासणी त्यांचेकडून केली जाई. अशावेळी थोडा जरी संशय आला तरी स्किबोल्डला ठार मारायला त्यांनी कमी केलं नसतं. पण गेस्टॅपोचा भरभक्कम पाठिंबा असलेल्या स्किबोल्डला जर्मन हेरांना घाबरायचे कारणच काय?

एकदा स्टेड नावाचा एक जर्मन हेर स्किबोल्डला भेटायला त्याच्या डिझेल संशोधन केंद्रात आला. एक महत्त्वाचे अमेरिकन लष्करी गुपित त्याला ताबडतोब जर्मनीला पाठवायचे होते. त्याने सरळच प्रश्न विचारला, "तुम्ही जर्मनीचे हेर आहात हे कशावरून."

"तुम्ही तरी जर्मन हेर आहात हे कशावरून ? याचा कधी कोण पुरावा ठेवतो का. स्किबोल्डने बनेलपणे विचारले." पण तुमचेकडील गुपीत जर्मनीला त्वरीत पोचवणेस मला आनंदच वाटेल त्याने वर मखलाशी केली.

"ठीक आहे. बर्लीनला माझी एक बहीण आहे. तिचे नाव आहे फ्राऊ हेस. तिचे पाळण्यातले नाव जर तुम्ही बरोबर सांगितले तर मी आपले गुपीत तुमचे स्वाधीन करीन." स्टेडने कोडे घातले.

"उद्या याचवेळी परत या." स्किबोल्डने ठसक्यात सांगितले.

त्या रात्री वायरलेस वरून स्किबोल्डने हॅम्बूर्गचे गेस्टॅपो कचेरीला फ्राऊ हेसचे पाळण्यातील नाव ताबडतोड कळवावे असे सांगितले. हॅम्बूर्गहून बर्लिन गेस्टॅपोला निरोप गेला. मध्यरात्री फ्राऊ हेसचे दार गेस्टॅपोचे माणसानी ठोठावले. आपल्या पाळण्यातल्या नावात गेस्टॅपोला एकदम इतके औत्सुक्य का निर्माण झाले. आपल्याला ज्यू तर ठरवणार नाहीत ? या विचारानी फ्राऊ हेसची झोप पार उडाली. साऱ्या हेस कुटुंबालाच ही काळजी पुढे अनेक महिने सतावीत होती. पण स्किबोल्डचे काम झाले. दुसरे दिवशी स्टेड येताच त्याचे तोंडावर ते नाव फेकून अमेरिकेचे लष्करी गुपीत त्याचे हस्तगत केले. ते गुपीत जर्मन हेरांनी मिळवल्याचे पाहून एफ. बी. आपला सुद्धा धक्का बसला. जर्मन हेराकडून मिळालेली सर्व गुपिते जर्मनीला पाठवण्याचे पूर्वी स्किबोल्ड ती एफ. बी. आय. चे स्वाधीन करीत असे. त्यामध्ये महत्त्वाचे फेरफार करून एफ. बी. आय. ती माहिती स्किबोल्डला परत करीत असे. अशी दुरुस्त माहिती स्किबोल्ड मग जर्मनीला पोचवी. स्किबोल्डला मारून मुटकून हेर बनवल्याची अशी भयानक किंमत जर्मनीकडून न कळत तो वसूल करीत होता. त्यात अमेरिकन हेर खात्याचा तर चांगलाच फायदा होता. पण स्किबोल्ड हा हाडाचा हेर नव्हता. अशी दुहेरी हेरगिरी त्याला झेपत नव्हती. त्याची झोप पार उडाली. तरीही धास्तावलेल्या मनाने त्याने सुमारे सोळा महिने काढले. पण पुढे फार दिवस तग काढणे त्याला शक्य वाटेना. मग एफ. बी. आय. ने ते सर्वच हेरांचे जाळे गिरफदार करायचे ठरवले. पण गिरफदार करायचे तर खटला शाबीत होण्याइतका पुरावा जमा करणे जरूर होते. प्रिटझ हा हेर सोडून बाकी सर्व हेरांबद्दलचा पुरावा एफ. बी. आयने गोळा केला. पण या सर्व टोळीचा मेंदू प्रिटझ हाच होता. त्याला पुराव्यानिशी पकडून तुरुंगात डांबले नाही तर त्याने हेरांचे नवीन जाळे लगेच निर्माण केले असते. शेवटी प्रिटझला पकडण्यासाठी स्किबोल्डचे मदतीने एफ. बी. आयने जाळे टाकले. प्रिटझ नेहमी स्किबोल्डची भेट बागेत नाहीतर अशाच कुठल्यातरी सार्वजनिक जागी घेत असे. माहितीची देवाण घेवाण सुद्धा तो इतक्या चलाखीने करीत असे की ते कुणालाच उमगू शकत नसे. पण २५ जून १९४१ ला आपले डिझेल रीसर्च सेंटरला भेट देण्याबद्दल स्किबोल्डने प्रिटझचे मन वळवले. एफ. बी. आयने स्किबोल्डचे ऑफिसचे खोलीत स्किबोल्डचे बरोबर टेबलाचे मागे एक आरसा बसवला. त्याचे बरोबर पुढे भिंतीत एक छोटे भोक पाडून त्यात एक कॅमेऱ्याची लेन्स बसविली. त्या भिंगातून त्या आरशातील प्रतिबिंबाचा बरोबर फोटो घेता येई. टेबलासमोर बसलेल्या माणसाचे प्रतिबिंबाजवळच टेबलावरील घड्याळ व कॅलेंडर पण दिसे. त्यामुळे दिवस वेळासकट समोरील व्यक्तीचा फोटो त्याला नकळत काढता येई. त्याचबरोबर ऑफिसचे खोलीत दोन गुप्त मायक्रोफोनही बसवले होते. पलीकडचे खोलीत सिनेकॅमेरा व साउंड रेकॉर्डर घेऊन एफ. बी. आय. चे दोन एजंट सज्ज होऊन राहिले होते. डिझेल रिसर्च सेंटरवर ठरल्यापेक्षा बऱ्याच वेळाने प्रिटझ आला. थोडावेळ हवा पाण्याच्या गप्पा झाल्यावर धंद्याचे बोलणे सुरू झाले. एफ. बी. आयचे लोकांनी कॅमेरा व साऊंड रेकॉर्डर सुरू केला. मधली भिंत साऊंड प्रुफ केली असल्याने प्रिट्झला संशयसुद्धा आला नाही.

प्रिट्झने पायातून बूट काढला. मोजा काढला. त्या मोजातून एक पांढरा लिफाफा काढून स्किबोल्डचे टेबलावर ठेवला. स्किबोल्डने तो उघडला. त्यात अनेक फोटो होते. 'ही नवीन ग्रँड रायफल. हा नवा बेबी टँक. हा मोठा टँक. हे टँक विध्वंसक गुप्त हल्ल्यात वापरतात. एकेक फोटो हातात घेऊन त्याची तपशीलवार माहिती पुरवायला त्याने सुरुवात केली.

"छान आहेत ! कुठून मिळवलीत ही चित्रे तुम्ही ?' स्किबोल्डने विचारले.

"परवा अमेरिकन सैन्याची लुटुपुटुची लढाई टेनिसीला झाली होती. त्यात ही सर्व नवीन शस्त्र सामुग्री वापरली होती. त्यावेळी मिळविले हे फोटो. शिवाय ही पहा अमेरिकन नौदलाची नवी पि. टी. बोट मोठ्या कौशल्याने हा फोटो मिळवला मी" प्रिट्झ म्हणाला.

स्किबोल्डने ते सर्व फोटो नीट तपासले. आपल्या टेबलचा एक ड्रॉवर उघडला व त्यात ते टाकले. ड्रॉवरला पुन्हा कुलूप लावले मग त्याने टेबलाचा दुसरा ड्रावर उघडला. त्यातून एक नोटांचे बंडल बाहेर काढले. स्वतःशीच नोटा मोजल्या. बाकी नोटा परत ड्रॉवरमधे टाकून ड्रावरला कुलूप लावले व हातातल्या नोटांचे पुडके प्रिटझकडे सरकवले. प्रिट्झ नोटा मोजू लागला. 'काय ? फक्त ३०० डॉलर. मला तर चक्क लुबाडूच लागलात !' नोटा मोजून होताच प्रिट्झ म्हणाला, 'ठीक आहे मी आता जनरल इलेक्ट्रीक कंपनीचा कारखाना उडवून द्यायचे काम करतो. त्याला तरी भरपूर मोबदला दे. पण त्या साठी आधी मला थोडा डायनामाईट व एक मंद जळणारी वात हवी आहे.' प्रिट्झ पुढे म्हणाला.

"डायनामाईट काय करायचाय, हा चॉकलेटबार घे. याच्यात थोडा फॉस्फरस मिसळलास की झकास स्फोटक बाँब तयार होईल." जवळच्या कपाटातून एक चॉकलेटबार बाहेर काढून स्किबोल्ड म्हणाला.

"मला माहित आहे हा चॉकलेट बाँब. पण हमखास काम व्हायचे तर त्याला डायनामाईटच हवे." प्रिट्झ म्हणाला.

"ठीक आहे. मिळवतो डायनामाईट." स्किबोल्ड म्हणाला.

"मग येतो मी" प्रिट्झ उठत म्हणाला.

"जरा थांब. हॅम्बूर्गहून तुलाही खास

कामगिरी सांगितली आहे." जवळचा ड्रावर शघडून त्यातून एक पिवळा कागद काढून वाचायला स्किबोल्डने सुरुवात केली. 'आईसलंड व ग्रीनलंडमधील विमान तळाचे काम कुठवर आले आहे याची माहिती मिळव.'

"ठीक आहे,' म्हणत प्रिट्झ उठला. त्याला दारापर्यंत पोचवायला स्किबोल्ड गेला. शेजारच्या खोलीतून एफ. बी. आय. ने या सर्व प्रसंगाची फिल्म ध्वनिमुद्रणासह घेतली. प्रिट्झ निघून गेल्यावर स्किबोल्डचे उरले सुरले धैर्यही सुटले. तो खुर्चीतच कोसळला. त्याचे सर्वांग घामाने डबडबले. जवळच्या कपाटातील उंची मद्याची बाटली काढून एक पेग झोकल्यावर त्याचे जिवात जीव आला.

एफ. बी. आय. ने आता वेळ दवडला नाही. २८ जूनचे रात्री सर्व ३३ हेरांना गुपचूप गिरफदार करण्यात आले. सप्टेंबर मध्ये त्यांचेवरील खटला सुनावणीस निघाला. ११ डिसेंबरला स्किबोल्ड सोडून सर्वांना दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासाच्या शिक्षा झाल्या. स्किबोल्डच्या धैर्याची व देशभक्तीची न्यायमूर्तींनी व सर्वांनीच फार प्रशंसा केली. जर्मनीला स्किबोल्डचा जुलमाचा रामराम भलताच महाग पडला. पण त्याही पेक्षा स्किबोल्डला ही दुहेरी हेरगिरी तर भयंकरच गरम पडली. एवढी बहादुरी दाखवूनही त्याला जीवनातून उठावे लागले. आपले काम बरे की आपण बरे अशा वृत्तीचा तो एक सामान्य मेकॅनिक होता. पण पुढील सारे आयुष्य त्याला व त्याच्या बायका मुलांना नावगाव बदलीत अमेरिकेतील दुसऱ्या ठिकाणी काढायची पाळी आली. जर्मन हेरखाते बदला घेईल ही लढाई संपेपर्यंत धास्ती होती. त्यानंतर तुरुंगातून सुटून आलेल्या जर्मन हेरांपैकी कुणीतरी सूड घेईल ही धास्ती जन्माचीच मागे लागली. □ □



# आमचें अंदाजपत्रक जुटीचें–तुटीचें नव्हे

सगळीकडे टंचाई, टंचाई आणि टंचाई. तरीहि आमची साधनसंपत्ती वाढती आहे. या संपत्तीचा उपयोग करून त्रुटींनीं त्रस्त झालेल्या समाजाच्या आर्थिक विकासाचे अंदाजपत्रक आम्ही सहकारांतील एकजुटीनें साकार करतो.

अडल्या नडलेल्याला सहाय्य करणें हीच तर सहकाराची प्रेरणा.

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

९, बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१




adman

पुस्तके

# गावकुसाबाहेरील कविता

सदानंद नाईक

या काव्यसंग्रहाच्या नावावरून कवितेच्या एकूण स्वरुपाची कल्पना करता येते. समाजजीवन आणि साहित्य यांचा संबंध आहे किंवा नाही, असावा की नसावा अशा प्रश्नांच्या गुंतवळचात स्वतःला अडकवून घेणाऱ्या व नंतर त्यातच स्वतःला व स्वतःच्या अनुभवांना हरवून बसणाऱ्या साहित्यिक आणि समीक्षकांना आता अंतर्मुख होऊन विचार करावा लागेल असे साहित्य आता निर्माण होत आहे. पूर्वापार चालत आलेल्या साहित्यिक कलामूल्यांची कोंडी फोडणारे साहित्य आज निर्माण होत आहे. मुंबईच्या गिरगाव, दादर किंवा पुण्याच्या सदाशिव पेठेच्या संस्कृतीची जोपासना करणारे किंवा त्या संस्कृतीला तडा जात आहे, म्हणून हळहळ व्यक्त करणारे साहित्य, किंवा त्या तड्याचे दर्शन घडविताना तथाकथित वास्तववादाचे बिरूद मिरवणारे साहित्य आता बेचव आणि निःसत्त्व होत चालले आहे.

अशा तऱ्हेच्या मध्यमवर्गीय अनुभूतींना वाटा मोकळ्या करून देणारी मंडळी झोपडपट्टी, दलितांच्या वस्त्या, यांच्या वाटेलाही अधूनमधून जात होती. परंतु त्या अनुभूतीत तीव्रता नव्हती. त्या अभिव्यक्तीमध्ये परोपकाराची भावनाच अधिक जाणवायची. कथावस्तू म्हणून त्या व्यथांचा, वेदनांचा वापर ह्या मंडळींनी आपल्या साहित्यातून केला, असे म्हणावे लागेल इतपतच त्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न त्या साहित्यातून झालेला दिसतो. आणि तो देखील फक्त कथा, कादंबऱ्यांतून झालेला आढळतो. काव्यातून तो झालेला दिसत नाही.

गावकुसाबाहेरील ही अंतःकरण पिळवटून टाकणारी दुःखे, वेदना, व्यथा, नामदेव ढसाळ, चोखा कांबळे, वामन निंबाळकर, दया पवार, अशोक बागवे, प्रल्हाद चेंदवणकर इ. तरुण मंडळी जेव्हा काव्यातून व्यक्त करतात, त्यावेळी तथाकथित कलामूल्ये, कलात्मक दर्जा, काव्याची वैशिष्टये इ. साधनांचा विसर पडतो. ह्या बाह्यांगांचा उपयोग अनुभूतीची अभिव्यक्ती प्रभावीपणे करण्यासाठीच असतो. पण येथे 'अनुभूती' ही मूळातच अस्सल, बावनकशी असल्यामुळे काव्यालंकारांचा विसर पडतो. मनातील भावनाचा हा आवेगी उद्रेक आपोआपच कलात्मक पातळी गाठतो. अशावेळी छंद, मात्रा गण कोठे कमीजास्त आहेत का इ. कसोट्यांवर हे काव्य तपासून पाहणे म्हणजे त्या काव्यावर अन्याय करण्यासारखे आहे.

म्हणूनच या दलितसाहित्याकडे वेगळ्या चष्म्यातून पाहायला हवे. हे जग वेगळे आहे. इथली दुःखे वेगळी आहेत. इथले अनुभव वेगळे आहेत. वामन निंबाळकर यांची 'गाव कुसाबाहेरील कविता' त्या जगातील दुःखाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. ह्या समाजातील प्रत्येकाला इतरांप्रमाणे आयुष्य लाभलेले आहे पण ते घडविण्याचे स्वातंत्र्य मात्र त्याला नाही. त्याने आहे त्या ठिकाणी किड्यामुंग्याप्रमाणे राहिले पाहिजे, असा इथला संकेत. त्या माणसांकडे लक्ष द्यायलाही कुणाला फुरसत नाही. मग साहित्यिकांना, कवींना कोठून असणार ? म्हणूनच

'शब्दप्रभूंनो' या कवितेत निंबाळकर विचारतात–

'तुम्ही रचलीत महाकाव्ये
सोन्याचा घास खाणाऱ्यांची,
वाऱ्यासोबत चालणारांची,
भरजरी वस्त्र नेसणारांची,
आकाशात राहाणारांची.
.........
.........
ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले
चिरडलेले जीवन
विषय झालाच नाही
तुमच्या कवितेचा
.........
अरे ! यांनीही पाहिले आहे
भाकरीचे रूप
पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रात.

या जगात पूर्ण भाकरी मिळणे म्हणजे पुनवेचा चांद मिळणे. हा अनुभव हृदयस्पर्शी आहे. दोन जगातली तफावत दाखविणारा आहे. हा अनुभव वेगळा आहे, भरल्यापोटी तत्वज्ञान सांगणाऱ्यांसाठी, सौंदर्याची गीते गाणाऱ्यांसाठी.

या देशातल्या मनूच्या वारसदारांनी आपल्याच बांधवांना कशा तऱ्हेने वागविले त्याची जाणीव कवी करून देतो आणि त्याचवेळी एक आशावाद व्यक्त करतो. हा आशावाद व्यक्त करताना अपरिहार्यपणे आलेली भाषा बोचणारी असली तरी ती संयमीही आहे. कवीचा तोल कोठेही ढळलेला नाही. (ढळला असता तरी तो समर्थनीय ठरला असता एवढा अन्याय त्याच्या वाटयाला आलेला आहे). कवी म्हणतो–

मनूच्या वारसदारांनो !
हजारो वर्षांपासून
पाहाताहोत आम्ही
नग्न सायंवेळा आमच्याच.
गावकुसाच्या बाजूला चार,
सहा झोपड्यात
जळताहेत आमची
असंख्य कलेवरे
ज्यांना तुम्ही जाळले,
तुमच्या नादान विचारांनी
आम्ही वेशीबाहेर जन्मलो
त्याची खंत तुम्ही केली नाही
.........
.........
आज होणार आहे क्रांती
आमच्यातील प्रचंड शक्तीने
पेट घेतला आहे.
त्याचा होणार आहे स्फोट.
–आणि या सर्वांतून
माणसे जन्माला येणार आहेत.

या गावकुसाबाहेरील जगातील दुःख कसे आहे ? गावात रहाणाऱ्यांना ते दुःख कळणारे नाही. त्या दुःखाची जात वेगळी आहे.

'दु:ख' या कवितेत निंबाळकर म्हणतात.

माझ्या दु:खाची जात
वेगळी आहे.
अंधाराचे हुंदके,
प्रकाशाचे उसासे
माझ्या दु:खापुढे
फिके पडतात,
फिके पडते विरहाचे गीत.
जातीजातीच्या भिंतीचे
रिवाज, रीत
तुच्छतेचे वलय
मला खाऊन टाकते
तशी व्यथेची जखम
भरभरून वाहे
माझ्या दु:खाची जात
वेगळी आहे.

मराठी साहित्यात नव्या दमाचे हे दलित साहित्य एक नवे दालन उघडीत आहे. त्यामुळे मराठी साहित्यच समृद्ध होणार आहे. सध्या ते तसे प्राथमिक अवस्थेत असले तरी ते माणसाचे, माणसाने, माणसासाठी लिहिलेले साहित्य आहे आणि ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. ◘

गावकुसाबाहेरील कविता
वामन निंबाळकर
अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठे ३४. मूल्य चार रुपये

# खोल दो

अमृतसरहून दुपारी दोन वाजता निघालेली गाडी तब्बल आठ तासांनी मोगलपुऱ्याला पोचली. वाटेत कित्येक माणसे मारली गेली. आणि कितीतरी जखमी झाली. काहींचा पत्ताच लागेना. कॅंपातील थंड जमिनीवर बसलेल्या सिराजउद्दीनने सकाळी दहाच्या सुमारास डोळे उघडले, तेव्हा भोवताली बायका व मुले यांचा उसळत्या समुद्रासारखा अफाट समुदाय त्याला दिसला आणि त्याची विचारशक्ती कुंठित झाली. तो बराच वेळ ढगाळलेल्या आकाशाकडे बघत राहिला. कॅंपातील आरडाओरडा वाढतच होती. पण सिराजउद्दीनला काहीच ऐकू येत नव्हते. त्याला पाहणाऱ्याला वाटले असते की, तो कोणत्यातरी काळजीत बुडाला आहे. पण तसे नव्हते. त्याची विचारशक्तीच बधिर झाली होती. आपले अस्तित्व तो हरवून बसला होता.

शून्य दृष्टीने ढगाळलेल्या आकाशाकडे पाहत असताना सिराजउद्दीनची दृष्टी सूर्याला जाऊन भिडली. सूर्याची तीव्र किरणे त्याच्या नसानसांत शिरली आणि त्याला जाग आली. त्याच्या डोळ्यासमोरून चित्रे सरकली. लूट ...आग... पळापळ... स्टेशन...गोळ्या ... रात्र आणि सकीना...सिराजउद्दीन एकदम उठून उभा राहिला. वेड्याप्रमाणे तो भोवतालचा माणसांचा समुद्र धुंडाळू लागला. सकीना, सकीना, असे ओरडत बराच वेळ तो कॅंपभर भटकत होता तरी त्याला आपल्या एकुलत्या एक तरण्याताठ्या बेटीचा शोध लागला नाही. सर्वत्र धांदल उडाली. कोणी मुलाला, कोणी आईला, कोणी बायकोला तर कोणी मुलीला शोधीत होते. सिराजउद्दीन थकून भागून एका बाजूला जाऊन बसला. त्याने आपल्या स्मरणशक्तीला ताण दिला. सकीना व आपली ताटातूट केव्हा व कोठे झाली ते आठवायचा तो प्रयत्न करू लागला. विचार करता करता त्याच्या डोळ्यासमोर, सर्व आतडी बाहेर पडलेल्या स्थितीतली सकीनाची आई आली आणि त्याच्या पुढचे त्याला काहीच आठवेनासे झाले.

सिराजउद्दीन समोरच सकीनाच्या आईने प्राण सोडला. मरताना ती म्हणाली होती, 'मला इथेच राहू द्या. मी तर आता मरणार, सकीनाला घेऊन लवकर पळून जा' ती सकीना तरी आता कोठे होती?

सकीना त्याच्याबरोबरच होती. दोघेही अनवाणीच धावत होते. सकीनाची ओढणी खाली पडली. त्याला वाटले, ओढणी उचलून घ्यावी. सकीना ओरडली, 'अब्बाजान, जाऊ द्या, तुम्ही लवकर चला.' तरीही त्याने ओढणी उचललीच. सिराजुद्दीनने कोटाच्या खिशातून एक कपडा बाहेर काढला...ती सकीनाची ओढणीच होती. परंतु सकीना कोठे होती?

त्याने आपल्या स्मरणशक्तीला खूप ताण दिला. त्याला काहीच आठवेना— सकीना आपल्या बरोबर स्टेशनवर होती काय? आपल्या बरोबर गाडीत चढली होती काय? वाटेत दंगलखोरांनी गाडी अडवून ते गाडीत घुसले तेव्हा तो बेशुद्ध पडला होता काय? त्या दंगलखोरांनी सकीनाला पळवून नेले की काय? त्याला काहीच आठवेना.

त्याच्या डोक्यात प्रश्नांचे थैमान चालू होते. उत्तर सापडत नव्हते. त्याला सहानु-

सादत हसन मंटो—जन्म—११ मे १९१२. मृत्यू १८ जानेवारी १९६५. उर्दू भाषेतील श्रेष्ठ लघुकथालेखक. आकाशवाणी दिल्ली येथे संवादलेखक म्हणून नोकरी. चित्रपट कथा, संवाद लेखक म्हणून १९४० ते १९४७पर्यंत मुंबईत वास्तव्य. १९४७ नंतर पाकिस्तानात वास्तव्य.

आपल्या कथांतून एका वेगळ्या समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्यात कमालीचे यशस्वी. केवळ दर्शनच नाही तर, त्या जीवनाचा वेध घेण्याचे सामर्थ्यही तेवढेच जबरदस्त. जुगार अड्डा, वेश्यांची वस्ती—तिथलाच एक बनून पाहिली. त्यामुळे चित्रणात अस्सलपणा. त्या अस्सलपणामुळे व (कथांच्या) वेगळ्या तंत्रामुळे त्यांच्या कथा चिरकाल स्मरणात रहातात. त्यापैकी 'नंगी आवाजे', 'खोल दो', 'खुशिया', 'हतक', 'स्वराज्य के लिए' या काही उत्कृष्ट कथा. खोटेपणा त्यांना सहन होत नसे. समाजातील ढोंगावर आपल्या कथांतून त्यांनी कोरडे ओढले. जेव्हा जेव्हा माणसाच्या नैसर्गिक भावनांचा खून होताना ते पहात असत, त्या त्या वेळी त्यांचा राग अनावर होत असे. त्यांच्या 'स्वराज्य के लिए' कथेतील नायक शहजादा गुलामअली म्हणतो, 'ईश्वराकडे बघून तरी निदान माणसाला माणूस म्हणून जगू द्या—त्यांचा चेहरा मोहरा तुम्ही बदलला आहे. निदान त्याचे अंत:करण तसेच राहू द्या. त्याला तुम्ही ईश्वर बनविण्याचा प्रयत्न करीत आहात. परंतु तो माणुसकी देखील गमावतो आहे.' (महात्मा गांधींच्या एका विचारसरणीचा, अतिरेकी सुधारकांचा उपहास मंटोंनी या कथेत केला आहे—अगदी प्रामाणिकपणाचे आणि मानवतेच्या भावनेतूनच.) कारण मंटो मानवतेचे पुजारी होते.

भूतीची आवश्यकता होती. परंतु त्याच्या सभोवती असलेल्या प्रत्येकालाच तिची आवश्यकता होती. त्याला रडावेसे वाटले पण डोळे कोरडे पडले होते. बऱ्याचवेळानंतर ह्या धक्क्यातून तो थोडासा सावरला. त्याला मदत करू इच्छिणारे काही तरुण त्याला भेटले. ते आठजण होते. त्यांच्याजवळ लॉरी होती, बंदुका होत्या सिराजउद्दीनने त्यांना शतशः धन्यवाद दिले. सकीनाचे वर्णन तो करू लागला. "ती माझी एकुलती एक बेटी आहे, तिचा रंग गोरा आहे. ती खूपच सुंदर आहे– ती माझ्या वळणावर नाही तर आपल्या आईच्या वळणावर गेली आहे... वय सतरा वर्षांच्या आसपास आहे... डोळे मोठे, केस काळे व उजव्या गालावर मोठा तीळ आहे" तिला शोधून आणलेत तर खुदा तुमचे भले करील...

रझाकार तरुणांनी मोठ्या उत्साहाने सकीना जिवंत असल्यास त्याची व तिची भेट होईल असे आश्वासन त्याला दिले.

आठही तरुणांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आपले प्राण मुठीत घेऊन ते अमृतसरला गेले. कित्येक मुलांना बायाबापड्यांना त्यांनी सुरक्षित ठिकाणी पोचविले. दहा दिवस उलटले तरी त्यांना सकीना कोठे सापडली नाही.

ह्याच कामासाठी एकदा ते लॉरीतून अमृतसरला निघाले होते. छेहर रस्त्याच्या जवळ त्यांना एक मुलगी रस्त्यावर दिसली. लॉरीचा आवाज ऐकल्याबरोबर ती दचकली. ती पळायला लागली. रझाकारांनी मोटार उभी केली व ते सर्व जण तिच्या मागे धावू लागले. एका शेतात त्यांनी तिला गाठले. अतिशय सुंदर रूप होते... उजव्या गालावर मोठा तीळ होता. त्यांच्यापैकी एकजण तिला म्हणाला, "घाबरू नकोस, तुझे नाव सकीना आहे का? ती पांढरी फटक पडली, तिने काहीच उत्तर दिले नाही. सर्वांनी तिला धीर दिला तेव्हा तिची धास्ती नाहिशी झाली व आपण सिराजउद्दीनची बेटी सकीना असल्याचे तिने कबूल केले.

रझाकारांनी तिची हरतऱ्हेने समजूत काढली. तिला खायला प्यायला दिले आणि लॉरीत बसविले. दुपट्टा नसल्यामुळे तिला अवघड वाटत होते. आपले दोन्ही हात ती उरावर पांघरत होती. एकाने आपला कोट तिला दिला.

पुष्कळ दिवस उलटले– सिराजउद्दीनला सकीना बेटीची काहीच खबर कळली नाही. दिवसभर तो कँप कचेऱ्यातून भटकत राही. बेटीचा पत्ता त्याला लागत नव्हता. रात्री बराच वेळ रझाकार मित्रांना यश मिळावे म्हणून तो खुदाची विनवणी करीत राही. सकीना त्याला भेटेल असे रझाकार तरुणांनी त्याला आश्वासन दिले होते.

एके दिवशी सिराज उद्दीनला ते तरुण रझाकार कँपमध्ये दिसले. ते लॉरीत बसले होते. सिराजउद्दीन धावतच तिकडे गेला. लॉरी सुटता सुटताच त्याने विचारले, "बेटा सकीना सापडली का? सर्वांनी एकदमच ओरडून सांगितले, "सापडेल सापडेल" आणि लॉरी निघून गेली. सिराजउद्दीनने त्यांना यश मिळावे म्हणून पुनः एकदा खुदाची प्रार्थना केली. त्याला हुरूप आला.

संध्याकाळची वेळ होती. सिराजउद्दीन कँपात बसला होता. त्याच्या बाजूलाच कसली तरी गडबड उडाली. चार पाचजण काहीतरी उचलून आणीत होते. त्याने सहज चौकशी केली. एक मुलगी रेल्वेलाइनजवळ बेशुद्ध पडली होती. तिला उचलून आणीत असल्याचे त्याला कळले. सिराजउद्दीन त्यांच्या मागून जाऊ लागला. तिला हॉस्पिटलमध्ये पोचवून ते लोक निघून गेले.

हॉस्पीटलच्या बाहेर एका खांबाला टेकून सिराजउद्दीन थोडा वेळ उभा राहिला. हळू हळू तो आत गेला. खोलीत कोणीच नव्हते. फक्त एक स्ट्रेचर व त्यावर एक प्रेत. सिराजउद्दीन हलक्या पावलांनी स्ट्रेचर जवळ गेला. खोलीतला दिवा एकदम लागला. प्रेताच्या फिकट चेहऱ्यावरचा तीळ सिराजउद्दीनला एकदम दिसला. तो ओरडला– "सकीना"!

खोलीतला दिवा लावल्यानंतर, डॉक्टरानी सिराजउद्दीनला विचारले "काय आहे?" "तू कोण?" "मी... मी हिचा बाप आहे" एवढेच अडखळते शब्द सिराजउद्दीनच्या तोंडातून बाहेर पडले.

डॉक्टरांनी स्ट्रेचरवरच्या प्रेताकडे पाहिले नाडी बघितली. सिराजउद्दीनला म्हणाले, "खिडकी खोल". सकीनाच्या मृतप्राय शरीराची हालचाल झाली. निर्जीव हाताने तिने नाडी सोडली व सलवार खाली सरकवली...! सिराजउद्दीन जोरात ओरडला, "जिवंत आहे– माझी बेटी जिवंत आहे... माझी सकीना जिवंत आहे."

डॉक्टर आपादमस्तक घामाने निथळून गेले होते. ◻

खोल दो
मूळ लेखक : सादत हसन मंटो
अनुवादक : सदानंद नाईक


**शनवारवाड्यातील शमादान**

ब. मो. पुरंदरे | किमत साडेतीन रुपये | राजहंस प्रकाशन पुणे ३०

# सेन्सॉर हटाओ
## डॉ. लागू

'सेन्सॉरशिप हटाओ' या डॉ. श्रीराम लागू यांच्या मोहिमेमुळे सेन्सॉर बोर्ड हटले पण 'सेन्सॉरशिप' शिल्लक राहिली. लोकशाहीमध्ये नाटककारावर बंधने असणे चुकीचे आहे, नाटक समाजावर परिणाम करते याला काही प्रमाण नाही आणि अश्लीलतेची कल्पना स्थल काल सापेक्ष असते आणि ती नाटकाला लावणे गैर आहे या मुद्यावर डॉ. लागू, कला हा धर्म मानून झुंजत आहेत. गेल्या बुधवारी म्हणजे चोवीस एप्रिलला वसंत व्याख्यान मालेत ते याच विषयावर बोलले. विषय तसा जुना नाही. डॉ. लागूंचे त्यावरचे विचारही स्पष्ट आहेत. रात्रीची वेळ आणि संध्याकाळीच एका मातब्बर वक्त्याचे (रणजीत देसाई) याच व्यासपीठावरून भाषण झालेले. तरीही डॉक्टरांच्या भाषणाला 'दृष्ट लागावी' अशी गर्दी होती. तरुण मंडळी अर्थातच संख्येने जास्त. अध्यक्षस्थानी होते डॉ. विद्याधर पुंडलीक.

डॉक्टर लागू यांच्या भाषणाचा हा गोषवारा.

सध्या आपल्याकडे नाटकाला सेन्सॉर शिप आहे. पूर्वी सेन्सॉर बोर्ड होते ते आता गेले. त्याचे काम सध्या पोलिसांकडे आहे. समाजशास्त्रज्ञ म्हणून नव्हे तर सौंदर्यशास्त्री म्हणून सर्व ललित कलाबद्दल आस्था असलेल्या एका माणसाच्या भूमिकेतून आणि आपण सुसंस्कृत व्हावे अशी प्रामाणिक धडपड असलेल्या माणसाच्या दृष्टिकोनातून या सेन्सॉरशिपच्या कल्पनेकडे मी पाहाणार आहे. इतर सर्व कलांप्रमाणे नाटक ही एक कलाकृती. पण सेन्सॉरशिप फक्त नाटकाला आहे इतर कलाप्रकारांना नाही. बरे सेन्सॉर म्हटले की ती फक्त अश्लील, ओंगळ नाटकांच्या बाबतीतच असते अशी एक कल्पना आपल्या मनात ठसविली जाते. पण मुळात सेन्सॉरचा उगम यापेक्षा वेगळा आहे. सरकार, राजे आणि त्यांचे नातेवाईक यांना अडचणीत आणणारी, गैरसोयीची वाटणारी कोणतीही गोष्ट रंगभूमीवर दाखविली जाऊ नये यासाठी सत्ताधीशांनी आपल्या हाती बाळगलेला एक अंकुश असा सेन्सॉरचा अर्थ आहे. या कल्पनेला माझा विरोध असण्याचे कारण हेच. जिथे जिथे शासन हुकूमशाही असते तिथे सेन्सॉरशिप जास्त कडक असते. रशिया, चीन येथील सेन्सॉर जास्त जाचक आहे. शासनाला गैरसोयीचे वाटेल असे काहीही करता येणार नाही. हा सेन्सॉरचा अर्थ त्यांनी कधीही नाकारलेला नाही.

आपली राज्यपद्धती लोकशाहीची आहे ती, अडचणीत येऊं नये म्हणून आपल्याकडे सेन्सॉर आहे असा एक युक्तिवाद केला जातो. पण फक्त नाटकालाच सेन्सॉर का ? एकतर नाटक ही कलाकृतीच नसावी किंवा नाटक हे एकाच वेळी मोठ्या समुदायाकडून पाहिले जाते म्हणून त्याचा समाजावर चांगला अगर वाईट परिणाम होऊ शकतो म्हणून त्यावर सेन्सॉर आहे. यापैकी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर होय असे दिले जाते. म्हणजे अमुक एका नाटकामुळे समाजाची नीतिमत्ता बिघडू शकते, सुधारू शकते, राजकीय किंवा सामाजिक जागृती होऊ शकते असे सांगून सेन्सारची तरफदारी केली जाते. लोकांची नीतिमत्ता सुधारणे, लोकशिक्षण करणे हे नाटकाचे काम आहे असे आपण कित्येक वर्षे मानीत आलो आहोत. पण असे का मानतो याला काहीच उत्तर सापडत नाही. अगदी रंगभूमीच्या सुवर्ण युगातही एखाद्या नाटकामुळे नीतिमत्ता बिघडल्याचे किंवा सुधारल्याचे उदाहरण कोठेही नाही. पूर्वीचे नाटककार चांगले होते. हल्लीची नाटके ओंगळ, बीभत्स असतात म्हणून त्यावर अंकुश हवा हे म्हणण्यालाही कुठे आधार नाही. पूर्वीच्या नाटककारांपैकी कोणाची नाटके थोर नैतिक आहेत ? त्यांनी कोणता संदेश दिला ? शेक्स्पीयर, कालिदास, भवभूती या नाटककारांनी समाजात कोणती नैतिक उलाढाल घडवून आणली ? दारू पिणे वाईट आहे हा फालतू संदेश देण्यासाठी गडकऱ्यांनी 'एकच प्याला' लिहिले काय ? 'माझ्या नाटकातील एक एक ओळदेखील कलेसाठी नाही, सर्व काही शिकवण देण्यासाठी आहे,' असे म्हणणाऱ्या शॉची शिकवण देणारी नाटके लोकांच्या लक्षातही नाहीत. शॉ लक्षात राहातो तो इतर नाटकांमुळे. इब्सेनच्या नाटकांच्या बाबतीत तेच घडले. मग नाटकांच्या बाबतीत असा आरोप का केला जातो ? ही झापडे डोळ्यावर लावून आपण आणखी किती काळ चालणार हा खरा प्रश्न आहे. प्रत्येक पिढीने मागच्या पिढीची स्तुती करायची नी स्वतःच्या पिढीची निंदा करायची हे अगदी विष्णुदास भाव्यांच्या पासून चालत आले आहे.



डॉ. श्रीराम लागू

एखादी कलाकृती चांगली किंवा वाईट कशी ठरवायची याची कोणतीही प्रमाणे किंवा निकष नसताना ती कलाकृती किंवा ते नाटक चांगले–वाईट असा शिक्का मारून चालू ठेवण्याचा किंवा बंद पाडण्याचा अधिकार कोणासही असू शकत नाही. हा अट्टाहास केवळ मग्रूरपणाचा आहे. चांगले, वाईट या कल्पना सापेक्ष आहेत. असे असताना सर्व काही मला कळते असा आव आणून नितीमान नाटक कोणते, गल्लाभरू नाटक कोणते हे ठरविण्याचा अधिकार शासनाला किंवा त्याने नेमलेल्या चार माणसांना कसा प्राप्त होतो ? चांगले काय आणि वाईट काय हे त्या त्या काळातील लोकांना चांगले समजते. जे खरोखरीच ओंगळ, अश्लील आहे त्याचे कौतुक अगदी थोडा काळ होते हा अनेक ठिकाणचा

अनुभव आहे. स्कँडेनेव्हियन देशात अश्लील वाङमयावरची सर्व बंधने काढून टाकल्यावर काही दिवस सर्व पुस्तकांच्या दुकानात सर्वत्र अश्लील पुस्तकेच दिसू लागली पण सुमारे महिन्यानंतर त्या वाङमयाचे आकर्षण पूर्णपणे ओसरले बंधने होती तोवर त्याचे आकर्षण वाटले नंतर संपले. जे खरोखरी घाणेरडे, ओंगळ आहे ते कुठलाही समाज मान्य करीत नाही. एवढे तारतम्य समाजाला असते. आता अत्यंत विकृत वृत्तीने सडलेला समाज याला अपवाद समजावा. पण आपला समाज तसा नाही. म्हणून भीतीचे कारण नाही.

सेन्सॉर नसेल तर ' सखाराम 'सारखी नाटके गल्लोगल्ली लिहिली जातील असेही सांगण्यात येते. खरे तर ' सखाराम ' हे इतके अवघड नाटक की तेंडूलकरांना देखील ते पंधरा वर्षात एकदाच जमले. आता असे तेंडूलकर गल्लोगल्ली निर्माण होणार असतील तर ती फार भाग्याची गोष्ट म्हटली पाहिजे. पण इथे प्रकार वेगळा आहे. एकीकडे छुप्या अवस्थेतली अश्लीलता खपविली जाते. दुसरीकडे एखाद्याला ' तुझे नाटक वाईट आहे, ते बंद कर ' असे बजावले जाते. खून केलेल्याचा गुन्हा शाबीत झालेल्या माणसाला फाशी देऊ नये कारण नैतिक दृष्ट्या खून करणारा व फाशी देणारा यात काहीच फरक नाही असा एक विचार सध्या काही देशात रुजतो आहे. मग हाच विचार कलाकृतींच्या बाबतीत मान्य का होऊ नये ? लोकशाही राजवटीत एखाद्या व्यक्तीची अशाप्रकारे गळचेपी करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला ? या कल्पनेतला खोटेपणा आणि लबाडी तुम्हाला कशी दिसत नाही ? किंवा आपल्याकडे लोकशाही नाही असे तरी एकदा सांगून टाका. लोक खुळचट, मेंढरासारखे आहेत असे समजून त्यांच्या माथी अशा कल्पना मारण्यापेक्षा ते परवडले.

कृष्णराव मराठे यांना आवडत नाही ते अश्लील अशी अश्लीलतेची व्याख्या पूर्वी विनोदाने केली जात असली तरी अश्लीलता हा एक भोंगळ शब्द आहे. निश्चित कल्पना आणि व्याख्या नसल्यामुळे अनेक खटल्यातील लेखक निर्दोष सुटले आहेत. तरीपण अश्लीलतेची पुढील व्याख्या मान्य होण्यास हरकत नसावी. ' सेक्स 'च्या संदर्भात केलेला असभ्यपणा–असभ्यकृती किंवा असभ्य शब्द, किंवा वरकरणी सभ्य शब्द वापरून त्यातून असभ्य अर्थ काढण्याची कलृप्ती म्हणजे अश्लीलता. म्हणजे ' सेक्स ' आणि असभ्यपणा या दोन गोष्टी नसतील तर तेथे अश्लीलता नाही. आता अश्लीलतेची ही व्याख्या नाटकाला कशी लावणार हा खरा प्रश्न आहे. आज मुळातच आपल्याकडे ' सेक्स ' हा ' तेरी भी चुप मेरी भी चुप ' असा मामला समजला जातो. अर्थात ह्या विषयावर बोलणे, विचार करणे पाप आहे या कल्पनेच्या विळख्यातून आता आपण सुटत आहोत. पण गंमत अशी की ' सेक्स ' चा शास्त्रीय दृष्ट्या सर्वंकष विचार जगात प्रथम आपणच केला. वात्स्यायनाने कामसूत्र लिहिले त्या काळात आजचे अश्लील हे श्लील होते. नंतर भारतीय संस्कृतीवर ख्रिस्ती व इस्लामी संस्कृतीचे दडपण आल्यावर आपल्या सेक्सबद्दलच्या कल्पना संकुचित होत गेल्या. आता परत पाश्चात्यांच्या अनुकरणाने सेक्सच्या बाबतीत मोकळेपणा येत आहे. याचा अर्थ असा, असभ्यपणा आणि अश्लीलता या गोष्टींचा विचार सामाजिक आचार विचारांच्या संदर्भात करावा लागतो. आज असलेले असभ्य उद्या सभ्य असते, एका समाजातले सभ्य दुसऱ्या समाजात असभ्य ठरेल. म्हणून असभ्यता किंवा सभ्यता हे सामाजिक आचार विचारांचे मूल्य आहे, कलाकृतीचे ते मूल्य नाही. आणि म्हणून नाटकाच्या बाबतीत श्लील आणि अश्लील ही विधाने गैर लागू आहेत. कारण कलाकृती ही पूर्णपणे स्वतंत्र असते. सामाजिक आचार विचारांच्या मूल्याशी कलाकृतीचा संबंध नसतो. अशा प्रकारे पूर्णत: गैरलागू असलेली मूल्ये नाटकावर लादणे, ते नाटक बंद पाडणार असे म्हणणे भोंगळपणाचे आहे.

पूर्वसूरींनी नाटक हे सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचा एक भाग आहे असे सांगितले त्याला फारसा अर्थ नाही. या बाबतीत आपण स्वच्छ विचार केला पाहिजे. कलाकृती हा सांस्कृतिक चळवळीचा एक भाग आहे हे मान्य केले तर कलाकारावर बंधने घालण्यापेक्षा त्याला भरपूर स्वातंत्र्य द्यायला हवे. त्यामुळे त्याची कला खुलेल, तितका तो सांस्कृतिक उभारणीस जास्त हातभार लावील. दुसरीकडे कलावंताच्या स्वातंत्र्याचा संबंध सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याशी आहे. एखादा कलावंत समाजातली घाण चिवडीत बसलेला असतो असे तुम्ही म्हणता त्यावेळी समाज हा खालपासून वरपर्यंत घाणीने बरबटलेलेला आहे हे तुम्हाला मान्य नाही का ? त्या दृष्टीने ' गिधाडे ' ' सखाराम ' ही नाटके तेंडुलकरांनी लिहिली नसती तर ते चुकले असते. अमुक एका विषयावर लिहा किंवा लिहू नका असे तुम्ही नाटककाराला सांगू शकत नाही. नाटकाला चांगले वाईट म्हणू शकता पण त्याही बाबतीत विचार अगदी स्पष्ट हवा. वासना चाळवणारी दृष्ये रंगमंचावर दाखविली जाऊ नयेत असेही म्हटले जाते. पण याही ठिकाणी आपण नाटकाकडे कलाकृती म्हणून पाहू शकतो की नाही हा प्रश्न निर्माण होतो. ते विशिष्ट दृष्य मुद्दाम वासना चाळविण्यासाठी निवडले आणि म्हणून तो नाटककार अप्रामाणिक व गल्लाभरू आहे असा आरोप करणे असभ्यपणाचे आहे.

' ऐतिहासिक व्यक्तींची बदनामी ' करणारे नाटक असे आपण एखाद्या नाटकाच्या बाबतीत म्हणतो त्यावेळी एक चमत्कारीक वाक्प्रचार आपण वापरतो. ऐतिहासिक व्यक्तींची बदनामी होऊच शकत नाही. तेंडुलकर नावाचा एक माणूस दीडशे वर्षापूर्वी होऊन गेलेल्या नाना फडणीसांची बदनामी कशी करू शकेल ? नाना फडणीस जसे होते तसे ते दाखवले तर ते चारित्र्यदर्शन होईल, चारित्र्य हनन नव्हे. ऐतिहासिक व्यक्तींबद्दल खोटया गोष्टी सांगून बदनामी केली तर सत्य लपून राहील काय ?

**—मधुकर प्रभुदेसाई**

## ॥ नजर ॥ नजर ॥

ह. शि. खरात

# वास्तव इटालियन चित्रपट

इटालियन चित्रपट म्हटले की आपल्या डोळ्यापुढे 'बायसिकल थीफ' हा चित्रपट हमखास येतो. ह्या चित्रपटाने सबंध जगावरच इतका प्रभाव टाकला की जागतिक चित्रपटांचा इतिहास लिहावयाचा झाल्यास 'बायसिकल थीफ' टाळून पुढे जाणे कोणालाच शक्य होणार नाही. 'बायसिकल थीफ' ने इटालियन चित्रपटांविषयी जी प्रतिमा निर्माण केली आहे किंवा होती ती मनात तरळत असतानाच गेल्या वीस वर्षातील इटालियन चित्रपटांचा बदलता चेहरा आकाशवाणी चित्रगृहात बघण्याचा योग आला. फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनतर्फे इटालियन चित्रपट महोत्सव साजरा झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर इटालीमध्ये जे नवे वारे सुरू झाले, ते वारे सुरू होण्याआधी इटालियन माणसाला युद्धाची लागलेली झळ, त्यामुळे होरपळलेला समाज, समाजवादाची आलेली लाट ह्या साऱ्यांचे वस्तुनिष्ठ चित्रण गेल्या वीस वर्षातील चित्रपटात पाहावयास मिळते. १९४७–४८ ते १९६६ दरम्यान जी चित्रपट निर्मिती झाली त्यातील काही निवडक चित्रपट, ज्यांनी इटालियन चित्रपटसृष्टीला काही नवीन दिले, नव्या वाटा दाखविल्या व कालप्रवाहाबरोबर जाण्यास शिकविले, अशा उत्कृष्ट चित्रपटांचे दर्शन घेताना असे वाटत होते की आपण केवळ पडद्यावर चित्रपट पाहात नसून इटालियन समाजाचा तत्कालीन कलात्मक इतिहासच पाहात आहोत.

इटालियन चित्रपट महोत्सवात एकंदर आठ चित्रपट दाखविण्यात आले. त्यातील 'द लव्ह' हा फक्त ४० मिनिटांचा लघुपट होता. ह्या आठ चित्रपटांपैकी ज्याने इटालियन चित्रपटसृष्टीत नवी लाट आणली त्या रोबेर्टो रोझेलिनी ह्या प्रख्यात दिग्दर्शकाचे द लव्ह, पाइजा आणि 'यूरोपा ५१' हे चित्रपट होते. ज्याने इटालियन चित्रपटात नववास्तवता आणली त्या प्रख्यात व्हिटोरिओ डिसिकाचा 'मिरॅकल इन मिलान' ही अत्यंत उपहासगर्भ अशी फॅंटसी होती. मायकेलांजलो अन्टोनिआनिचे 'द क्राय' आणि 'नाईट' हे चित्रपट होते. तर 'सत्यचित्र' म्हणून ज्याने युगारंभ केला असे म्हटल्यास वावगे होणार नाही असा 'द बॅटल ऑफ अल्जिरियाज, हा ग्रेट चित्रपट शेवटी होता. ज्याचा ग्रेट दिग्दर्शक होता गिलो पोन्टेकार्व्हो. हा खरोखरच थोर दिग्दर्शक आहे. त्याला आपण मानलेच पाहिजे. म्हणजे रोझेलिनी ते गिलो पोन्टेकार्व्हो हा वीस वर्षांचा इटालियन चित्रपट प्रवास जसा लक्षणीय वाटतो तसा तो जीवनाचा काळानुरूप वेध घेणारा जिवंत कलामाध्यमाचा एक वस्तुनिष्ठ आलेखही वाटतो.

वरील आठ चित्रपटात उल्लेखनीय आणि वेगळे चित्रपट म्हणजे पायजा, द-नाईट, द मिरॅकल इन मिलान आणि द बॅटल ऑफ ॲल्जिरियाज होत. 'द लव्ह' हा चाळीस मिनिटांचा लघुपट म्हणजे मुळात एकांकिकाच होती. तो खरे म्हणजे नाटयाचा विषय. चित्रपट माध्यम म्हणजे ॲना मॅगनानी ह्या नटीला मोठे आव्हानच होते. परंतु ते शिवधनुष्य तिने तिच्यापुरते पेलले असले तरी ह्या चित्रपट कुठेतरी फसल्यासारखा वाटतो. त्याच कारण म्हणजे पडद्यावर चाळीस मिनिटे फक्त नटीचा चेहरा आणि फोन ह्याशिवाय आपणास काहीच दिसत नाही.

१९४७ चा हा चित्रपट. आपल्याला नकार देऊन दुसरीबरोबर विवाह करावयास जाणाऱ्या आपल्या प्रियकराशी शेवटचे संभाषण करणाऱ्या व्यथित अशा दुर्दैवी स्त्रीची ही कथा. ॲनामॅग्नानीने तिची सारी निराशा पश्चात्ताप, व्याकुळता मनापासून व्यक्त केली आहे. एखाद्या जखमी झालेल्या पाखरासारखी तिची तडफड वाटते. परंतु कितीही मोठा गायक असला तरी त्याने एकच सूर लावल्यावर जसा कंटाळा येतो तसाच काहीसा प्रकार ह्या चित्रपट पाहिल्यावर येतो. रोझेलिनीचा 'पायजा' हा युद्धाच्या पार्श्वभूमीवरील चित्रपट बघण्यासारखा आहे. युद्धकालीन अशा सहा घटनातून युद्धाची शोकांतिका अगदी वेगळया तऱ्हेने दाखविण्याचा हा १९४६ चा प्रयत्न. ह्या घटनापैकी निग्रो सैनिक व त्याचा बूट चोरणारा छोकरा हा प्रसंग हृदय हेलावणारा आहे. तो निग्रो जेव्हा त्या छोकऱ्याच्या जगातील झोपडपट्टी–तिच्यातील हृदयविदारक दारिद्रय पाहतो तेव्हा तो मोडूनच जातो. युद्धाचे भीषण परिणाम अगदी परिणामकारक रीतीने कॅमेऱ्याने पकडले आहेत. असाच दुसरा प्रसंग म्हणजे एका सैनिकाची प्रेयसी युद्धामुळेच वेश्या होते तेव्हा तो मोडून पडतो त्या वेळचा. युरोपा ५१ हा चित्रपटही युद्धोत्तर कालीन इटालियन समाज जीवन दर्शन घडविणारा होता. आपल्या मुलाकडे दुर्लक्ष केल्यामुळे तो मुलगाच गमावलेल्या एका पश्चात्तापदग्ध, उच्चभ्रू वर्गातील स्त्रीची ही शोकांतिका आहे. जे प्रेम ती आपल्या मुलाला देऊ शकली नाही ते प्रेम ती समाजाभिमुख होऊन साऱ्या विश्वालाच देऊ पाहते. तिच्या एका कम्युनिस्ट मित्रामुळे ती कामगाराचे दारिद्रय पाहते. त्यांची गोजिरवाणी मुले पाहते. त्यांना ती प्रेमाने वागवते. परंतु तिच्या नवऱ्याला आणि कुटुंबाला ते आवडत नाही. परंतु ती आता पार बदलून गेलेली असते. आसन्नमरण वेश्येची ती सेवा करते. चोरी करणाऱ्या मुलाला ती वाचविण्याचा प्रयत्न करते. हा सारा प्रकार पाहून समाजच तिला वेडी ठरवितो आणि वेडयाच्या हॉस्पिटलमध्ये टाकतो. तेथेही ती वेडया स्त्रियांना ममता देते. फादर तिला धर्म सांगतो की कुटुंबातील माणसावर प्रेम कर. पण इतके संकुचित प्रेम तिला नामंजूर असते. ती आता विश्वरूप झालेली असते. शेवटी वेडयाचे हॉस्पिटलच तिच्या नशिबी येते. अर्थात तिची कथाही साऱ्या समाजाची शोकांतिका आहे. इनग्रिड बर्गमन ह्या थोर नटीने त्या हिराईनचे काम अतिशय सुंदर केले आहे.

ॲन्टोनिआनी ह्या दिग्दर्शकाचा द क्राय हा चित्रपट ही एका कामगाराच्या असफल

प्रेमाची कथा आहे. ज्या स्त्रीवर त्याचे प्रेम आहे ती त्याला नकार देते. तो तिला विसरू शकत नाही. अनेक स्त्रिया त्याच्या जीवनात येतात परंतु तो परत तिच्याकडेच येतो. दुर्दैवाने तिने तोपर्यंत नवा संसारही थाटलेला असतो. शेवटी आत्महत्येशिवाय त्याला मार्गच उरत नाही. अँन्टोनिओनिचे 'द नाईट' हे चित्रमात्र खास उल्लेखनीय होते. सोफिस्टिकेटेड समाजाचे खरेखुरे चित्रण येथे आढळते. एका लेखकाची आणि त्याच्या पत्नीची ही एका रात्रीची कथा. एका रात्रीत ज्या अनेक घटना घडतात त्यातून जीवनातील कितीतरी छोट्या मोठ्या गुप्त, सुप्त भावविश्वाचे पदर उलगडून दाखविण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला. जीन मोराय, मोनिका विट्टी आणि मार्सेलो मास्ट्रिओनि या जाणकार कलाकारांनी ह्या चित्रपटाला आपल्या सहज अभिनयाने न्याय दिला आहे. गर्दीला वैतागून आपल्या नवऱ्याचा सत्कार सोडून आपल्यातच हरवलेली त्याची बायको व तिची भटकंती कितीतरी अर्थपूर्ण गोष्टी सांगते. एका कारखानदाराने दिलेल्या पार्टीत त्यांना कळून चुकते की ते मनाने एकमेकापासून दूर गेलेत. केवळ सवय म्हणून एकत्र राहताहेत. शेवटी पहाटे पहाटे त्यांना दोघांना त्यांचे पूर्वीचे प्रेम जवळ आणते. शेवटी वाचलेली कविता कंटाळवाणी वाटते परंतु दिग्दर्शकाने हा चित्रपट फारच छान रंगवलाय. विशेषत: सोफिस्टिकेटेड समाजाचे चित्रण परिणामकारक झाले आहे.

### मिरॅकल इन मिलान

डिसिका हा इटालियन दिग्दर्शक थोडासा चावटपणाविषयी प्रसिद्ध आहे. परंतु त्याच्या चावटपणाला किंवा विनोदाला भयंकर सामाजिक उपहासाची धार असते. मिरॅकल इन मिलान हा चित्रपट त्याची साक्ष देतो. ही एक धमाल फँटसी आहे. परंतु हसविता हसविता डोळयात अंजन घालण्याची सहज किमया येथे नववास्तववादी डिसिकाने केली आहे. ही एक झोपडपट्टीची व तिच्यातील दरिद्री माणसांची कहाणी. ह्या झोपडपट्टीत एक अनाथ मुलगा येतो. तो साऱ्यावरच प्रेम करीत असतो. ते नवीन झोपडपट्टी बांधतात. परंतु ती जागा एक शेठ दुसऱ्या शेठला विकतो. जागा खाली करून घेण्यासाठी दुसरा येतो. परंतु त्याला पिटाळले जाते. तेवढयात तेथे खनिज तेलाचा शोध लागतो. मग काय जागावाला शेठ पोलिसांच्या मदतीने त्यांना हुसकावयाला बघतो. परंतु ह्यावेळी त्याची मृत आई आकाशातून येऊन त्या अनाथ मुलाला जादूचे कबूतर देते. त्या कबूतराला जे मागाल ते मिळते आणि मग सारी धमाल धमाल! अनेक मजेशीर प्रसंगातून माणसाच्या मूलभूत स्वभावावर डिसिकाने बोट ठेवले. त्यातील अनेक प्रसंग आणि घटना म्हणजे प्रस्थापित समाजाला काढलेले बोचकारे आहेत ह्या चित्रपट संधी मिळाल्यास अवश्य बघण्यासारखा आहे.

'द गोल्ड ऑफ रोम' हा दिग्दर्शक कार्लो लिप्तानीचा युद्धाच्या पार्श्वभूमीवरील १९६६ चा चित्रपट. १९४४ साली रोममध्ये जर्मन सैनिक ज्यू लोकांना कसे नाडतात. त्यांना दोन दिवसात पन्नास किलो सोने द्यावयास सांगतात. नाही दिले तर संबंध ज्यू लोकांची कत्तल होणार असते. अशा ह्या भयंकर दबावाखाली ज्यू लोकांची निष्ठा, समाज वाचविण्यासाठी त्यांची धडपड, त्यांची जिद्द, व शेवटी जर्मनांनी त्यांची केलेली फसवणूक ह्या गोष्टी परिणामकारक दाखविल्या आहेत. ह्यातच एका ज्यू मुलीची व ख्रिचन मुलाची प्रेमकथा दाखविली आहे. ते दोघेही सोने आणून देतात. ती त्याच्या प्रेमासाठी ख्रिश्चन धर्मही स्वीकारते. परंतु जर्मनांनी घोर फसवणूक करताच प्रेमाचा त्याग करून आपल्या समाजाचे प्रारब्ध भोगण्यास ती तयार होते. चित्रपटातील हा भाग फारच हृद्य झाला आहे.

### स्वातंत्र्य लढ्याचे महाकाव्य

'बॅटल ऑफ अल्जेरियाज' हा दिग्दर्शक गिलो पॉन्टेकार्व्हो ह्या थोर माणसाचा महान चित्रपट होय. निदान माझ्यातरी आयुष्यात ह्या चित्रपटाचे कधीच विस्मरण होणार नाही. आपण हा चित्रपट पाहात आहोत असे मुळी वाटतच नाही, तर जे काही समोर घडतेय, गल्ल्याबोळातून घडतेय, रस्त्यात घडतेय ते सारे आपण अगदी जवळून पाहतोय असे वाटते. त्या चित्रपटाचाच एक भाग आपण होऊन जातो. इतके जिवंत चित्रण अद्याप तरी मी कुठेच पाहिले नाही. 'सत्य-चित्र' (ट्रुथ सिनेमा) ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे हा चित्रपट होय. खरे म्हणजे वेगळाच खास लेख लिहावा असा महान चित्रपट आहे. अल्जेरियन स्वातंत्र्य लढ्याचे महाकाव्यच आपण बघतो आहोत, त्यात भाग घेत आहोत असे वाटायला लावणारा हा चित्रपट.

१९५० ते १९६२ च्या दरम्यान फ्रेंचांच्या जुलमी राजवटीविरूद्ध अल्जिरियन लोकांनी जो उग्र लढा दिला त्याचे हे चित्रण आहे. ही क्रांती चिरडून टाकण्यासाठी फ्रेंच सैन्यांनी जी घोर कृत्ये केली व त्यामुळेच अधिकच उफाळून उठलेली ही क्रांती व देशाच्या स्वातंत्र्यासाठी पेटून उठलेले लोक ह्यांची ही रक्तरंजित परंतु जिवंत कथा. तसे पाहिले तर क्रांती लढ्यातील काही घटनांचेच चित्रण ह्यात आहे तर काही घटनांचे सत्यचित्रण आहे. १९५७ सालातील घटनांपासून हा चित्रपट सुरू होतो. खरे म्हणजे हा चित्रपट प्रत्यक्ष बघूनच अनुभवावा असा आहे. तो केवळ सांगून त्यातील जिवंतपणा तुम्हाला कळणार नाही. ह्या चित्रपटाने इटालियन चित्रपटसृष्टीत एक इतिहास निर्माण केला आहे. कसलेही तथाकथित शूटिंग नाही, स्टुडिओ, नटया वगैरे फालतू गोष्टी नाहीत. तर ह्यात आहेत स्वातंत्र्यासाठी पेटून उठलेली माणसे, बायका, मुलं, वृद्ध एवढेच नव्हे तर पेटून उठलेले मोहल्ले, रस्ते, गल्ल्या, भिंती, घरे, फक्त येथे पाहिजे ती दिग्दर्शकाची नजर. आणि त्या नजरेला साथ देणारा कॅमेरा. आणि तो मिळालाही.

ह्या चित्रपटातील अनेक प्रसंग आणि घटना चित्तथरारक आहेत. स्वातंत्र्यासाठी जिवावर उदार होणारे तरुण, तरुणी, वृद्ध, मुले ह्यांचे इतके जिवंत चित्रण आढळते की ते तपशीलवार सांगण्यासाठी वेगळा लेखच लिहावा. हे स्वातंत्र्याचे महाकाव्य भारतीयांना खरे म्हणजे 'रेग्युलर शोज'ना दाखवावे. म्हणजे त्याना स्वातंत्र्याची किंमत तरी कळून येईल. असो.

एकंदरीत इटालियन चित्रपटांची वीस वर्षे अभ्यासनीय आहेत. 'सब् टायटल्स' नसल्याने कळण्यास थोडी अडचण आली. तरीपण काही चित्रपट भाषेच्या पलीकडचे असतात हे काही इटालियन चित्रपटांनी दाखवून दिले. परंतु ज्यांनी हा चित्रपट-महोत्सव संयोजिला त्यांना हे कळलेच असेल की जाहीर झाल्याबरोबर एक-दोन तासातच 'हाऊसफुल्ल' कसे झाले व तरीही प्रत्येक शोला तिकिटे कशी मिळत होती. आणि पुन्हा एकदा सारे चित्रपट का लावावे लागले? हा प्रकार मला तरी कळला नाही.

□ □

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

दि. ४ ते १० मे ७४

## स्वास्थ्याला राजकीय भूकंपाचे जबर धक्के

या आठवडयाची सुरुवातच मेष राशीत होणाऱ्या रवी-बुध युतीने होत आहे. मेष ही सत्ताकांक्षी रास व तेथे रविसारखा राजकारणी ग्रह. त्यामुळे सबंध भारतातच जनतेच्या स्वास्थ्याला अशांतेचे धक्के बसले तर आश्चर्य वाटू नये. इंदिरा गांधीच्या मंत्रिमंडळातील अंतस्थ खदखद एकदम ज्वालाग्राही रूप धारण करील. राष्ट्रपतीपदाची निवडणूक हे तात्कालिक कारण ठरू शकेल. फकरुद्दीन अली, जगजीवनराम, यांचे राजकीय हेतू स्पष्ट होतील. पंतप्रधानांच्या मनाचादेखील जरा गोंधळच उडेल. यावेळी यशवंतराव चव्हाणांना महत्त्वाची कामगिरी बजावण्याची संधी मिळणार आहे. ते पंतप्रधानांच्या अधिक जवळ येतील. मध्यप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, गुजराथ, म्हैसूर व उत्तर प्रदेश या राज्यात ' राजकीय स्फोट ' संभवतात. मुख्यमंत्री वसंतराव नाईक स्थलांतराच्या वाटेवर येऊ शकतील. ◻

### मेष : विवाहाचे जमावे

आजच आपल्या राशीत रवी-बुध युती होत आहे. बुध हा परप्रकाशीत असला तरी या युतीमुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वाला उत्तम उठाव मिळणार आहे. प्रभाव वाढणार आहे. तुमच्याबद्दल आगळे आकर्षण निर्माण होणार आहे. प्रामुख्याने शनिवार ते सोमवार या मुदतीत विवाहासारखा रेंगाळत राहिलेला प्रश्न मार्गी लागावा. अडचणी निवारण होऊन गृहमैत्रिण मनासारखी लाभावी. मंगळवारी वरिष्ठ नोकरीचा इंटरव्ह्यू सफल व्हावा. नोकरीचे जमावे. शेतीपदवीधर, इंजिनियर यांना उद्योग मिळावा. जमिनीच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय या आठवडयात तेजीत चालू शकेल. लेखी व्यवहार जरा जपूनच करा. विवाह, मंगलकार्य यात पैसा खर्च होईल. हौससाठीदेखील पैसा खर्च होईल. महिलांस : कुमारिकांचे विवाहाचे जमावे. चालू व्यवसाय उत्तम चालेल. ◻

### वृषभ : स्वास्थ्याला धोका

या आठवडयाची सुरुवात सहाव्या चंद्राने होत आहे. हा चंद्र तसा वाईट नसला तरी तेवढासा अनुकूल नसतो. पोटात बिघाड, लिव्हरला त्रास. जेवणाखाण्यावर परिणाम असे काहीतरी सारखे होत राहावे. यासाठी तुम्ही पहिले दोन-तीन दिवस तरी काळजी घ्या. सारे संयमाने करा. प्रवासाचा बेत टाळा. कारण थकवा अगर ऊष्णता बाधण्याची शक्यता आहे. साध्यासुद्धा गोष्टीसाठी डोके उगाचच तापवून घेऊ नका. काही वेळा तुमच्या मनाविरूद्ध घटना घडतील. पण यावेळी संयम पाळणे आवश्यक आहे. नोकरी धंद्याच्या बाबतीत तुम्ही आजवर उराशी बाळगलेली अनेक ध्येये यावेळी उध्वस्त होतात की काय असे वाटेल. पण तसे प्रत्यक्षात काही होणार नाही. नोकरीत कामाचा ताण फार वाढेल. इतर सहकाऱ्यांची कामे तुम्हाला करावी लागतील. तुमची तक्रार कुणी ऐकूनच घेणार नाही. तरीपण नव्या नोकरीच्या बाबतीत काही अनुकूल घटना घडतील. महिलांस आर्थिक परिस्थितीचा ताण असह्य होणार नाही. गरजेपुरती सोय होईल. नोकरीत त्रासाने पण काम होईल. ◻

### मिथून : अकस्मात अडचणी

बौद्धिकदृष्टया श्रेष्ठ असलेल्या लोकांच्या बाबतीत मनाविरुद्ध घटना घडल्या तर त्याच्या मनावर अनिष्ट परिणाम होतो. आपल्या मनावर तसा तो होणार नाही. तरीपण केतूचे व्ययस्थानातील राश्यंतर तुम्हाला अनेक बाबतीत दक्षता बाळगायला लावणार आहे. व्यापाराच्या बाबतीत यावेळी कोणतेच धाडस करू नका. तोटाच होईल असे नव्हे पण प्रामुख्याने कायद्यांची भीती तुम्हाला बाळगावीच लागेल. जादा पैसा घेण्याचा मोह टाळा. तुमच्यासमोर येणारा मनुष्य एखादा सी. आय. डी. देखील असू शकेल. नोकरीत ज्यांना बाहेरचे पैसे मिळण्याची संधी असते त्यांनी काळजीपूर्वक काम करावे. चालू नोकरीत बदलीची शक्यता आहे. मात्र कोणतेच काम नाकारू नका. आर्थिकदृष्टया आठवडा प्रतिकूल नाही. मात्र खर्च फार होईल. महिलांस : कर्ज काढून साडया अगर दागिने घेण्याचे टाळा. नोकरीत सामान्य दिवस. ◻

### कर्क : अडचणीवर मात

चंद्राला साडेसाती लागली की स्वभाव चिरचिरा बनतो. त्यातही तुमचा स्वभाव मुळातच तसा असतो. पण आता केतू अकरावा झाला असल्यामुळे तुमचे काम बरेच सुसह्य झाले आहे. सध्या तरी नव्या योजना अगर नव्या संकल्पाच्या नादी न लागता आहे ते सांभाळून केलेत तरी चालेल. त्यामुळे होणारे नुकसान टळेल. गेल्या काही दिवसात तुमच्यासमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या. पण आता शनिवार ते बुधवार हे दिवस इतके छान आहेत की साऱ्या अडचणी अंधारासारख्या विरून जातील. उद्योगासाठी तुमचे पैशाचे प्रयत्न चालू असले तर त्याला आशेची ऊब यावेळी निर्माण होईल. विरोध करणारेच तुमची शिफारस करतील. नोकरीत कामाचा ताण

वाढेल पण तुमच्या कामाचे कौतुकही होईल. महिलांस : दुसऱ्यावर चिडून उपयोगी नाही. मिळते जुळते घ्या. विरोधावर मात करू शकाल. ¤

## सिंह : मान मिळण्याचा योग

तुमचे स्थान नेत्यांच्या मालिकेतच असते. समाजात असो अगर राष्ट्रीय जीवनात असो तुम्हाला आगळे व वेगळे स्थान असतेच. सिंह राशीचे हे खास वैशिष्टय असते. कितीही सामान्य माणूस असला तरी सिंह राशीच्या व्यक्तींना महत्त्वाचे स्थान असते. आता तर शनी-गुरू यासारखे ग्रह अनुकूल आहेत. या आठवडयात भाग्यस्थानी रवी-बुधाची युती होत आहे. आठवडयाची सुरुवात तिसऱ्या चंद्राने होत आहे. विरोध, अडचणी, आशाआकांक्षावर आलेली सावली कुठच्या कुठे उडून जाणार आहे. तुम्ही आमदार, खासदार किंवा कोणत्याही महत्त्वाच्या पदावर असाल अगर नसाल या आठवडयात तुमचा मोठा सन्मान होणार असून हार तुमच्या गळयात पडणार आहेत. तुम्ही लेखक असाल तर तुमच्या गुणांना व लेखनाला मोठे स्थान मिळणार आहे. महिलांस : जमत नसलेला विवाह यावेळी अचानक जमून जाईल. कुमारिकेच्या आशा आकांक्षा पुऱ्या होतील. ¤

## कन्या : डोके शांत ठेवा

तिसरा राहू उत्तम आहे. त्याचप्रमाणे शनीदेखील दहावा आहे. तोदेखील वाईट नाही. फक्त गुरूचे बळ मात्र मिळणार नाही. कारण तसा सहावा गुरू बरा नाही. सध्या तुमच्याबाबतीत रवी-बुध युती काय हात देईल तेवढीच. तुम्ही बुद्धिजीवी लोक, तुमच्या जीवनात भावनेला महत्त्व जास्त. त्यासाठी मात्र तुम्हाला अनुकूलता नाही. शनिवार ते बुधवार तुम्ही वारंवार चिडत राहाल. कोणतीच गोष्ट मनाविरुद्ध झालेली तुम्हाला खपणार नाही. पत्नीवर अकारण रागवाल. मुलावर चिडाल. नोकरी व्यवसायाच्यादृष्टीने मात्र हा आठवडा अनुकूल आहे. वरिष्ठांचा तुमच्याबद्दलचा गैरसमज दूर होईल अगदी मर्जी नसली तरी समंजसपणाने ते बोलू शकतील. व्यवसायातील अडजणी दूर होऊ लागतील. तब्येतीचा आजार वा अस्वस्थता कमी होईल. महिलांस : मन उत्साहाने भारून जाईल. याच उत्साहात अनेक संकल्प कराल. या संकल्पांना प्रतिसाददेखील चांगला मिळेल. ¤

## तूळ : प्रतिष्ठेला अनुकूलता

आज सुरू होणारा आठवडा तूळेच्या चंद्राने होत आहे. तुळेचा चंद्र छान असतो. अनेक उत्तम घटनांनी व प्रसंगांनी हा आठवडा भरलेला आहे. प्रामुख्याने आर्थिक घडामोडीत मोठे यश मिळवून देणारा हा आठवडा आहे. शनिवार ते सोमवार लॉटरीत व रेसमध्ये नशीब बहरण्याची शक्यता आहे. तुम्ही वृश्चिक व मेष या राशी शुभ धरून पैसे मिळवण्याचे मार्ग चोखाळा म्हणजे तुमचे मन प्रसन्न होईल. अनेक दिवस तुमचे मिळत नसलेले पैसे ध्यानीमनी नसताना मिळतील. नोकरीत थोडा त्रास संभवतो. हाताखालची माणसे स्वभावाचा गैरफायदा घेतील. तूर्त आहे त्या नोकरीत बदल करू नका. गुरुवार शुक्रवार सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा मिळेल. सिनेमा, नाटकात मन प्रसन्न होऊन जाईल. महिलांस : गुरूबळ उत्तम आहे. त्यामुळे कोणतीही गोष्ट मनासारखीच होईल. माहेरहून पत्र येऊन आनंद मिळेल. ¤

## वृश्चिक : खर्च आटोक्यात ठेवा

हर्शलसारखा अद्‌भूत घडवणारा ग्रह तुम्हाला बारावा आहे. याची तुम्हाला जाणीव ठेवायला हवी. शनिवार ते मंगळवार चंद्रदेखील तुम्हाला अनुकूल नाही. हौस म्हणून अवाच्या सवा खर्च करायला तुम्हाला काही वाटणार नाही. मित्रमंडळींच्या गोतावळयात चार पैसे हात सोडून खर्च कराल व त्यामुळे कर्ज काढायची पाळी येईल. बुधवार ते शुक्रवार मात्र उत्तम दिवस आहेत. नोकरीत आजवर जी कामे अडून वा रेंगाळत राहिली होती ती मार्गी लागतील. प्रामुख्याने बढती-प्रमोशनची तुमची शिफारस होईल. बेकारांना मात्र फक्त कॉल येईल.तरीपण प्रत्यक्ष कामाला उशीर लागेल. जमिनीचा एखादा वाद कोर्टात चालू असेल तर तो तडजोडीने मिटेल. स्वतःचा प्लॉट खरेदीचा व्यवहार यावेळी होऊ शकेल. महिलांस : नोकरीत तुमच्या कामाचे चीज होईल. शिक्षकी पेशात असलेल्या स्त्रीयांना खास असे काही तरी मिळेल. ¤

## धनू : तब्बेतीला किरकोळ त्रास

बारावा राहू हा अनेकदा अकस्मात त्रास-अडचणी निर्माण करीत असतो. कोणत्याही सरळ चाललेल्या व्यवहारात कुणीतरी मिठाचा खडा टाकावा असे काहीतरी होत असते. म्हणूनच धनू राशीच्या लोकांनी तरी दत्त उपासना करायला हवी. त्यामुळे मनस्ताप होणार नाही. तुम्हाला अशक्तपणामुळे जर एखादा आजार यापूर्वी झाला असेल तर त्याचा प्रादुर्भाव यावेळी होईल असे वाटते. त्यासाठी आधीच डॉक्टरी औषध सुरू करा. खर्च होईल हे खरे पण दैवाला तेच हवे आहे. तुमचे व पत्नीचे तंटे असतील तर यावेळी संयमाने वागणे आवश्यक आहे. संसारसुखात काही ना काही त्रास होणार आहे. प्रवासाला मात्र अनुकूलता आहे. नोकरी व्यवसाय ठीक होईल. महिलांस : तिसरा गुरु हीच काय ती जमेची बाजू, पतिराजाबरोबर हट्टाने वागू नका. संकट ओढवून घ्याल. ¤

## मकर : नोकरीत शुभ

या आठवडयाची सुरवात एखाद्या अनुकूल घटनेने होणार आहे. अनेक दिवस ज्याची तुम्ही वाट पहात होता तो माणूस अचानक येऊन तुमच्यासमोर उभा राहील व त्यामुळे तुम्हाला हवा असलेला आनंद मिळेल. नोकरीत वरिष्ठांना भेटण्यासाठी व तुमची एखादी महत्त्वाची मागणी त्यांच्यापुढे मांडण्यासाठी ज्या मध्यस्थांची तुम्हाला गरज आहे तो त्रासाशिवाय भेटेल. एकूण आठवडाच नोकरीत छान आहे. चालू काम बदलेल. कामाचा ताण कमी होईल. झालेली चूक तुम्हाला माफ करण्यात येईल. वरिष्ठांकडून सहानुभूतीने विचार होईल. तुमची परिस्थिती सुधारायला त्यांची मदत होईल. या वेळी कोणत्याही मित्रावर विसंबून राहू नका. महत्त्वाच्या व्यवहारात मित्रांना टाळाच. पैशांची बाजू फारशी प्रतिकूल नाही तरी पण उसने पैसे देऊ नका व मागू नका. महिलांस : संततीसुख मिळेल. दूर असलेली मुले येऊन भेटतील. प्रवासाचाही योग आहे.

**कुंभ : विजयाचा सप्ताह**

आज होणाऱ्या आठवडयाची सुरुवातच मुळी गुरु-चंद्राच्या त्रिकोण योगाने होत आहे. हा एक चिरंतन मांगल्य व आठवण देणारा योग आहे. शनिवार ते बुधवार या दिवसांची मुद्दाम नोंद घ्या. तुम्ही नास्तिक नसलात तरी साधू संत, धार्मिक पीठे, संतांचे कर्मकांड याबद्दल तुम्हाला आदर नाही. पण या वेळचा योगच काही विलक्षण आहेत. एखाद्या यज्ञयागात तुम्हाला 'यजमानपण' करण्याची संधी चालून येणार आहे. ज्यांच्याबद्दल नतमस्तक व्हावे अशा कीर्तिवान, नीतिवान साधूचा तुम्हाला आशीर्वाद मिळणार आहे. त्यामुळे तुमच्या विचारांनाच कलाटणी मिळणार आहे. मनोधारणेनेच स्थित्यंतर होईल. भौतिकदृष्टया आठवडा विजयाचा आहे. तुम्ही राजकारणात वावरत असाल तर एखाद्या उच्चपदासाठी तुमची नेमणूक होईल. लोकप्रियता मिळेल. भाषणांची लोकांवर छाप पडेल. नोकरीत अतिशय अनुकूलता आहे. महिलांस : संसारात प्रसन्नता राहील. पतिपत्नीचे प्रेम वाढीस लागेल. ◻

**मीन : मनाचा गोंधळ**

लॉटरी, रेस व स्थावरा संबंधीच्या साधनातून या आठवडयात पहिल्याच चार दिवसात पैसा मिळण्याची शक्यता आहे. जन्माचे दारिद्र्य नष्ट होऊन जाईल असा हा योग आहे. पण गुरुधर्माची तुमची रास आहे. त्यामुळे पैशापेक्षा वैचारिक सामर्थ्याला तुम्ही जास्त मानता. त्यामुळे तेच समाधान तुम्ही यावेळी मिळवण्याचा प्रयत्न कराल. संसार, मुले मानसन्मान सारे काही तुम्हाला नकोसे वाटेल. कुठे तरी एकांत घ्यावा. देवाच्या उपासनेत मग्न होऊन राहावे असे वाटेल. कुठेच विचार स्थिर होणार नाहीत. मनात एक असेल तर प्रत्यक्ष हातून घडेल भलतेच. उपासनेत देखील थोडेफार अडथळे येऊन तुमचा 'विश्वामित्र' होण्याची भीती आहे. पैसा हाती आला तरी तो टिकणार नाही. नोकरीत स्थैर्याला थोडा फार धोका निरनिराळ्या प्रकाराची कामे करावी लागतील. कसोटीचाच काळ आहे. महिलांस : तीर्थयात्रा घडणे कठीण आहे. हताश होऊ नका. त्रासाचे दिवस लवकर संपतील. ◻ ◻

---

# कोकण रेल्वेचा 'ट्विस्ट'

माहितगार : पृष्ठ ७ वरून

वैशंपायन चिथावणी देतात असे म्हटले गेले. तर काहींनी विद्यार्थ्यांना शंकरराव पैसा पुरवतात असा आरोप केला. या बैठकीच्या निमित्ताने जे निर्णय घेतल्याचे जाहीर करण्यात आले त्यात नवीन काय आहे? यामुळे विद्यार्थ्यांचे समाधान होणे शक्य नाही. आणि समाधान नाही. म्हणजे आंदोलन चालू राहाणे आलेच! मराठवाडयातील आंदोलनाचा जोर स्वतंत्र विदर्भाची चळवळ जसे रूप घेईल त्याप्रमाणात तीव्र होत जाईल. ऑगस्टला विदर्भाची चळवळ सुरू होणार आहे, त्याच्या थोडे आधीच मराठवाडयातील चळवळ जोर धरील. विदर्भाच्या चळवळीमुळे मराठवाडयाची चळवळ मागे पडू दिली जाणार नाही!

या हालचालींच्या निमित्ताने राज्यातील राजकीय स्थैर्याचा प्रश्न केंद्रीय नेतृत्वाकडून उभा करावा असा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून चालला आहे. इतर राज्यात जे वातावरण आहे त्यामानाने महाराष्ट्रात स्थिरता आहे. ती बिघडू दिली जाऊ नये असे दिल्लीला सांगण्यात आले आहे. सत्तेवर राहण्यासाठी स्थिरतेचा प्रश्न हा अखेरचा आधार! त्याचा उपयोग करण्यात येत आहे.

स्थिरतेच्या प्रश्नावर घोडे अडू नये म्हणून पी. के. दादा, यशवंतराव मोहिते, शंकरराव व शरदराव हे मिळून किंवा सर्वांच्या वतीने पी. के. नजिकच्या काळात पंतप्रधानांना भेटून, नेतृत्वात बदल झाला तरी राज्यातील स्थिरता बिघडणार नाही अशी खात्री करून देणार आहेत. पंतप्रधानांना हे नेते लगेच भेटतील असे मात्र नव्हे. श्री. नाईक यांच्या गटाने स्थिरतेचा प्रश्न उपस्थित केल्यानंतरच ही भेट होणार आहे. प्रमुख नेत्यांच्या मोठ्या गटाने पंतप्रधानांना स्थिरतेची ग्वाही दिल्यास आपला वार फुसका ठरेल हे जाणून श्री. नाईक यांच्या बाजूने उभे असलेले काही मंत्री प्रथम जाहीरपणे विरोधी गटातील मंत्र्यांवर टीका करण्याच्या पावित्र्यात आहेत. त्याकरता कोणता तरी 'इश्यू' शोधला जात आहे.

या घटनांमुळे मुख्यमंत्री श्री. नाईक यांचा तोल ढळत चालला आहे. त्यामुळे ते आपला राग पत्रकारावर काढत आहेत. पत्रकारांना ते म्हणतात 'तुम्हाला काय सांगायचे? तुम्ही ट्विस्ट करता! श्री. नाईक यांना न आवडणारे काही प्रसिद्ध झाले की ते ट्विस्ट केले जाते असे म्हणतात! नाईकांना ट्विस्ट म्हणजे काय ते त्यांचेच उदाहरण देऊन सांगता येईल. १९६७ च्या विधानसभेत बापूसाहेब काळदाते एकदा म्हणाले होते जिल्हा परिषदेच्या गाडया रात्री चित्रपटगृहात कुटुंबियांना घेऊन आलेल्या दिसतात तेव्हा मला संताप येतो!

त्यावर उत्तर देताना श्री. नाईक म्हणाले होते, बापूसाहेबांचे काय! त्यांना सरकारी गाडी दिसली की संताप येतो!! (श्री. काळदाते यांनी आपण असे म्हटलेले नाही असा खुलासा केला तेव्हा त्यावेळी श्री. नाईक यांनी आपले विधान दुरुस्त केले होते). याला ट्विस्ट म्हणतात! जायकवाडी गेस्ट हाऊसवर पंतप्रधानांनी कोकण रेल्वे मंजूर झालेली आहे असे पत्रकारांना सांगितले नव्हते. त्या म्हणत होत्या, तीन तीन वेळा म्हणत होत्या, कोकण रेल्वे आहे की नाही मला माहिती नाही त्याची खात्री करून घ्या; आणि श्री. नाईक म्हणत होते, 'मॅडम प्राइममिनिस्टर, आय ॲम शुअर! कोकण रेल्वे इज इन्क्लुडेड!' तरीही पंतप्रधान म्हणत होत्या, इट इज बेटर, यु गेट इट कन्फर्मड् फ्रॉम रेल्वे मिनिस्टर!' अशी वस्तुस्थिती असताना पत्रकारांना कोकण रेल्वे मंजूर झाली आहे असे सांगणे याला ट्विस्ट म्हणतात! वस्तुस्थिती छापणे म्हणजे ट्विस्ट नव्हे! मग ते कोणाला आवडो वा न आवडो! ◻ ◻

## दि. के. बेडेकर : पृष्ठ ८ वरून

दि. के. बेडेकर : पृष्ठ ८ वरून

दृष्टीने प्रस्थापिताचा पर्याय बनू शकला नाही. बुद्धीवाद्यांची कुचंबणा झाली ती या मुळे. पक्षावर केवळ हेतूपुरस्सरतेचा आरोप करणे मात्र चुकीचे होईल. अविकसित, वासाहतिक, अर्धसरंजामी राष्ट्रात हे होणे अपरिहार्य नव्हे तरी साहजिक होते. या कालसापेक्षतेला दि. के. बळी पडले. पक्षापासून म्हणून त्यांना दूर जावे लागले. तोवर समीक्षा, तत्त्वज्ञान इत्यादी क्षेत्रात शिरायला त्यांना वाव मिळाला नाही.

याचा एक परिणाम म्हणून तोवर दुत्कारणाऱ्या प्रस्थापिताने ताबडतोब त्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला. पूर्वाश्रमीच्या कम्युनिस्टांबद्दल उदारमतवाद्यांचे प्रेम नेहमीच उफाळून येत असते. पण मनातून असूया अन् अढी मात्र कायमच असते. मृत्यूनंतर दि. के. बद्दल अनेक गौरव लेख आले. त्यांची स्तुती झाली. त्या साऱ्यांचा सूर होता कम्युनिस्ट असूनही माणूस रसिक होता, चांगला होता, राष्ट्रवादी होता. हाच भडका उडवणारा अनुभव काही महिन्यातच पुन्हा एकदा माझ्या वडिलांच्या – लालजी पेंडसेंच्या मृत्यूनंतर ही आला. आणि कीव आली मार्क्सवाद्यांना असहिष्णू म्हणून हेटाळणाऱ्या आमच्या उदारमतवादी बुद्धिवाद्यांची. श्री. हमीद दलवाई यांची एका प्रसंगी करून देण्यात आलेली 'मुसलमान असला तरी चांगला माणूस आहे' ही ओळख ऐकून त्या दुराग्रही जात्यंधतेला कुत्सितपणे हसणारे आमचे उदारमतवादी तितक्याच कोत्या आणि दूषित मनोवृत्तीचे आहेत. अनेक लेखकांच्या, बुद्धिवाद्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना ते मार्क्सवादी आहेत हे क्षणभरही विसरू न शकणारे आमचे काही टीकाकार कला व समाज यांचा संबंध मात्र स्वतःचेही उदाहरण डोळ्याआड करत नाकारतात. श्री. बलराज सहानींचे सिनेमातले कामसुद्धा याच दृष्टिकोणातून ते बघू शकतात. यात तसे फार आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. विचारदारिद्र्यच खरे तर महाराष्ट्रात फार फोफावलेय. कुठल्यातरी पाश्चात्य लेखकांच्या मतावर पूर्ण भरवसा टाकून आमचे मध्यमवर्गीय विचारवंत ती शिदोरी पुरवीत राहतात. मूलग्राही विश्लेषण व विवेचनाला जरूर असलेली दृष्टीच त्यांच्याजवळ नाही. आणि मग स्वयंस्फूर्ततेला बिचकत व तिचा दुस्वास करीत ते जळफळतात. स्वतःच्या ताकदीने दि. के. बेडेकरांसारखा कुणी जेव्हा विचार क्षेत्रात आपले स्थान पक्के करतो, कुणाच्या कृपेवर वा कारस्थानी राजकारणावर न विसंबता स्वतःला स्वतःच्या मतांना जागा कमावतो त्यावेळी हे गडबडून जातात. तो विचारवंत मार्क्सवादी असला तर मग समस्या जास्तच गंभीर होते. त्या माणसाचे विचार अन् मार्क्सवाद हे वेगळे काढण्याचा आणि एकमेकांपासून विभक्त असल्याचे भासवण्याचा केविलवाणा आणि हास्यास्पद प्रयत्न मग ते करू पाहातात. कामगार चळवळीच्या बंदिस्त आणि परक्या क्षेत्रातून मार्क्सवादी बाहेर पडून प्रस्थापितावर वैचारिक धडक मारतो त्या त्या वेळी असेच होते.

दि. के. बेडेकर एक मार्क्सवादी विचारवंत होते. आमच्या मध्यमवर्गीय बुद्धिवाद्यांना कितीही अप्रिय वाटणारी असली तरी ही वस्तुस्थिती होती. माणूस-निसर्ग-समाज यांचे परस्परांशी जडलेले अविभक्त नाते, त्यांच्यातले झगडे अन् व्यारकाव्यांसकट समजण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हे करताना त्यांनी मार्क्सवादी विचारप्रणाली वापरली. कलेच्या क्षेत्रातही त्यांनी हीच भूमिका मांडली. कलावंत सौंदर्यासक्त असतो, त्याचा पुजारी असतो, निर्माता असतो. पण हे सौंदर्य त्याला जीवनातच हुडकता येते. आणि जीवनाचा विचार हा समाजाच्या रचनेपासून वेगळे राहून करता येणे अशक्य असते. हा विचार दि. के. नी साहित्यक्षेत्रात मांडला, रुजवला. उदारमतवादाच्या गोंडस नावाखाली फोफावणारी पलायनवादी अलिप्तता त्यांना सदाच अमान्य होती. अर्थकारण व राजकारणापासून पाठ फिरवून समाजाचा म्हणजेच जीवनाचा व पर्यायाने माणसाचा विचार करता येणे अशक्य आहे हे त्यांनी नेहमीच मांडले, ठसवले.

भारतीय इतिहास व तत्त्वज्ञान यांच्यात त्यांनी घेतलेला रस हा ही केवळ मार्क्सवादी दृष्टिकोणातूनच आकलनीय. भूतकालीन वैभवाचे वा सशक्ततेच पोवाडे गाण्याकरिता नव्हे तर आजच्या समाजाचे स्वरूप, त्याची चलन प्रक्रिया समजण्यासाठी ते भूतकालाकडे वळले. त्यांचा राष्ट्रवाद हा आंतरराष्ट्रीयत्वाचा अविभाज्य भाग होता. महाशक्ती बनण्याच्या कल्पनेतून त्यांनी देशावर प्रेम केले नव्हते. मुख्य म्हणजे राष्ट्र या कल्पनेचा अर्थच त्यांच्या लेखी वेगळा होता. दगड, धोंडे, नद्या नि पर्वत यांना राष्ट्र मानणाऱ्यातले ते नव्हते. इथली जिवंत जनता–तिच्यातले अर्धपोटी शोषीत–दलित हे त्यांना राष्ट्र या कल्पनेत अभिप्रेत होते. राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रवाद म्हणजे त्यांचा उद्धार ही त्यांची कल्पना होती आणि या भूमिकेतून कुठलाही मार्क्सवादी आणि केवळ मार्क्सवादीच ज्वलज्जहाल राष्ट्रवादी ठरतो. सकाळ-दुपार-संध्याकाळ राष्ट्रघोष करणारे केवळ इथल्या प्रस्थापित भांडवलशाहीचे प्रेमी ठरतात.

दि. के. बेडेकर बुद्धिवादी होते. विचारवंत होते. पण या नावाखाली खपणारा पळपुटेपणा, अलिप्तता आणि प्रस्थापित वर्गसत्तेची पाठपुरवणी करण्याची अहमहमिका त्यांना मान्य नव्हती. झगडा मानणारे, त्यात बाजू घेणारे आणि लढणारे असे ते होते. कारण ते एक मार्क्सवादी विचारवंत होते.

हा गाभा विसरून दि. के. बेडेकरांच्या कार्यावर बोलण्याचा प्रयत्न करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय. आमच्या उदारमतवादी विचारवंताना त्यांचे कर्तृत्व डाचणे हे त्यांचे यशच. समर्थन शोधायचे असेल तर दि. के. च्या मार्क्सवादाचे नव्हे स्वतःच्या मार्क्सवाद-विरोधाचे शोधावे. वैचारिक आघाडीवरसुद्धा भांडवली तत्वप्रणाली इतकी दिवाळखोर का याचे शोधावे. मदिरा, मदिराक्षी किंवा सरळ सरळ एखादा बुवा यांच्याखेरीज काहीही उत्तर का देता येत नाही याचे शोधावे. कदाचित थोडे आत्मपरीक्षण होऊन काही सुधारणा होतील ही. असो.

श्री. दि. के. बेडेकरांचा आकस्मिक मृत्यू महाराष्ट्रावर फार मोठा आघात आहे. आणखी दहा वर्षे तरी काम करण्याची त्यांची स्वतःची इच्छा होती. खूप काही त्यांच्याजवळ देण्यासारखे होते. ते तसेच राहून गेले. दोन पिढ्यातला संवाद अधिकच तुटक झाला. ☐ ☐

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# रुपया पुस्तक योजना

या योजनेतील एकूण दहा पुस्तकांपैकी आठ पुस्तकांचे वाटप यापूर्वीच झाले आहे. रवींद्र पिंगे यांचे 'शतपावली' हे नववे पुस्तक तयार झाले असून ते कार्यालयातून घेऊन जाण्याची व्यवस्था ग्राहकांनी करावी.

ज्यांना पूर्वीच्या आठ पुस्तकांप्रमाणे हे पुस्तक पोस्टाने पाठवावयाचे आहे त्यांना दहावे श्रीग्रामायन हे पुस्तक जुलै-ऑगस्टमध्ये तयार झाल्यावर दोन्ही पुस्तके एकदम पाठविली जातील. पोस्टखर्च दुबार होऊ नये म्हणून ही व्यवस्था.

ही योजना पूर्ण होण्यास प्रथम वीजकपात, नंतर कागदटंचाई अशा सारख्या अडचणी येत गेल्या. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय झाली याची आम्हाला जाणीव आहे. पण एवढ्या अडचणी येऊनही योजना अखेर शेवटास जात आहे याचे समाधानही आहे.

आता 'टॉलस्टॉय' व 'मी नेताजींना बघितलंय' ह्या पुस्तक प्रकाशनाच्या योजना हाती घेत आहोत.

ग्राहकांचा कृपालोभ असावा.

व्यवस्थापक
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.

---

**शतपावली**
**रवींद्र पिंगे**
**प्रसिद्ध झाले**
**मूल्य रुपये दहा**

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.